(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

सिंधुदुर्ग जिल्हा रुग्णालयात तंत्रज्ञ व वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरण्याबाबत

(1) *9534 श्री.प्रकाश बिनसाळे : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) सिंधुदुर्ग जिल्हा रुग्णालयात सीटी स्कॅन, सोनोग्राफी व इतर अत्याधुनिक उपकरणे असून रुग्णालयात तंत्रज्ञ आणि वैद्यकीय अधिकाऱ्यांची मंजूर पदे मोठ्या प्रमाणात रिक्त असल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याचे माहे जुलै, 2010 च्या चौथ्या सप्ताहात उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर रुग्णालयात रिक्त असलेली तंत्रज्ञ व वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे तातडीने भरणेबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. फौजिया खान, श्री.सुरेश शेट्टी : (1),(2) व (3) अंशत: खरे आहे.

विशेषज्ञांची पदे रिक्त असली तरी पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. वैद्यकिय अधिकाऱ्यांची स्वतंत्र निवड मंडळामार्फत भरण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. क्ष-किरण तंत्रज्ञ, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, इसीजी तंत्रज्ञ, रक्तपेढी तंत्रज्ञ इत्यादी पदे भरण्यात आली आहेत व रुग्णांवर योग्य ते उपचार करण्यात येत आहेत.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. प्रकाश बिनसाळे : महोदय, अनेक रुग्णालयांसाठी शासन नवीन उपकरणांची खरेदी करीत असते. सिंधुदुर्ग जिल्हा रुग्णालयात देखील अनेक उपकरणे घेण्यात आली. या निमित्ताने मंत्री महोदयांना मी विचारु इच्छितो की, शासन ज्या उपकरणांची खरेदी करते ती वापरण्यासाठी तज्ज्ञ लोकांची नेमणूक मात्र करीत नसल्याने ती उपकरणे तशीच पडून असतात. कालांतराने ती नवीन उपकरणे नादुरुस्त होतात. म्हणून यासाठी लागणारी तज्ज्ञांची नेमणूक करण्यासंबंधीची प्रक्रिया शासन किती दिवसात पूर्ण करणार आहे ? तसेच सध्याच्या परिस्थिती ही उपकरणे सुस्थितीत आहेत की कसे ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9534.....

प्रा. फौजिया खान : महोदय, सिंधुदुर्ग जिल्हा रुग्णालयातील उपकरणांबद्दल सन्माननीय सदस्यांनी विचारणा केलेली आहे. माझ्या माहितीप्रमाणे ही उपकरणे चालू स्थितीत आहेत. त्यासाठी लागणाऱ्या मनुष्यबळाची मात्र अडचण आहे, हे मान्य करावे लागेल. ही पदे भरण्यासाठी शासन देखील प्रयत्नशील आहे, त्यासाठी परिमंडळ बदलून कोल्हापूरला नेण्यात आले. पण या भागात नियुक्ती केल्यानंतर आठ-दहा दिवसातच हे कर्मचारी बदली मागण्यासाठी येतात व त्यांच्या बदलीची शिफारस सन्माननीय सदस्यांकडूनच केली जाते.

डॉ. दीपक सावंत : महोदय, माननीय मंत्री महोदयांनी जो हेत्वारोप केला त्याबाबत माझी अशी विनंती आहे की, ज्या सन्माननीय सदस्यांनी अशा कर्मचाऱ्यांची बदली करण्याची शिफारस केली असेल त्यांची नावे मंत्री महोदयांनी सभागृहात सांगावी.

प्रा. फौजिया खान : महोदय, ही वस्तुस्थिती आहे पण मला सभागृहात सांगता येणार नाही. त्यासाठी शासनालाच काहीतरी उपाययोजना करणे आवश्यक आहे. जोपर्यंत नेमणूक केलेले अधिकारी वा कर्मचारी त्या भागात राहणार नाहीत तोपर्यंत आपण काय करु शकणार ?

श्री. प्रकाश बिनसाळे : महोदय, मंत्री महोदयांनी या प्रश्नाचे उत्तर अतिशय मोघम स्वरुपात दिलेले आहे. त्या ठिकाणचे जिल्हा शल्य चिकित्सक श्री. कुलकर्णी यांच्यामुळे हे कर्मचारी तेथे टिकत नाहीत असे मंत्री महोदयांना म्हणावयाचे आहे काय ? असे असेल तर त्यांनी स्पष्ट सांगावे, परंतु अशा प्रकारचे मोघम उत्तर देऊन माहिती लपविणे योग्य नाही.

प्रा. फौजिया खान : महोदय, कालच मी या सभागृहात उत्तराच्या माध्यमातून सांगितलेले आहे की, जिल्हा शल्य चिकित्सक श्री. कुलकर्णी यांनी बदली करण्यात येईल आणि या प्रश्नाच्या उत्तराच्या अनुषंगाने येणाऱ्या अडचणी मी येथे मांडल्याच आहेत, त्यामुळे माहिती लपविण्याचा प्रश्नच नाही.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुद्धीत प्रत / शोधनासाठी नाही

प्रा. फौजिया खान ...

तिकडे कर्मचारी येण्यास तयार नसतात त्यामुळे येथे कर्मचारी कायमस्वरुपी राहण्यासाठी आपल्याला नियोजन करावे लागणार आहे.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात अनेक वेळा या सभागृहात प्रश्न उपस्थित झालेला आहे. दोन वर्षापूर्वी माननीय शेट्टीसाहेबांनी या सभागृहात सांगितले होते की, टेक्नीशियन्स पाठविले जातील. सन्माननीय मंत्रीमहोदयांच्या सांगण्या प्रमाणे कोल्हापूरवरुन टेक्नीशियन्स आले होते परंतु ते फक्त तीन महिनेच या ठिकाणी राहिले. त्या तीन महिन्यानंतर सिंधुदुर्ग जिल्हा रुग्णालयाला कोणत्याही प्रकारे टेक्नीशियन्स मिळालेले नाहीत. त्यामुळे या टेक्नीशियन्सची व्यवस्था करुन दिली जाणार आहे काय ? चतुर्थ श्रेणीची पदे भरण्याचे माननीय मंत्रीमहोदयांनी मान्य केले होते परंतु अद्यापपर्यंत चतुर्थश्रेणीची पदे भरली गेली नाहीत. त्यामुळे सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेत चतुर्थ श्रेणीची पदे तातडीने भरली जाणार आहे काय ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, चतुर्थ श्रेणीची पदे भरण्याचे अधिकार जिल्हाधिका-यांना देण्यात आलेले आहेत परंतु इमर्जन्सी कॅडरची पदे सोडून बाकीच्या पदावर निर्बंध असल्यामुळे आपल्याला चतुर्थ श्रेणीची पदे भरता येत नाही.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांच्या विषयी किंवा टेक्नीशियन्स विषयी या सभागृहात दर अधिवेशनात सातत्याने चर्चा होत असते असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य आग्रही आहेत की, किमान सिंधुदुर्ग जिल्हा रुग्णालयात बेसीक आरोग्य सुविधा तरी उपलब्ध करुन देण्यावत यावी. आम्ही हाय-फाय सुविधा मागत नाही परंतु बेसीक सुविधा तरी उपलब्ध करुन देण्यात यावी. उत्तरात असे म्हटले आहे की, क्ष-किरण तंत्रज्ञ, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, इसीजी तंत्रज्ञ, रक्तपेढी तंत्रज्ञ उपलब्ध आहे. लेप्टाच्या केसमध्ये कोल्हापूरवरुन प्लेटलेट का मागवाव्या लागल्या ? तसेच या ठिकाणच्या सिव्हील सर्जनची बदली करण्यात यावी यासाठी सभागृहातील दोन्ही बाकावरील सदस्य आवाज उठवत आहेत. सिव्हील सर्जनच्या अकार्यक्षमतेमुळे या रुग्णालयात कोणीही टिकत नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. :9534....

डॉ. दीपक सावंत...

अशी भावना निर्माण झालेली आहे. या ठिकाणचे सिव्हील सर्जन ऑर्थोपेडीक सर्जन आहेत. त्यांच्या अनुपस्थितीमध्ये त्या ठिकाणी श्री.सुतारीया जो इम्प्लांट सप्लाय करतो तो माणूस तेथील ऑपरेशन थिएटर्समध्ये बेसीक ऑपरेशन करीत असतो अशी माझी माहिती आहे. डॉ.वझेंच्या विषयी सुध्दा असाच प्रश्न उपस्थित झालेला आहे. इकडचे डॉक्टर्स गोव्याला ऑपरेट करावयास जात असतात व 10 लाखाचे बिल एनआरएचएम अंतर्गत काढले जाते. या ठिकाणचा सिव्हील सर्जन बदलला तरी देखील सिंधुदुर्ग जिल्हा रुग्णालयाची आरोग्य व्यवस्था चांगली होऊ शकेल. त्यामुळे आपण ती आरोग्य सुविधा व्यवस्थित करुन देणार आहात काय ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या दुस-या प्रश्नाचे उत्तर मी या अगोदर चार-पाच वेळेस दिलेले आहे. सिंधुदुर्ग जिल्हा रुग्णालयाची व्यवस्था लवकरात लवकर चांगली करुन देण्यात येईल. सन्माननीय सदस्यांचा पहिला प्रश्न प्लेटलेट सेपरेशन युनीटबद्दल होता. प्लेटलेटची इक्वीपमेंट आपल्याकडे आहेत. एफडीए कडून आपल्याला परवानगी मिळावयास पाहिजे होती ती मिळाली नव्हती. याची बरेच कारणे होती. त्यांनी यासंदर्भात ज्या त्रुटया काढल्या होत्या त्या त्रुटींची दुरुस्त करुन प्रस्ताव सबमीट केला आहे. 6 डिसेंबर रोजी आपला परिपूर्ण प्रस्ताव डीसीजीआयला गेलेला आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हा रुग्णालयात गोव्यातून पॅथोलॉजीचे तंत्रज्ञ सकाळी 10 वाजता येतात व दुपारी 1.00 वाजता परत निघून जातात. तसेच हे तंत्रज्ञ एक दिवस आड येत असतात याची आपणास माहिती आहे काय ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, ही बाब तपासून घेण्यात येईल. या ठिकाणी आता पर्मनंट सुविधा उपलब्ध करुन देण्याची वेळ आलेली आहे. आपला प्रस्ताव परिपूर्ण होऊन दिल्लीला पोहचला आहे. दिल्लीकडून परवानगी मिळाल्याबरोबर ब्लड बँक आणि सेपरेशन युनीट सुरु होतील.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9534.....

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील लोकांना चांगली आरोग्य सेवा मिळाली पाहिजे. तेथील लोकांना आरोग्याच्या मूलभूत सेवा उपलब्ध नाहीत. तेथील कर्मचारी कधीही वेळेवर कामावर येत नाहीत. त्याठिकाणी अंधाधुंद कारभार सुरु आहे. तेव्हा सिंधुदुर्ग जिल्हा रुग्णालयात लोकांना चांगली आरोग्य सेवा मिळण्यासाठी शासन प्रयत्न करेल काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे त्याठिकाणी काही समस्या आहेत हे मी मान्य केलेले आहे. परंतु त्याठिकाणी अजिबात आरोग्य सेवा नाही अशी परिस्थिती नाही. सिंधुदुर्ग जिल्हा रुग्णालयात सन 2008-09 मध्ये 60 हजार ओ.पी.डी. होती. सन 2009-10 मध्ये 66 हजार ओ.पी.डी. होती. तर सन 2010-2011 ऑक्टोबरपर्यंत 37 हजार ओ.पी.डी. होती. तेव्हा आकडेवारीवरुन तेथे आरोग्य सेवा पुरविण्यात येते हे लक्षात येते. त्याठिकाणी काही समस्या आहेत त्या सोडविण्याचा लवकरात लवकर प्रयत्न करण्यात येईल.....

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय राज्यमंत्री प्रा.फौजिया खान यांनी जी माहिती दिली ती खरी आहे. त्यांनी सांगितल्याप्रमाणे सिंधुदुर्ग जिल्हा रुग्णालयात मागील तीन वर्षात किती ओ.पी.डी. होती त्याची माहिती दिलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे सांगत आहे त्याप्रमाणे त्याठिकाणी अजिबात आरोग्य सेवा नाही हे खरे नाही. सन 2008-09 मध्ये 60 हजार ओ.पी.डी. होती. यावर्षी ऑक्टोबर पर्यंत 37 हजार ओ.पी.डी.होती. तर सन 2008-09 मध्ये 5380 इन डोअर पेशंट होते. सन 2009-10 मध्ये 5500 आणि यावर्षी ऑक्टोबरपर्यंत 2990 इन डोअर पेशंट होते. सन 2008-09 सोनोग्राफीचे 748 पेशंट होते. सन 2009-10 मध्ये 376 पेशंट होते, तर या वर्षी ऑक्टोबर पर्यंत 245 पेशंट होते. सन 2008-09 मध्ये सीटी स्कॅनचे 1868 पेशंट होते, सन 2009-10 मध्ये 2012 पेशंट होते, तर यावर्षी ऑक्टोबरपर्यंत 363 पेशंट होते. सन 2008-09 मध्ये 1640 रुग्णांवर मेजर सर्जरी इ ाली...मायनर सर्जरी व डिलीव्हरी संबंधातील माहिती माझ्याकडे आहे. मी ही सर्व माहिती पटलावर ठेवतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9534.....

श्री.सुरेश शेट्टी.....

सभापती महोदय, एक गोष्ट खरी आहे की, संपूर्ण राज्यात आरोग्य विभागातील काही पदे रिक्त आहेत. सर्वच विभागात ही परिस्थिती आहे. आपण आरोग्य विभागातील रिक्त पदे भरण्यास सुरुवात केली आहे. गेल्या महिन्यात वर्ग-1च्या पदांबाबत एम.पी.एस.सी.कडून 519 उमेदवारांच्या मुलाखती झालेल्या आहेत. 13 स्पेशल कॅडरची पदे भरण्याबाबत मुलाखती झालेल्या आहेत. तेव्हा ही पदे लवकरात लवकर भरुन त्यांची पोस्टींग रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग आणि इतर जिल्ह्यात करण्यात येईल. मेडीकल ऑफीसर (वर्ग-2) ची पदे भरण्याचा प्रयत्न सुरु आहे. तसेच 1100 डॉक्टर्सच्या पेपर्सची तपासणी झालेली आहे. आम्ही लवकरच त्यांच्या ऑडर्स काढणार आहोत. टेक्निशिअन्स (वर्ग-3) आणि नर्सेसची 1900 पदे भरण्याबाबत उमेदवारांच्या मुलाखती झालेल्या आहेत. या संदर्भातील आदेश 15 दिवसांत काढण्यात येतील. वर्ग 3 आणि वर्ग-4 ची पदे भरण्यात येणार नाहीत. सिंधुदुर्ग, रत्नागिरी आणि खास करुन नंदूरबार या तीन जिल्ह्यात पदे भरण्यात येतील. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मेडिकल ऑफीसर, टेक्निशिअन्स वा इतर अधिकाऱ्यांची नियुक्ती केल्यानंतर..

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9534..श्री.सुरेश शेट्टी.

ते कोणाची ना कोणाची तरी शिफारस घेऊन येतात आणि सांगतात की मला या जिल्हयात काम करावयाचे नसल्यामुळे कोल्हापूर वा अन्य जिल्हयात माझी बदली करण्यात यावी.

डॉ.दीपक सावंत : ज्यांनी शिफारस केली आहे त्याची नावे पटलावर ठेवा.

श्री.सुरेश शेट्टी : जी वस्तुस्थिती आहे तीच मी आपल्याला सांगितली आहे. यासाठी आपल्याला एकत्र बसून काही तरी उपाययोजना ठरवावी लागणार आहे. मी आपल्याला पुन्हा सांगतो की, एखाद्या अधिका-याची सिंधुदुर्ग जिल्हयात बदली झाल्यानंतर दहा पंधरा दिवसात तो येऊन सांगतो की मला या जिल्हयात काम करावयाचे नसल्यामुळे पुणे आणि कोल्हापूर या जिल्हयात मला पाठविण्यात यावे. अधिका-याच्या बदलीसाठी अनेक सदस्य माझ्याकडे येतात तेव्हा माझ्या स्तरावर त्यांच्या बरोबर मी चर्चा करण्याचा प्रयत्न केला आहे. या जिल्हयात अधिकारी काम करण्यास का तयार नाहीत याबाबतीत दोन्ही सभागृहाच्या सन्माननीय सदस्यांनी तसेच पालक मंत्र्यांनी एकत्र बसून चर्चा केली पाहिजे. या दोन जिल्हयासाठी तसेच नंदूरबार जिल्हयासाठी रिक्रुटमेंन्ट रुल्समध्ये काही बदल करावा लागला तर तो करण्याची देखील शासनाची तयारी आहे अधिवेशन संपल्यानंतर रत्नागिरी, रायगड आणि सिंधुदुर्ग या तीन जिल्हयाच्या पालक मंत्र्याची मी मंत्रालयात बैठक घेतो.अधिका-याच्या बदलीचा मुद्दा गंभीर स्वरुपाचा आहे. आपण जरी 100 टक्के रिक्त पदे भरली तरी सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये काम करण्यास अधिकारी तयार नाहीत तसेच रत्नागिरी जिल्हयामध्ये देखील काम करण्यास तयार नाहीत, याचे मूळ कारण काय आहे हे शोधून काढणे गरजेचे आहे. हे मी सभागृहास सांगू इच्छितो आणि त्यासाठी मंत्रालयात लवकरात लवकर बैठक घेऊन निर्णय घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कोयना (जि.सातारा) धरणातून सोडण्यात येणा-या पाण्यामुळे धरण परिसरातील गावात दरवर्षी पूर येऊन होत असलेले नुकसान

(2) * 10320 **डॉ.नीलम गो-हे, श्री.परशुराम उपरकर,श्री.किरण पावसकर :सन्माननीय जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री** पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यात वीज पुरवठा करणा-या कोयना (जि.सातारा) धरणातून वीज निर्मिती झाल्यानंतर ते पाणी वशिष्टी नदीत सोडले जाते तर कोयना धरणातील पाणीसाठा कमी करण्यासाठी धरणाचे दरवाजे उघडले जातात, त्यामुळे चिपळूण शहरात व सातारा जिल्हयातील पाटण तालुक्यातील धरण परिसरातील गावांना पाण्याचा/पुराचा त्रास होत असून दरवर्षी लाखो रुपयांचे नुकसान होते,हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या भागातील लोकांना दरवर्षी पावसाचे तीन महिने जीव मुठीत घेवून रहावे लागत असून या काळात त्यांचा जगाशी संपर्क राहत नाही, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती प्रतिबंधात्मक उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप उपाययोजना केली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री.सुनील तटकरे : (1) हे खरे नाही

(2) प्रश्न उद्‌भवत नाही

(3) प्रश्न उद्‌भवत नाही

(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, सातारा जिल्हयातील कोयनानगरची आणि रत्नागिरी जिल्हयातील चिपळूणची परिस्थिती आपल्याला देखील माहीत आहे. ज्यावेळी कोयना धरणातील पाणी सोडले जाते त्यावेळी धरणातील पाणी व वशिष्ठी नदीतील पाणी एकत्रितपणे पुढे चिपळूण शहरापर्यंत जाते. त्यावेळी चिपळूण शहरात पूर आल्यामुळे संपूर्ण बाजारपेठेत पाणी शिरते आणि लोक रात्रभर झोपत नाहीत. केन्द्रीय मंत्र्यांपासून अनेकांना त्या ठिकाणी भेट द्यावी लागते. बाजारपेठेबरोबरच शेती आणि औद्योगिक वसाहतीचे नुकसान होत असते. या ठिकाणी उत्तर देत असतांना हे खरे नाही असे सांगितले आहे. तेव्हा चिपळूण शहरामध्ये पूरच येत नाही असे शासनाला म्हणावयाचे आहे काय की धरणातील पाणी नदीत सोडले जात नाही ? कोर्टामध्ये साक्षीदार खोटे सांगतो किंवा होस्टाईल होऊन जातो तशा प्रकारची उत्तरे माननीय मंत्र्यांनी देता कामा नये. या ठिकाणी जे उत्तर देण्यात आलेले आहे ते असत्य आहे. माननीय मंत्री महोदय त्या ठिकाणी भेट देतात असे असतांना पाणी सोडल्यानंतर पूर येत नाही असे असत्य उत्तर का देण्यात येत आहे, उत्तरामध्ये माननीय मंत्र्यांना बदल करावयाचा आहे काय ?

श्री.सुनील तटकरे : प्रश्नाचे उत्तर बरोबर आहे. या ठिकाणी होस्टाईल होण्याचे काही कारण नाही. सन्माननीय सदस्यांनी पहिला प्रश्न असा विचारला होता की, राज्यात वीज पुरवठा करणा-या कोयना (जि.सातारा) धरणातून वीज निर्मिती झाल्यानंतर ते पाणी वशिष्टी नदीत सोडले जाते तर कोयना धरणातील पाणी साठा कमी करण्यासाठी धरणाचे दरवाजे उघडले जातात त्यामुळे चिपळूण शहरातील व सातारा जिल्हयातील पाटण तालुक्यातील धरण परिसरातील गावांना पाण्याचा /पुराचा त्रास होत असून दरवर्षी लाखो रुपयांचे नुकसान होते हे खरे आहे काय ?या प्रश्नाला हे खरे नाही असे उत्तर देण्यात आले आहे. धरणाचे दरवाजे उधडले जातात त्याचबरोबर वीज निर्मिती केल्यानंतरसुध्दा पाणी सोडण्यात येते परंतु त्यामुळे पूर येतो ही वस्तुस्थिती खरी नाही.सन्माननीय सदस्यांनी असे सागितले की, केन्द्रीय मंत्र्यांनी त्या ठिकाणी भेट दिली होती त्याबाबत मी त्यांना सांगतो की, केन्द्रीय मंत्री श्री. शरद पवार साहेबांनी 2005 साली त्या शहराला भेट दिली होती त्यावेळी मोठया प्रमाणावर अतिवृष्टी झाली होती व संपूर्ण राज्यात अनेक ठिकाणी पूर आला होता.त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफिक प्रश्न विचारल्यास मी त्याचे उत्तर देण्यास तयार आहे.

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे : या संदर्भात कोणती प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येणार आहे ?

श्री.सुनील तटकरे : वशिष्ठी नदीची पाण्याची पातळी किंवा वशिष्टी नदीची पूर वाहण्याची क्षमती किती आहे त्यासबंधी मी आपल्याला सांगतो की, चिपळूण शहरातील वशिष्टी नदीच्या पाण्याची पातळी सरासरी साडेचार मीटर इतकी आहे आणि वशिष्टी नदीची पूर वाहण्याची क्षमता 957.23 क्युसेक्स इतकी आहे. समुद्राला ज्यावेळी भरती येते.

नतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 10320....

श्री. सुनील तटकरे...

त्यावेळी खाली वाहून जाणाऱ्या 67 टीएमसी पाण्याखेरीज सहयाद्रीच्या डोंगरमाथ्यावर पडणारे पाणी सुध्दा प्रचंड असल्यामुळे केवळ त्याठिकाणी सोडल्या जाणा-या पाण्यापुरता प्रश्न मर्यादित नाही. पावसाच्या दिवसात सहयाद्री पर्वताच्या कडेकपारीमध्ये फार मोठया प्रमाणावर पाऊस पडत असतो. त्यामुळे काही वेळेला समुद्राचे उधाण आणि अतिवृष्टी एकाच वेळी होते त्यावेळी चिपळूण शहरामध्ये पूर येतो ही वस्तुस्थिती खरी आहे. त्याचा संबंध येथील पाणी सोडण्याशी नाही.

श्री. हुसेन दलवाई : सभापती महोदय, मंत्रिमहोदय त्या भागातील असल्यामुळे आणि ते रत्नागिरी जिल्हयाचे पालकमंत्री राहिले असल्यामुळे मी त्यांचे लक्ष वेधतो. मुख्य प्रश्न असा आहे की, ज्यावेळी मोठया प्रमाणात पाऊस पडतो त्यावेळी धरणाला धोका निर्माण होऊ नये म्हणून शासकीय यंत्रणेकडून जनतेला पूर्व सूचना न देता बऱ्याच वेळा पाणी सोडले जाते. हे पुराचे पाणी चिपळूणच्या बाजारपेठेमध्ये नाही तर पागेपासून, खेर्डीपासून, कालूस्यापर्यंत सर्व ठिकाणी भरते. त्यामुळे या गावांना अतिशय धोका निर्माण होतो. त्यादृष्टीने धरणामधून पाणी सोडण्याअगोदर लोकांना सांगितले जाईल काय? दुसरा प्रश्न असा की, नदीमध्ये मोठया प्रमाणात गाळ साचल्यामुळे सुध्दा पुराचा धोका निर्माण होतो, तो गाळ काढण्याच्या दृष्टीने काही प्रयत्न होतील काय?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, पावसाळयामध्ये अति पर्जन्यवृष्टी होते त्या दरम्यान कोयना धरणाच्या सहा वक्राकार दरवाजामधून पाणी सोडतांना धरणाच्या सुरक्षितेस सर्वोच्च प्राधान्य देऊन धरणाच्या मंजूर जलाशय परिचलन सूचीनुसार आवश्यक परिस्थितीनुसार पाणी सोडले जाते. सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. हुसेन दलवाई यांनी विचारल्याप्रमाणे हे पाणी सोडत असतांना धरणाच्या खालील भागामध्ये कोठेही पूर परिस्थिती निर्माण होणार नाही याची प्रामुख्याने काळजी घेण्यात येते. यासाठी शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार सर्व त्या खबरदाऱ्या घेतल्या जातात. पुराच्या वेळी धरणामधून पाणी सोडत असतांना व इतर धरणातून सोडलेला विसर्ग या सर्व बाबी विचारात घेऊन धरणाखालील नदीपात्राजवळील गावांना महसूल खात्यामार्फत सतर्क करण्यात येते. आवश्यक ते बिनतारी संदेश सर्व खात्यांना देण्यात येतात. तसेच, 1 जून पासून 31 ऑक्टोबरपर्यंत कोयना धरणासभोवती अहोरात्र पूर नियंत्रण कक्ष कार्यरत असतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, त्यांनी दुसरा प्रश्न उपस्थित केला, त्याबाबत सांगू इच्छितो की, सन 2006-07 मध्ये विद्यमान उप मुख्यमंत्री हे या विभागाचे मंत्री असतांना त्यांनी वशिष्ठी नदीच्या पात्रामधील गाळ काढण्यासाठी आमच्या विभागाची यंत्रणा उपलब्ध करुन दिली होती. त्यामुळे 2.57 लक्ष घ.मी. गाळ उपसला गेल्यामुळे नदी पात्राची सुमारे एक ते दीड मीटर अधिकची खोली निर्माण झाली आहे. त्याचा परिणाम सन 2008-09 व सन 2009-10 मध्ये पुराचा फारसा धोका उत्पन्न झालेला नाही.

श्री. हुसेन दलवाई : सभापती महोदय, त्या नदीला आलेल्या पुरामध्ये बरीच माणसे वाहून जातात, पाण्यामध्ये डुबतात. तेव्हा आपले अधिकारी कार्यालयामध्ये बसून अशाप्रकारची लेखी उत्तरे तयार करतात, ती खरी नसतात. मी याठिकाणी सांगितलेली वस्तुस्थितीची आपल्याला कल्पना आहे. माझे असे म्हणणे आहे की, यानंतर सर्व ठिकाणी गाडी फिरवून धोक्याची सूचना देण्यात येईल काय?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेप्रमाणे ज्यावेळी धरणामधून पाणी सोडण्याची स्थिती निर्माण होईल त्यावेळी तशाप्रकारे गाडी फिरवून चिपळूणच्या परिसरातील लोकांना आवश्यक त्या सूचना देण्यात येतील.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, वशिष्ठी नदीचे पाणी समुद्रामध्ये वाहून जाते, ते पाणी वाया जाते. ते पाणी इतरत्र वळविण्याकरिता या सभागृहात अल्पकालीन सूचनेव्दारे तीन वेळा चर्चा उपस्थित केली होती. मंत्री महोदयांनी नवीन खात्याचा कार्यभार घेतल्यानंतर वर्तमानपत्रात छापून आलेली बातमी मी वाचली. त्यांनी असे सांगितले की, कोयना धरणामधील वाया जाणारे पाणी मुंबई शहरापर्यंत नेण्यात येईल व शिल्लक राहिलेले पाणी गोव्यापर्यंत नेण्यात येईल. त्यांच्या या निवेदनामुळे मला समाधान वाटल्यामुळे मी मंत्री महोदयांचे अभिनंदन करण्यासाठी तात्काळ दूरध्वनी केला. परंतु त्यांनी माझा दूरध्वनी घेतला नाही. मी केलेली मागणी बऱ्याच दिवसानंतर त्यांनी मान्य केली. त्यामुळे शासन याबाबतीत निर्णय घेणार आहे काय?

(यानंतर श्रीमती थोरात)

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.10320..

श्री. जयंत प्र. पाटील ....

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांचा प्रश्न विचारण्याचा उद्देश या ठिकाणी यापुढे या पाण्यापासून धोका निर्माण होऊ नये असा आहे. सन्माननीय मंत्री महोदयांनी या विभागाचा कार्यभार हाती घेतल्यापासून त्यांनी नेहमी प्रमाणे चांगला अभ्यास करायला सुरुवात केलेली आहे. माननीय मंत्री महोदयांनी अनेक खात्यांचा कार्यभार सांभाळलेला आहे. त्यामुळे मला आनंद वाटतो. सभापती महोदय, हे पाणी कमी खर्चामध्ये मुंबई पर्यंत नेऊ शकतो. पर कि.मी. 4 कोटी रुपये खर्च केले आणि पाईप लाईनने पाणी नेले तर 700 कोटी रुपये खर्च करुन आपण हे पाणी मुंबई पर्यंत नेऊ शकतो. सभापती महोदय, आपण देखील यासंबंधीचा अभ्यास केलेला आहे. यासंदर्भात आपण परिषदा घेतल्या होत्या. मुंबईच्या परिसरात जी नवीन धरणे होतात त्याच्यापेक्षा कमी खर्चाने हे पाणी मुंबईमध्ये येऊ शकते याचा राज्य शासन गांभीर्याने विचार करील काय?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य माझे परममित्र आहेत. जीवलग आहेत.

उप सभापती : आपण परममित्र म्हणता आणि त्यांचे फोन घेत नाही.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे ती वस्तुस्थिती खरी आहे. कोयनेचे वशिष्ठी नदीतून जे पाणी वाया जाते ते पाणी मुंबईला आणण्यापूर्वी रत्नागिरी आणि रायगड जिल्हयामध्ये सिचंनाचे लाभक्षेत्र तयार करता येईल काय आणि त्याचबरोबर आजूबाजूच्या गावांना पिण्याच्या पाण्यासाठी ते उपलब्ध करता येईल काय या सहीत उरलेले पाणी मुंबईला किंवा तत्सम औद्योगिकरणासाठी आणता येईल काय या सर्व बाबींचा राज्य सरकारने सर्वंकष विचार केला आहे. त्याबाबतीत एक यु.ओ.आय. आता दिलेला आहे. चार महिन्यात तशा पध्दतीच्या निविदा मागविलेल्या आहेत. यामध्ये वीज उत्पादन केल्यानंतर केवळ 67 टी.एम.सी. पाणी सोडले जाते. त्याच्या खेरीज सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी उल्लेख केल्याप्रमाणे सहयाद्रीच्या कडयाकपाऱ्यात पडणाऱ्या पाण्याचे अजून मोजमाप झालेले नाही. ते पाणी वेगळे आहे. पण 67 टी.एम.सी. पाणी निश्चितपणे आहे. हे पाणी वीज निर्मिती केल्या नंतर

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सोडण्यात येते. त्याच्या व्यतिरिक्त आणखी जे पाणी आहे, त्याचेही मोजमाप केले जावे, पाण्याचा एकंदर साठा किती आहे,तो पाण्याचा साठा मुंबईपर्यंत आणत असताना तो पाईपलाईनद्वारे आणावा किंवा टनेलद्वारे आणावा याबाबतचा अभ्यास करण्यासाठीच यु.ओ.आय. प्रसिध्द केलेला आहे. सभापती महोदय, हे यु.ओ.आय. मार्च अखेर किंवा एप्रिलच्या पहिल्या आठवडयात येतील ते मंत्री मंडळापुढे ठेवले जातील आणि त्यानंतर निविदा नक्की केल्या जातील. परंतु कुठल्याही परिस्थितीत याबाबतीतील काम प्रत्यक्षपणाने येत्या वर्षभरात सुरु करण्याचा युध्दपातळीवर प्रयत्न करण्यात येईल. सन्माननीय सदस्य, माझ्या परम मित्रांनी मला फोन केला असे ते सांगत आहेत. परंतु त्यांचे दोन नंबर माझ्याकडे आहेत.

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांचे मोबाईल नंबर सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावेत.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, ते मोबाईल नंबर सभागृहाच्या पटलावर ठेवण्यासाठी पुढच्या अधिवेशनापर्यंत थांबावे लागेल. कारण ते नंबर मिळविण्यासाठी काही कालावधी नक्की जाईल. (अडथळा) आपले म्हणणे खरे आहे. एकमेकांचे काम असल्यावर एकमेकांना संपर्क करणे हे काळाच्या ओघात सुरु असते. त्यामुळे त्यांचा वाढदिवस असला की मी त्यांना फोन करतो. माझा वाढदिवस असला की, ते मला फोन करतात. कधी मला अडचण आली तर मी त्यांना फोन करतो. त्यांना काही अडचण आली तर ते मला फोन करतात. असा आमचा चांगला संवाद आहे आणि तो या पुढेही कायम रहावा एवढीच माझी अपेक्षा आहे.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कुडाळ (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील कर्ली नदीवरील टाळंबा प्रकल्पाबाबत

(३) * ९७९७ श्री.परशुराम उपरकर , श्री.किरण पावसकर , डॉ.दिपक सावंत : सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुडाळ (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील कर्ली नदीपात्रातील टाळंबा मध्यम पाटबंधारे प्रकल्पाच्या बंधाऱ्याला पाच ठिकाणी विवरे पडली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विवरामध्ये सुमारे २० ते ३० फूट रुंदीच्या घळणी तयार झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे या भागातील शेतकऱ्यांच्या भातशेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या बंधाऱ्याच्या निकृष्ट बांधकामाबाबतची चौकशी शासनाने केली आहे काय,

(५) असल्यास, त्यात काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच सदर प्रकल्पाच्या दुरुस्तीकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे ?

श्री.सुनील तटकरे : (१) हे खरे नाही.

(२) मुख्य धरणाचे काम बांधकामाधीन असून काही प्रमाणात भरावाचे काम झाले आहे.

अतिवृष्टीमुळे त्या भरावाच्या उतारावर घळी (Rain Cuts) पडल्या आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

निविदा शर्तीनुसार घळीमधील वाहून गेलेला कवच भराव पुनर्स्थापित करण्याची जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची आहे.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, मी विचारलेल्या प्रश्नामध्ये तिवरे असा शब्दप्रयोग केला होता. प्रश्नाच्या उत्तरामध्ये घळी पडल्याचे मान्य केलेले आहे. मी त्या धरणावर स्वत: गेलो होतो. त्या ठिकाणी 200 मीटरवर दोन ते तीन ठिकाणी 30 ते 40 फुटाच्या घळी पडलेल्या आहेत. भराव पूर्णपणे वाहून केलेला आहे. तेथील शेतकरी मला भेटलेले आहेत. शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे हे खरे आहे काय? सभापती महोदय, लेखी उत्तरात चुकीचे उत्तर देण्यात आलेले आहे. तेव्हा यासंदर्भात उच्चस्तरीय यंत्रणेकडून चौकशी करण्यात येईल काय?

यानंतर श्री. बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 9797 .....

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, या धरणाचे काम फार मोठे आहे. त्यांची अंदाजित किंमत माझ्याकडे आहे. ती मी पटलावर ठेवण्यास तयार आहे. उत्तरात म्हटल्याप्रमाणे तीरावरील भरावाच्या बांधकामाला त्या ठिकाणी उतारावर घळी पडली ही वस्तुस्थिती आहे. परंतु घळी पडल्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतामध्ये पाणी जाऊन किंवा माती जाऊन तशा पध्दतीचे काही नुकसान झालेले नाही. तरी सुध्दा सन्माननीय सदस्य या ठिकाणी जे सांगत आहेत ते खरे आहे असे मानून पुन्हा एकदा महसूल विभागाच्या यंत्रणेला आणि आमच्या विभागाच्या यंत्रणेला सूचना देण्यात येतील की, याची पुन्हा प्रत्यक्षपणे पाहणी करावी. या घळीमुळे तशा पध्दतीचे जर काही नुकसान झाले असेल तर शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याची तजवीज ठेवली जाईल.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, या बंधाऱ्याची धूप होऊन दोन्हीकडील दगड आणि माती जास्तीत जास्त खाली आल्यामुळे बाजुला शेती करणाऱ्या 25 ते 30 एकरमधील शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे. मी फोटोग्राफ्स आणलेले आहेत ते आपल्याकडे पाठवितो. ज्यांचे नुकसान झाले आहे त्या शेतकऱ्यांच्या 25 ते 30 एकरमध्ये शेती होऊ शकत नाही. त्यांना शासन नुकसानभरपाई देणार कय ? या बंधाऱ्यांची धूप झालेली आहे. त्यासंदर्भात क्वालिटी कंट्रोल तर्फे चौकशी केली जाणार आहे काय ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, ज्यावेळेला अशा पध्दतीचे काम केले जाते त्यावेळी मोठ्या प्रमाणावर पाऊस झाला किंवा अतिवृष्टी झाली तर अशी विवरे पडत असतात. ते काम संबंधित ठेकेदाराने त्यांच्या खर्चाने करुन देणे अपेक्षित असते. सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी दुसरा जो मुद्दा उपस्थित केला त्याचे उत्तर मी आधी दिलेले आहे. आम्ही त्याची पाहणी करु. जर शेतपिकाचे, उभ्या पिकाचे नुकसान झाले असेल तर तेही देण्यात येईल. शेतीमध्ये काही माती गेलेली असेल आणि त्यामुळे ती शेती पुढची लागवड करण्यासाठी अयोग्य झाली असेल तर ती काढून पूर्ववत स्थितीत करुन देण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 9797 .....

श्री. राजन तेली : सभापती महोदय, सिंधुदुर्ग, रत्नागिरी आणि कोकणातील या मोठ्या प्रकल्पामध्ये 17 हजार हेक्टर जमीन पाण्याखाली येणार आहे. हा प्रकल्प 1982 मध्ये मंजूर झाला. गेली 15 वर्षे या प्रकल्पाचे काम सुरु आहे. हे धरण प्रत्यक्षात कोणत्या वर्षी पूर्ण होईल ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, या धरणाची किंमत 816 कोटी रुपये असून आतापर्यंत या कामावर प्रत्यक्षात जवळपास 84 कोटी रुपये खर्च झालेले आहेत. यामध्ये भूसंपादनाच्या आणि पुनर्वसनाच्या कामासाठी सुध्दा खर्च करण्यात आलेला आहे. या वर्षीच्या अंदाजपत्रकामध्ये आम्ही 10 कोटी रुपयांची तरतूद ठेवलेली आहे. भूसंपादनासाठी लागणाऱ्या निधीची रक्कम सुध्दा मोठी आहे. यामध्ये अडचण एवढीच आहे की, यातील 370 हेक्टर क्षेत्र वनसज्ञ ोखाली येते. त्यापैकी वन जमीन 287 हेक्टर आहे. त्याच्या बाबतीत वन विभागाची तत्वत: मान्यता मिळालेली आहे. 370 हेक्टरच्या संदर्भात वन विभागाच्या मंजुरीसाठी त्यांच्याकडे प्रस्ताव दिलेला आहे. या कामासाठी एनपीयूची रक्कम भरण्यासाठी जवळपास 57 कोटी 60 लाख रुपयांचा निधी लागणार आहे. मला जाणीव आहे की, हा कोकणातील महत्वाकांक्षी प्रकल्प आहे. यातून सिंचनाचे लाभक्षेत्र वाढीला लागेल. मी स्वत: याबाबतीत वित्त विभागाकडे पाठपुरावा करण्याचा प्रयत्न करीन आणि या वर्षीच्या अंदाजपत्रकात भरीव तरतूद उपलब्ध करुन येत्या चार वर्षात हा प्रकल्प पूर्ण करण्याचे काम निश्चितपणे केले जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MMP/

नाशिक जिल्हा शल्य चिकित्सक यांना लाच लुचपत प्रतिबंधक अधिकाऱ्यांनी लाच घेताना केलेली अटक

(४) * ९१२४ श्री.दिलीपराव सोनवणे , श्री.वसंतराव खोटरे : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हा शल्य चिकित्सक यांना लाच लुचपत प्रतिबंधक अधिकाऱ्यांनी दिनांक २ ऑक्टोबर, २०१० रोजी लाच घेताना पकडले तसेच त्यांच्या घरात २१ लाख रुपयाची रोख रक्कम जप्त करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शल्य चिकित्सकाने जळगांव येथे देखील लाच घेतली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, तद्नुषंगाने उपरोक्त अधिकाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. फौजिया खान, श्री.सुरेश शेट्टी यांच्याकरिता : (१) होय. नाशिक जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.प्रमोद मुरलीधर चपळगांवकर यांना रु.५०० लाच स्वीकारताना दिनांक ५ ऑक्टोबर, २०१० रोजी पकडण्यात आले आहे. तसेच त्यांच्या राहत्या घरी रु.२१,१५,२५०/- रोख रक्कम मिळून आली. ती जप्त करण्यात आली आहे.

(२) होय. डॉ.चपळगांवकर, तत्कालीन निवासी वैद्यकीय अधिकारी, जिल्हा सामन्य रुग्णालय, जळगांव यांनी दिनांक २.६.२००० रोजी सामान्य रुग्णालयातील शिपाई, श्री.राजेश लक्ष्मण बावीस्कर यांचेमार्फत रु.२,०००/- लाच स्वीकारली होती.

(३) होय. दिनांक २.६.२००० रोजी जळगांव येथे झालेल्या लाचेच्या सापळा कारवाईचे अनुषंगाने दाखल गुन्ह्यात डॉ.चपळगांवकर यांची मा.न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली आहे. तसेच दिनांक ५ ऑक्टोबर, २०१० रोजी नाशिक येथे झालेल्या लाचेच्या सापळा कारवाईचे अनुषंगाने शासनाने डॉ.चपळगांवकर यांना दिनांक ६.१०.२०१० पासून निलंबीत केले आहे व त्यांचेविरुध्द दाखल गुन्ह्याचा तपास अद्याप चालू आहे.

(४) या प्रकरणी वरीलप्रमाणे कार्यवाही केली आहे.

श्री. दिलीपराव सोनवणे : सभापती महोदय, नाशिक जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रमोद मुरलीधर चपळगावकर यांना 5 ऑक्टोबर, 2010 रोजी, 500 रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक अधिकाऱ्यांनी पकडले आणि त्यांच्या राहत्या घरी 21,15,250 रुपयांची रोख रक्कम देखील मिळून आली. हाच अधिकारी जळगाव येथे सामान्य रुग्णालयात निवासी वैद्यकीय अधिकारी असताना 2 जून, 2000 रोजी 2 हजार रुपयांची लाच घेताना तेव्हाही पकडण्यात आले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 9124..... श्री. दिलीपराव सोनवणे ....

होते. हे महाशय ज्या ठिकाणी जातात त्या ठिकाणी पैसे खातात, लुबाडणूक करतात. ज्या ठिकाणी जातो त्या ठिकाणी खातो. त्यांच्या विरुध्द निलंबनाची कारवाई केलेली आहे, गुन्हा दाखल केलेला आहे आणि तपास सुरु आहे असे उत्तरामध्ये म्हटले आहे. अशा लुबाडणाऱ्या लाचखोर अधिकाऱ्यावर बडतर्फीची कारवाई शासन करणार काय ?

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9124.....

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, डॉ.चपळगांवकर यांना लाच घेताना पकडण्यात आले होते. त्यामुळे ए.सी.बी.मार्फत त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला असून त्यांना निलंबितही करण्यात आले आहे. त्यांना यापूर्वी जळगांवमध्ये 2 हजार रुपयांची लाच घेताना पकडण्यात आले होते. त्याबाबतही त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. हायकोर्टाने त्यांची निर्दोष मुक्तता केली होती. सध्या ते निलंबित आहेत. ए.सी.बी.ने त्यांच्या घरावर रेड घातली त्यावेळी काही रोख रक्कम व दागिने सापडले होते. आता त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी निश्चित केली असून विभागीय चौकशीत गुन्हा सिध्द झाला तर सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे पुढील कारवाई करण्यात येईल.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, प्रश्नाधीन सिव्हिल सर्जन हे ठाणे जिल्हयात होते, नाशिकला होते आणि जळगांवमध्येही होते. फक्त ठाण्यामध्ये असताना पकडले गेले नाही एवढाच त्यातील भाग आहे. पहिल्यावेळी ए.सी.बी.ने धाड टाकली होती त्यावेळी त्यांच्याकडे लाखो रुपये सापडले होते. परंतु हायकोर्टाने तांत्रिक बाबीवर त्यांना निर्दोष मुक्त केले. आता त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी सुरु केली जाणार आहे. कोर्टात प्रकरण असले तरी खात्याला विभागीय चौकशी करण्याचे अधिकार आहेत. त्यामुळे पहिल्या प्रकरणात ते सापडले त्यावेळी त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी सुरु केली होती काय ? कारण हे अधिकारी फार मोठया प्रमाणात लाच घेत असतात ही वस्तुस्थिती आहे. सगळया ठिकाणी त्यांची सारखीच पध्दत आहे. त्यांची मोडस ऑपरेण्डी मी सांगतो. मी स्वत: एका शिक्षकांच्या 3 लाखाच्या वैद्यकीय देयकाला मंजुरी मिळण्यासाठी त्यांच्याकडे गेलो होतो. ते आतमध्ये पैसे घेत नाहीत. मी हे सर्व प्रत्यक्षात पाहिलेले आहे. कॅमेरा असता तर दाखविले असते. परंतु त्यांच्या चेंबरमध्ये आत नेतात. कारण त्यांच्या कार्यालयात सी.सी.कॅमेरा लावलेला आहे. त्यामुळे बाहेर कोण जातात व आत कोण येतात ते समजते. ते त्यांच्या आतील चेंबरमधील उशीखाली पैसे ठेवण्यास सांगतात, पैशाला हात लावत नाहीत. तो माणूस पैसे ठेवून येतो. त्यानंतर ते सही करतात. ही काम करण्याची त्यांची पध्दत आहे. वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या देयकावर सिव्हिल सर्जनची सही लागते. शासन आमच्याकडून ऑफिशिअल

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

देयकाच्या 3 टक्के रक्कम घेते. त्याची पावती दिली जाते. कर्मचा-यांकडून 3 टक्के घेतात आणि आमच्याकडून 8 टक्के घेतली जाते. हृदय शस्त्रक्रियेचे 3 लाखाचे देयक असेल तर 9 हजार रुपये भरावे लागतात. हा आजार मान्यताप्राप्त यादीमध्ये असल्याचे प्रमाणपत्र देतात. एवढया कारणासाठी 9-10 हजार घेत असतील, 3 टक्के अधिकृपणे पैसे घेऊन पावती देत असतील तर हे बंद केले जाणार आहे का आणि अधिकृतपणे 3 टक्के पैसे घेतले जातात त्याची सिव्हिल सर्जनच्या माध्यमातून छाननी करणार आहे काय ?

श्री.सुरेश शेट्टी : सन्माननीय सदस्यांनी दोन प्रश्न विचारले आहेत. त्या डॉक्टरला ए.सी.बी.ने लाच घेताना पकडले होते, परंतु जळगांवच्या प्रकरणामध्ये न्यायालयाने त्यांना निर्दोष मुक्त केले होते. त्याबाबत ए.सी.बी.ने हायकोर्टात अपील केलेले आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद येथील खंडपीठात ते अपील प्रलंबित आहे. नाशिक येथील दुसऱ्या प्रकरणात ए.सी.बी.ने त्यांना अटक केली होती. त्या डॉक्टरविरुध्द विभागीय चौकशी नेमलेली आहे. त्यांना निलंबित केलेले आहे हे सन्माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले आहे. 3 टक्के रक्कम ऑफिशिअली भरावी लागते असेही सांगण्यात आले आहे. सिव्हिल सर्जन पैसे घेतात, परंतु ते ॲण्टीकरप्शनच्या जाळयामध्ये अडकतात. सन्माननीय सदस्यांकडे काही नावे असतील तर ती शासनाकडे द्यावीत. आम्ही त्यांच्यावर कारवाई करु.

श्री.हेमंत टकले : सिव्हिल सर्जन लाच कशाप्रकारे घेतात याचा उल्लेख आलेला आहे. ते 500 रुपयांची लाच घेताना पकडले गेले, परंतु त्यांच्या घरात 21 लाख रुपये सापडले असा उल्लेख केलेला आहे. हे कोष्टक योग्य वाटत नाही.

यानंतर श्री.शिगम

अशुधीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पहिल्यांदा हा डॉक्टर पकडला गेल्यानंतर आणि त्याच्यावर गुन्हा दाखल झाल्यानंतर त्याची निर्दोष मुक्तता झाली. म्हणजे अशी प्रकरणे कोर्टामध्ये जातांना जाणीवपूर्वक कच्चे दुवे ठेवले जातात काय की ज्या योगे या गुन्ह्यातून ते सुटू शकतील ? अशा प्रकारच्या गुन्ह्यामध्ये ही सर्व यंत्रणा एकमेकांना सहाय्य करीत असल्यामुळे कुणाला कधीच शिक्षा होण्याची शक्यता नाही. मग असे लोक एका जिल्ह्यातून दुस-या जिल्ह्यात गेल्यानंतर एका जिल्ह्यामध्ये मिळविलेल्या ख्यातीपेक्षा अधिक ख्याती मिळवितात. तेव्हा ज्या पध्दतीने गुन्हे दाखल होतात, ज्या पध्दतीने वकिलाची नेमणूक केली जाते या बाबी जाणीवपूर्वक तपासून पाहिल्या पाहिजेत. त्यादृष्टीने आपली यंत्रणा सक्षम करण्यासाठी शासन कोणती ठोस पावले उचलणार आहे ?

प्रा. फौजिया खान : सन्माननीय सदस्यांच्या सूचनांचा आदर करण्यात येईल.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, मला एका गोष्टीचे आश्यर्च वाटते. जी व्यक्ती ठाण्याला फ्रॉड करते, जळगावला फ्रॉड करते त्या व्यक्तीला नाशिकमध्ये पाठविले जाते. इतरांना शिक्षा म्हणून गडचिरोलीला पाठविले जाते. माझा मुद्दा असा आहे की, काही टेक्निकल बाबीमुळे या डॉक्टरची सुटका झाली असली तरी जेव्हा डिपार्टमेण्टला हा डॉक्टर अशा प्रकारे वागत आहे पण कुठे सापडत नाही याची खात्री होती तर त्याला सर्व्हिस रुल प्रमाणे डिपार्टमेण्ट नोकरीतून काढू शकत होते. जेव्हा तो पहिल्यांदा पकडला गेल्या त्यावेळी त्याच्या विरुध्द विभागीय चौकशी का करण्यात आली नाही ? कोर्टातून सुटल्यानंतरच विभागीय चौकशी करण्यात आली ? आता या डॉक्टरवर निलंबनाची कारवाई झालेली आहे. पुढची कारवाई करुन या डॉक्टरला बडतर्फ करण्यात येणार आहे काय ? कारण अशी माणसे सर्व्हिसमध्ये राहाणे हा गुन्हा आहे.

प्रा. फौजिया खान : मी अगोदर सांगितलेले आहे की या प्रकरणी विभागीय चौकशी निश्चितपणे होईल. विभागीय चौकशीमध्ये असे वाटले तर त्याला बडतर्फ करण्याची कारवाई करु. मागील एका केसमध्ये त्याच्या विरुध्द विभागीय चौकशी केली नव्हती.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 9124....

प्रा. सुरेश नवले : सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी गोपनीय माहिती सांगितली. हा डॉक्टर आतल्या खोलीतील उशीखाली ठेवलेले पैसे स्वीकारत होता. तेव्हा आतल्या खोलीतील उशीवर काही बंधन घालणार आहात काय ?

प्रा. फौजिया खान : सजेशन फॉर ॲक्शन.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नागपूर येथील मेडिकल, मेयो व सुपर स्पेशालीटी रुग्णालयास देण्यात आलेला निधी खर्च न झाल्याने परत गेल्याबाबत

(५) * ९०६० श्रीमती शोभाताई फडणवीस : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील मेडिकल, मेयो व सुपर स्पेशालीटी या रुग्णालयांस शासनाकडून ४ कोटी ८६ लाख रुपयांचा निधी देऊनही सदर निधी खर्च न झाल्यामुळे परत गेल्याची बाब दिनांक १८ सप्टेंबर, २०१० रोजी निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, उक्त निधी परत जाण्याची कारणे काय आहेत ?

डॉ.विजयकुमार गावित : (१) व (२) हे खरे नाही.

नागपूर स्थित शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय या संस्थांकरिता सन २००९-१० या आर्थिक वर्षात राज्य योजनांतर्गत यंत्रसामुग्रीसाठी एकूण रुपये ६,५५,६९,०००/- एवढ्या मंजूर अनुदानापैकी रुपये ३,९३,२०,०००/- एवढे अनुदान खर्ची पडून रुपये २,६२,४९,०००/- एवढे अनुदान अखर्चित राहिले.

(३) सदरहू अनुदान अखर्चित राहण्याची कारणे.

१) सदरहू अनुदान बी.डी.एस.प्रणाली वर उपलब्ध न झाल्याने निधी खर्ची पडू शकला नाही.

२) मंजूर निधीमध्ये कपात झाल्याने यंत्र सामुग्री खरेदीबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आले नाहीत.

श्रीमती शोभा फडणवीस : निधी अखर्चित राहिला हे उत्तरामध्ये मान्य केलेले आहे. बीडीएस मधून ऑन लाईनने पैसे दिले जातात. परंतु ती प्रणालीच उपलब्ध नसल्यामुळे हा निधी खर्च होऊ शकला नाही. त्यानंतर पुन्हा या खर्चाचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत असे उत्तरामध्ये नमूद केलेले आहे. रु.6,55,69,000/- मंजूर अनुदानापैकी 3,93,20,000/- रु. खर्च झालेले आहेत. गरीब रुग्णांना चांगली औषधे मिळण्यासाठी, त्यांना चांगले उपचार मिळण्यासाठी हा निधी खर्च करावयाचा आहे. विदर्भाचा बॅकलॉग आहे म्हणून आम्ही ओरड केली तर पैसे दिलेले आहेत असे सांगितले जाते. परंतु दिलेले पैसे खर्च केले जात नाहीत ही वस्तुस्थिती आहे. तेव्हा या निधीतील राहिलेला उर्वरित निधी आणि अधिक या वर्षाचा येणारा निधी एकत्रितरीत्या ताबडतोबीने देण्यात येणार आहे काय ?

डॉ. विजयकुमार गावित : सन 2009-2010 या आर्थिक वर्षामध्ये तिन्ही संस्थांना यंत्रसामग्री खरेदीसाठी 6,55,69,000/- इतका निधी मंजूर केला होता.

...नंतर श्री. भोगले....

अशासकीय प्रत / ग्रीप्रक्षेपणासाठी नाही

परंतु बीडीएस प्रणालीच्या माध्यमातून टप्प्याटप्प्याने निधी वितरित करीत असताना त्यापैकी रु.3,93,20,000/- वितरित केले. ही सर्व प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी रु.6,55,69,000/- एवढी रक्कम द्यावयाची होती. त्यामध्ये टेंडर मागविणे, ते फायनल करणे इत्यादी सर्व कामासाठी त्यांना आदेश दिलेले होते. हा पूर्ण निधी आला नाही. यंत्रसामुग्री प्राप्त झालेली होती. निधी द्यायचा शिल्लक राहिलेला आहे. विदर्भाला पैसा देत नाही असे माननीय सदस्यांनी सांगितले. संपूर्ण महाराष्ट्राचे 17 कोटी रुपये बीडीएसवर आलेले नाहीत. या 17 कोटी रुपयांपैकी 2,62,49,000 रुपये एवढी तरतूद पावसाळी अधिवेशनात केली होती. त्यातील 49 लाख रुपये द्यायचे शिल्लक होते. एवढी रक्कम हिवाळी अधिवेशनात द्यायची बाकी आहे, ती पूर्ण रक्कम दिली जाईल.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी उत्तर दिले की, यामध्ये कपात झाली आहे. पावसाळी अधिवेशनात तरतूद केली असेल तर कपात झाली असे उत्तर का दिले? सभागृहाची दिशाभूल का केली जात आहे? एकीकडे उत्तर द्यायचे की, कपात झाली त्यामुळे निधी येणार नाही. दुसरीकडे सांगितले जाते की, जुलैच्या अधिवेशनामध्ये तरतूद केली असून आम्ही निधी देणार आहोत. खरे खोटे काय आहे?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, 2009-2010 या वर्षासाठी तरतूद केलेली होती. ती तरतूद बीडीएसवर मार्चपर्यंत वितरित व्हावयास पाहिजे होती. 2,62,49,000 रुपये वितरित झाले नव्हते. यावर्षी 73 कोटी रुपये मिळाले आहेत. त्यातून पावसाळी अधिवेशनात बहुतांश निधीची तरतूद केली आणि तो निधी वितरित केला आहे. उर्वरित 49 लाख रुपये द्यायचे शिल्लक राहिले आहेत. त्या रक्कमेची तरतूद हिवाळी अधिवेशनात केली आहे. माननीय सदस्यांनी सांगितले की, विदर्भाला निधी मिळत नाही. तरतूद केलेली असल्यामुळे ती गृहीत धरुन उत्तर दिले आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, नागपूरमधील हे अतिशय महत्वाचे मेडिकल कॉलेज आहे. या मेडिकल कॉलेजसाठी जी यंत्रसामुग्री खरेदी करण्यात आली त्यासाठी तरतूद करण्यासंबंधीचा हा प्रश्न आहे. खरेदी केलेली यंत्रसामुग्री कोणकोणती आहे? या यंत्रसामुग्री व्यतिरिक्त निधीची मागणी केलेली आहे, त्याबाबत शासन किती दिवसात निर्णय घेणार आहे?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विजयकुमार गावीत : जी यंत्रसामुग्री खरेदी करण्यात आली त्यामध्ये हायपर बेरीक ऑक्सीजन चेंबर, व्हेंटिलेटर, ॲडव्हान्स एण्डोस्कोपी युरॉलॉजिकल विथ ऑल ॲक्सेसरीज वगैरे बाबींचा समावेश आहे. ही यंत्रसामुग्री प्राप्त झालेली आहे. यावर्षी उर्वरित जी रक्कम मागितली आहे ती मार्चपूर्वी देण्यात येईल.

श्री.माणिकराव ठाकरे : जी यंत्रसामुग्री खरेदी केली त्या व्यतिरिक्त इतर यंत्रसामुग्री घेण्याकरिता मेडिकल कॉलेजकडून शासनाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केला आहे. त्या प्रस्तावामध्ये कोणकोणत्या यंत्रसामुग्रीचा समावेश आहे? त्या प्रस्तावाला केव्हा मान्यता मिळेल?

डॉ.विजयकुमार गावीत : सभापती महोदय, मागाहून 11 कोटी रुपयांची मागणी केली आहे. या 11 कोटी रुपयांमधून कॉटरी विथ ॲक्सेसरीज, फावलर बेड, बेड साईड मॉनिटर, सिरींज इन्फ्युजन पंप, व्हेंटिलेटर, 12 चॅनल ईसीजी मशीन, डिफिब्रिलेटर, न्यूरो सर्जिकल इन्स्ट्रुमेंट, व्हिडिओ कोलोनोस्कोप, सर्जिकल ऑपरेटींग मायक्रोस्कोप/मायक्रोस्कोपी स्पाईन सर्जरी, हायड्रोलिक ऑपरेशन टेबल या यंत्रसामुग्रीचा समावेश आहे. 11 कोटी रुपयांची मागणी केली असून त्या निधीमधून ही यंत्रसामुग्री देणार आहोत.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मेयो रुग्णालयाचा प्रश्न या आणि मागील अधिवेशनात सातत्याने गाजला आहे. प्रश्न असा आहे की, मेयो रुग्णालयाचे बीओटी तत्वावर पुनरुज्जीवन करण्याचा निर्णय बदलून घेतला का? राज्य शासनाकडून एकूण किती निधी मिळणार होता? याबाबत शासनाचा निर्णय झाला आहे का? आमच्या माहितीनुसार या रुग्णालयासाठी पॅकेज जाहीर केले आहे. पॅकेज जाहीर केले नसेल तर तसे मंत्रीमहोदयांनी सांगावे. जी यंत्रसामुग्री घेतली आहे ती ऑपरेट करण्यासाठी पुरेसा तांत्रिक कर्मचारीवर्ग उपलब्ध आहे का? अन्यथा ही यंत्रसामुग्री निकामी पडून राहणार आहे.

नंतर के.1...

अशुधारित प्रत / मुद्रणेसाठी नाही

ता. प्र. क्र. 9060.....

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, आपण जी उपकरणे घेतलेली आहेत त्यांची मागणी या हॉस्पिटलमधील प्रोफेसर लोकांनी केली त्यानुसारच घेण्यात आली आहेत. तसेच ही उपकरणे वापरण्यासाठी आवश्यक स्टाफ या रुग्णालयात आहे. तसेच सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न जो विचारला तो याच्याशी निगडित नसला तरी त्यासंबंधी मी सांगू इच्छितो की, येथे आपण एफएसआय वाढवून दिलेला आहे तरी देखील पुन्हा चर्चा करुन जी पाच एकर जागा त्यांना द्यावी लागणार आहे त्याची तपासणी करुन अंतिम निर्णय घेता येईल. जीएमसी आणि आयबीएमसी या कॉलेजच्या अनुषंगाने पॅकेजच्या निधीच्या संदर्भात मला असे सांगावयाचे आहे की, केंद्र शासनाकडून पी.जी. चे कोर्सेस सुरु करण्यासाठी आवश्यक ती उपकरणे आणि पायाभूत सुविधांसाठी निधीची मागणी केली आहे ती रक्कम मिळण्याची शक्यता आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, उत्तरामध्ये रक्कम अखर्चित राहण्याची कारणे दिली आहेत. ती अशी की मंजूर निधीत कपात झाल्यामुळे यंत्रसामुग्री खरेदीबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आले नाहीत. तसेच आपण अंदाजपत्रकात 100 कोटी इतक्या विशेष निधीची तरतूद नागपूर मेडिकल कॉलेजसाठी केली होती, त्याबाबत काय झाले आहे ?

डॉ. विजयकुमार गावित : महोदय, सन्माननीय सदस्यांनी 100 कोटीच्या विशेष निधीबाबत विचारले परंतु त्याबाबतची माहिती सध्या माझ्याकडे नाही, ती नंतर पटलावर ठेवण्यात येईल. परंतु मागील वर्षी निधी कमी मिळाला परंतु बीडीएस प्रणालीत हा निधी न टाकल्यामुळे ही परिस्थिती उद्‌भवली होती.

श्री. केशवराव मानकर : महोदय, 2.62 एवढी रक्कम बीडीएस प्रणालीमुळे थकलेली आहे. माझा प्रश्न असा आहे की, बीडीएस प्रणालीमध्ये सुधारणा होऊन ती पूर्ववत आता सुरु झालेली आहे काय, तसेच यापुढेही सुरु राहणार आहे काय ?

डॉ. विजयकुमार गावित : महोदय, बीडीएस प्रणाली आता देखील सुरुच आहे. सुरुवातीला त्यांनी काही विभागांना पैसे कमी मिळाल्याचे सांगितले त्यामुळे पैसे कमी आले म्हणून त्यांना हा निधी मिळू शकला नाही.

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तुमसर (जि.भंडारा) येथील शासकीय रुग्णालयात औषधांचा पुरवठा बंद असल्याबाबत

(6) *9908 श्री.जैनुद्दीन जव्हेरी, श्री.मोहन जोशी, श्री.राजन तेली, श्री.हुसेन दलवाई, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, प्रा.सुरेश नवले, श्री. एस. क्यू. ज़मा, श्री.एम.एम.शेख, श्री.विजय सावंत, श्री.मोहन जोशी, श्री.संजय दत्त, श्री.जयप्रकाश छाजेड : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) तुमसर (जि.भंडारा) येथे मोठ्या प्रमाणात रोगाची लागण सुरु असतानाही शासकीय रुग्णालयात गेल्या तीन-चार महिन्यापासून औषधांचा पुरवठा बंद असल्याची बाब माहे ऑगस्ट, 2010 मध्ये वा त्या दरम्यान आढळून आली, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, औषधांचा पुरवठा बंद असल्याने सर्वसामान्य व गरीब रुग्णांना बाहेरुन औषधे खरेदीचा आर्थिक भुर्दंड सोसावा लागत असल्याने त्यांच्यात तीव्र संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, शासकीय रुग्णालयांना त्वरित औषधे पुरविण्याबाबत तसेच रुग्णालयांचा औषध पुरवठा बंद होण्यास जबाबदार असलेल्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. फौजिया खान, श्री.सुरेश शेट्टी यांच्याकरिता : (1) व (2) नाही.

(3) व (4) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : महोदय, मी विचारलेल्या तिन्ही प्रश्नांना मंत्री महोदयांनी "नाही" अशीच उत्तरे दिलेली आहेत. परंतु तुमसर रुग्णालयाला औषधांचा पुरवठा झाला नाही अशा तक्रारी जिल्हा परिषद तसेच जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांकडे करण्यात आल्या हे तरी खरे आहे काय, याचे स्पष्टीकरण मंत्री महोदय देतील काय ?

प्रा. फौजिया खान : महोदय, तुमसर रुग्णालयाला औषधांचा पुरवठा झालेला असून निधीचे वितरण देखील व्यवस्थित सुरु आहे. औषधांचा कोणत्याही प्रकारे तुटवडा नाही. अधिवेशन काळात मंत्री महोदयांनी यासंबंधीची एक आढावा बैठक घेतली होती व त्या बैठकीला भंडाऱ्यातील

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लोकप्रतिनिधींनाही निमंत्रित केले होते. तसेच सध्याच्या परिस्थितीत विदर्भातील कोणत्याही जिल्ह्यात औषधांचा तुटवडा नाही.

श्रीमती शोभा फडणवीस : महोदय, ऑगस्ट महिन्यात नेमकी आजाराची साथ असते तो कालावधी लक्षात घेऊनच हा प्रश्न विचारलेला आहे. राज्य मंत्री महोदयांनी सांगितले की, यासंबंधी माननीय मंत्री महोदयांनी या अनुषंगाने अधिवेशन काळात एक आढावा बैठक घेतली होती. परंतु जी औषधे पुरविण्यात आली ती कोणत्या महिन्यात पुरविली गेली, तसेच साथीच्या रोगांसाठी त्या औषधांचा फायदा झाला की नाही ?

प्रा. फौजिया खान : महोदय, हे खरे आहे की, ऑगस्ट महिन्यात थोडीसी औषधांची अडचण निर्माण झाली होती. त्याचे कारण म्हणजे माननीय मंत्री महोदयांच्या संकल्पनेनुसार राज्यातील औषधांच्या खरेदीसाठी शासनाने जी खरेदीसंबंधीची नवीन प्रक्रिया सुरु केलेली आहे त्यानुसार या खरेदीमध्ये अधिक पारदर्शकता असावी, असा उद्देश आहे. अशा प्रकारे औषधांचा स्मूथ पुरवठा व्हावा म्हणून डायरेक्टली मॅन्युफॅक्चररकडून औषधांची खरेदी करुन ती वेअर हाऊसेसमध्ये ठेवावी असे शासनाचे धोरण होते. पण त्या धोरणाला कोर्टातून स्थगिती दिलेली आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान ...

नवीन पॉलिसी आणत असतांना गॅप झाला होता परंतु लागलीच सिव्हील सर्जन यांना औषधांचा पुरवठा करण्याचे आदेश दिले गेले होते व त्या प्रमाणे त्यांनी औषधांचा पुरवठा केलेला आहे. भंडारा येथे सुध्दा दोन महिन्याच्या अगोदर तशाच प्रकारची परवानगी देण्यात आली होती. त्यानंतर चार महिन्याची परवानगी दिली होती. ऑगस्ट महिन्यामध्ये थोडा गॅप झाला होता ही वस्तुस्थिती आहे परंतु आता तशा प्रकारची कोणतीही परिस्थिती नाही.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, आम्ही जे प्रश्न विचारले होते त्या सर्व प्रश्नांना सन्माननीय मंत्रीमहोदयांनी नाही, नाही, नाही असे उत्तर दिलेले आहे. प्रश्नामध्ये ऑगस्ट महिन्याची पर्टीक्यूलर तारीख दिलेली आहे. ऑगस्ट महिन्यामध्ये रोगाची साथ होती. सभापती महोदय, त्याच प्रश्नाच्या संदर्भात नाही, नाही असे उत्तर देऊन माननीय मंत्रीमहोदयांनी सभागृहाची दिशाभूल केलेली आहे. याबद्दल आपण काय भूमिका घेणार आहात ते आपण ठरवावे.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, ऑगस्ट महिन्यामयध्ये औषधांचा तुटवडा नव्हता. ज्या काही थोडया औषधांचा तुटवडा झाला असेल त्याबातची माहिती आता सांगता येणार नाही.

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, औषधांचा पुरवठा रेट कॉन्ट्रॅक्टने केला जातो आहे काय तसेच गरीब रुग्णांना बाहेरुन औषधे खरेदी करावे लागतात हे खरे आहे काय ? मी या ठिकाणच्या केटीएस हॉस्पीटलमध्ये आमदार म्हणून गेलो होतो. या ठिकाणच्या डॉक्टरांना आरसीवर जे औषध मिळालेले आहे त्यावर त्यांचा विश्वास नसल्याचे मला दिसून आले आहे. त्या ठिकाणच्या डॉक्टरांनी मला सांगितले की, "साहेब मी चिठ्ठी लिहून देतो आपण आरसीचे औषध न घेता बाहेरुन विकत घ्या". त्यामुळे आरसीवर जी औषधे दिली जातात त्या औषधांची गुणवत्ता तपासण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे या औषधांच्या गुणवत्ता तपासणीचा अहवाल आपल्या समोर आला पाहिजे यासाठी आपण काही उपाय करणार आहात काय ? शासकीय रुग्णालय किंवा पीएचसीमध्ये औषधांचा पुरवठा फार कमी प्रमाणात होत असतो. या ठिकाणच्या स्टाफसाठी वर्षाचा जो पगार द्यावा लागतो त्या पगारापेक्षा कमी किमतीच्या औषधांचा पुरवठा केला जात असतो. रुग्णांना बाहेरुन औषधे विकत घ्यावे लागतात ही सत्य परिस्थिती आहे. त्यामुळे सर्व रुग्णांना चांगल्या दर्जाच्या औषधांचा पुरवठा करण्यासाठी शासनाकडून प्रयत्न केला जाणार आहे काय ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. :9908..

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, सगळीच औषधे रुग्णांना बाहेरुन पैसे देऊन आणावी लागत नाहीत. शासनाकडून सर्वच औषधांचा पुरवठा केला जात नाही ही वस्तुस्थिती आहे परंतु जी औषधे महाग आहेत ती औषधे फक्त बाहेरुन विकत घ्यावी लागत असतात. सर्वच औषधे बाहेरुन विकत आणावी लागतात असे कधी कधी रुग्णांना वाटत असते. सन्माननीय सदस्यांच्या दुस-या प्रश्नाचे मी उत्तर देऊ इच्छिते की, नवीन प्रोक्युअरमेंट पॉलीसीमध्ये आपण काही दुरुस्ती सुचवलेली आहे. तसेच कोर्टाचा निर्बंध हटल्यानंतर आपल्याला नवीन पॉलीस सुरु करता येईल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य खात्याने किती औषधांची आरसी नुसार खरेदी केलेली आहे ? आपण वैद्यकीय शिक्षण विभागाची, बीएमसीची तसचे इएसआयची आरसी पध्दती वापरत आहात. त्यामुळे किती औषधे आरसीवर येण्याच्या प्रतिक्षेत आहेत ? आपण आपल्या औषधांची खरेदी आरसी नुसार करणार आहात काय ? आमदारांना औषधे मिळत नाहीत त्यामुळे अशी औषधे आपण आमदारांना मिळवून देणार आहात काय ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, डायरेक्टर मेडीकल एज्युकेशनची, मुंबई महानगरपालिकेची आरसी, केंद्रशासनाच्या आरसी प्रमाणे आरोग्य खात्यामध्ये औषधांची खरेदी केली जात आहे ही वस्तुस्थिती आहे. एक वर्षापूर्वी दोन्ही सभागृहात प्रोक्युअरमेंट पॉलीसी डिक्लेअर करण्यात आली होती.

यानंतर श्री. अजित...

अशुधारित प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

ता.प्र.क्र.9908....

श्री.सुरेश शेट्टी .....

आर.सी.प्रमाणे औषधांची खरेदी करण्यात येणार नाही असा निर्णय घेतला होता. तेव्हा पुरवठादार न्यायालयात गेले. त्यानंतर सन्माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्री डॉ.विजयकुमार गावीत आणि मी माननीय मुख्यमंत्री महोदयांसोबत चर्चा केली. आपणास नवीन प्रोक्युअरमेंट पॉलिसी मंत्रिमंडळासमोर आणावी लागेल. मंत्रिमंडळाने त्यास मान्यता दिल्यानंतर पुढील वर्षी मार्च-एप्रिलमध्ये ती पॉलिसी लागू करण्यात येईल. प्रोक्युरमेंट पॉलिसी संदर्भातील फाईल आमच्या विभागाने डी.एम.ई.आर.कडे पाठविली आहे. यापुढे आर.सी.मधून औषधांची खरेदी करण्यात येणार नाही. तर शासन ई-टेंडर काढून उत्पादकांकडून औषधे खरेदी करण्यात येईल. औषधांची खरेदी केल्यानंतर वेअर हाऊसमध्ये औषधांची क्वालिटी आम्ही स्वत: चेक करणार आहोत. त्यानंतर त्याचे वितरण केले जाणार आहे... दोन दिवसांपूर्वी माननीय अध्यक्षांसोबत आमची एक बैठक झाली. त्या बैठकीस माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्री डॉ.विजयकुमार गावित हे देखील उपस्थित होते. त्या बैठकीत असा निर्णय झाला की, आपण आजी व माजी आमदारांना सेंट जॉर्ज रुग्णालयातून औषधे उपलब्ध करुन देत होतो ते यापुढेही सुरु ठेवावे. नवीन पॉलिसी संदर्भातील निर्णय हे अधिवेशन संपल्यानंतर घेणार आहोत.

उपसभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: लेखी उत्तरे

मु.शी.: तारांकित प्रश्नासंबंधी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

श्री.राजेंद्र मुळक (वित्त राज्य मंत्री): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "राज्यात सन 2005 पूर्वी सेवेत नियुक्त झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत माननीय उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय" या विषयावरील सर्वश्री कपिल पाटील, जयंत प्र.पाटील, जैनुद्दीन जव्हेरी, यांच्या विधानपरिषद तारांकित प्रश्न क्रमांक 9407 ला दिनांक 9 डिसेंबर 2010 रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : सोबत येथे अधिक माहिती छापावी)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: लेखी उत्तरे

मु.शी.: तारांकित प्रश्नासंबंधी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

श्री.राजेंद्र मुळक (जलसंपदा राज्य मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणात भूकंपाचा अभ्यास करणेसाठी उपकरणे बसविण्याचा निर्णय घेतल्या संदर्भात" या विषयावरील सर्वश्री संजय दत्त, राजन तेली व श्री.प्रतापसिंह मोहिते-पाटील माजी वि.प.स. यांच्या विधानपरिषद तारांकित प्रश्न क्रमांक 4785 ला दिनांक 23 एप्रिल, 2010 रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : सोबत येथे अधिक माहिती छापावी.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.राजेंद्र मुळक (संसदीय कार्य राज्य मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाचा सन 2009-2010 चा वाषिक अहवाल "सभागृहासमोर ठेवतो.

उपसभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "मॅफको लिमिटेडचा सन 2007-2008 व 2008-2009 या वर्षाचा अनुक्रमे सदतिसावा व अडतिसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतो.

उपसभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "सन 2010-2011 च्या अर्थसंकल्पाच्या संदर्भात जमा व खर्चाच्या अर्धवार्षिक आढाव्याचे निष्कर्ष दर्शविणारे विवरणपत्र " सभागृहासमोर ठेवतो.

उपसभापती : अर्थसंकल्पाच्या संदर्भात जमा व खर्चाच्या अर्धवार्षिक आढाव्याचे निष्कर्ष दर्शविणारे विवरणपत्र सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने लोकलेखा समितीच्या सन 2001-2002 या वर्षाच्या आठव्या अहवालातील परिच्छेद क्रमांक 1.28 मध्ये समितीने केलेल्या शिफारशीनुसार सर्व मंत्रालयीन विभागांनी सन 2009-2010 या वित्तीय वर्षात केलेल्या पुनर्विनियोजनाबाबतच्या माहितीचे एकत्रित विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतो.

उप सभापती : विवरणपत्र सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. मु.शी. : नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने, दिनांक 7 एप्रिल,2010 रोजी श्री उल्हास पवार,वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या म.वि.प. नियम 260 अन्वये प्रस्तावाच्या चर्चेच्या वेळी उपस्थित केलेल्या मुद्याबाबतची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

अधिक माहिती

(प्रेस कृपया सोबत जोडलेली अधिक माहिती येथे छापावी)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: विधेयकांना संमती व अधिसंमती

उप सभापती : विधान परिषदेने पारित केलेल्या पुढील विधेयकांना विधान सभेकडून संमती मिळाल्याची यादी सह सचिव वाचून दाखवतील

सह सचिव : विधान परिषदेने संमत केलेली पुढील विधेयके विधान सभेकडून संमत करण्यात आली.

1) सन 2010 चे वि.प.वि.क्रमांक 10 - महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ (दुसरी सुधारणा) विधेयक 2010
2) सन 2010 चे वि.प.वि.क्रमांक 11 - बोनस प्रदान (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक 2010
3) सन 2010 चे वि.प.वि.क्रमांक 12 - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयके 2010
4) सन 2010 चे वि.प.वि.क्रमांक 13 - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक 2010

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सदस्य अनुपस्थिती समितीचा दुसरा अहवाल (2010-2011) सादर करतो.

समितीची बैठक बुधवार, दिनांक 15 डिसेंबर 2010 रोजी सकाळी 11.30 वाजता विधान भवन, नागपूर येथे झाली. या बैठकीमध्ये श्री. नितीन गडकरी, वि.प.स. यांच्या रजेचे अर्ज विचारात घेण्यात आले.

श्री.नितीन गडकरी, वि.प.स. यांनी दिनांक 16 जुलै ते 27 जुलै 2010 एकूण 12 दिवस तसेच विद्यमान हिवाळी अधिवेशनाच्या संपूर्ण कालावधीमध्ये विधान परिषदांच्या बैठकीना अनुपस्थित राहण्यासंबंधी रजेच्या अर्जात दिलेले कारण ग्राहय धरुन त्यांना उपरोक्त कालावधीत विधान परिषदेच्या बैठकांना अनुपस्थित राहण्याची अनुमती देण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.

उप सभापती : सदस्य अनुपस्थिती समितीचा दुसरा अहवाल (2010-2011) सभागृहास सादर झाला आहे. समितीने सादर केलेल्या अहवालात उल्लेखिलेल्या कालावधीसाठी श्री नितीन गडकरी, वि.प.स. यांना विधानपरिषदेच्या बैठकींना अनुपस्थित राहण्याची अनुमती देण्यात यावी अशी समितीने शिफारस केली आहे. तरी अनुमती द्यावी काय ? (थोडे थांबून) अनुमती देण्यात येत आहे. सदस्यांना तसे कळविण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (समिती सदस्य) सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने लोकलेखा समितीचा दुसरा अहवाल सभागृहास सादर करतो.

उप सभापती : लोकलेखा समितीचा दुसरा अहवाल सभागृहास सादर झाला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.मु.शी: नियम 93 अन्वयेच्या सूचनांवरील निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवणे

उप सभापती : नियम 93 अन्वयेच्या सूचनांवरील निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येत आहेत.

(प्रेस कपया सोबत जोडलेली निवेदने येथे छापावीत)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. मु.शी :पुण्यातील लक्ष्मी रोडवरील सोन्याच्या दुकानावर पडलेला दरोडा या विषयावरील नियम 93 अन्वयेच्या सूचनेसंबंधीची अधिक

माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे

श्री.सुरेश शेट्टी (सार्वजनिक आरोग्यं मंत्री) : सभापती महोदय, "पुण्यातील लक्ष्मी रोडवरील सोन्याच्या दुकानावर पडलेला दरोडा " या विषयावरील डॉ नीलम गो-हे व इतर वि.प.स. यानी दिनांक 2 ऑगस्ट 2007 रोजी उपस्थित केलेल्या नियम 93 अन्वये सूचनेच्या चर्चेच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे..

<u>अधिक माहिती</u>

(प्रेस :कृपया सोबत जोडलेली अधिक माहिती येथे छापावी)

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याचे मुद्दे

उप सभापती : सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे.त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, काल नागपूरच्या बर्डीमधील मोर भवन या बस स्थानकावर नागपूर महानगरपालिकेच्या महापौर श्रीमती अर्चना देहनकर, स्थायी समिती अध्यक्ष श्री.संदिप जोशी, आणि नगरसेवक श्री.दयाशंकर तिवारी यांच्या नेतृत्वाखाली एका मोर्चाचे आयोजन केले होते. हा मोर्चा कशासाठी काढण्यात आला होता? मोर भवन बस स्थानकाची जागा ही महानगरपालिकेच्या स्टार बसच्या पार्कींगसाठी द्यावी अशी नागपूर महानगरपालिकेने राज्य परिवहन महामंडळाला विनंती केली होती. खरे म्हणजे ही जागा पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाची होती. ही जागा 2.57 एकर इतकी असून पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाने महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाला भाडेपट्टयावर दिली होती. नागपूर महानगरपालिकेच्या विकास योजनेमध्ये ही जागा शहरांतर्गत बस सेवेसाठी आरक्षित करण्यात आली आहे. सन 2007 पासून शहर बस सेवा नागपूर महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्यात आली. त्यामुळे या बस सेवेसाठी आवश्यक असलेली मोर भवन येथील जागा महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्याची गरज होती. परंतु ही जागा राज्य परिवहन महामंडळाने हस्तांतरित केली नाही, व स्वत:कडे ठेवली. तेव्हा या जागेच्या मागणीकरिता महापौरांच्या नेतृत्वाखाली शांततेत मोर्चा काढण्यात आला. त्यावेळी ती बस समोर ठेवून तो मोर्चा निघाला असतांना आणि कोणताही अनुचित प्रकार घडलेला नसतांना या मोर्चावर पोलिसांनी लाठीचार्ज केला. केवळ पोलिसांनीच लाठीचार्ज केला नाहीतर राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी सुध्दा या मोर्चावर दगडफेक केली. त्यामध्ये आठ नगरसेवक जखमी झाले. ही अतिशय गंभीर अशी बाब आहे. आपल्या अधिकारासाठी अतिशय शांततेत निघालेल्या महापौरांच्या मोर्चावर काहीही कारण नसतांना पोलिसांकडून लाठीचार्ज होतो काय, इतकेच नव्हेतर राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांकडून देखील दगडफेक होते काय आणि त्यामध्ये अनेक नगरसेवक जखमी होतात काय, म्हणून माझी आपणास विनंती आणि मागणी आहे की, शासनाने आज हे अधिवेशन संपण्यापूर्वी निवेदन करावे.

श्री. सुरेश शेट्टी (सार्वजनिक आरोग्य मंत्री) : सभापती महोदय, होय.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : अनेक माननीय सदस्यांनी औचित्याचे मुद्दे मांडण्यासाठी परवानगी मागितली आहे. तेव्हा औचित्याच्या मुद्दयांचे औचित्य साधून सन्माननीय सदस्यांनी एकेक मिनिटामध्ये आपले म्हणणे मांडून औचित्य या शब्दाचे पावित्र्य जपावे अशी माझी विनंती आहे. यानंतर सन्माननीय सदस्य श्री. विजय सावंत यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे.त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.विजय सावंत : सभापती महोदय, माथाडी कामगारांना स्वस्तात घरे मिळण्यासाठी मंत्रिमंडळाने निर्णय घेऊन एक भूखंड देण्याबाबतचे आदेश शासनाकडून निर्गमित करण्यात आले. तरीसुध्दा एस.आर.ए. योजनेचे अधिकारी बिल्डर्सना मदत करण्यासाठी त्यांचा प्रस्ताव बाजूला ठेवून प्रॉपर्टी कार्डवर नाव नाही असे कारण सांगून माथाडी कामगारांच्या गृहनिर्माण योजनेचा प्रस्ताव नामंजूर करीत आहेत. तेव्हा मला असे विचारावयाचे आहे की, मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयाला महत्व आहे की, प्रॉपर्टी कार्डला महत्व आहे? यासंबंधी शासनाने त्यांना समज द्यावी अशी विनंती करतो.

उप सभापती : शासनाचे अधिकारी बिल्डरला मदत करणार नाहीत तर तुम्हाला करणार काय, यामध्ये औचित्य काय आहे?

सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे.त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, सेंट जॉर्जेस हॉस्पिटलमध्ये शिवसेनेतर्फे तेथील दुरवस्थेबाबत एक मोर्चा नेण्यात आला होता.

(यानंतर श्रीमती थोरात)

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

16-12-2010 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही)

O 3

DGS/ KGS/ KTG/ 12:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय,माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, काल सेंट जॉर्ज हॉस्पिटलवर शिवसेनेमार्फत तेथील दुरवस्थेबाबत एक मोर्चा नेण्यात आला होता. या सेंट जॉर्ज हॉस्पिटलमधील 300 बेडपैकी जवळ जवळ 150 बेड वापरात आहेत. हे हॉस्पिटल जाणीवपूर्वक बंद करण्यात येत आहे की काय अशी जनतेमध्ये भीती निर्माण झालेली आहे. येथील सी.टी.स्कॅन,व्हेंटीलेटर वगैरे सगळया मशिन्स बंद आहेत. आयसीयुमध्ये एकही रुग्ण नाही. येथील सर्व औषधपुरवठा बंद आहे. सेंट जॉर्ज हॉस्पिटल हे मुंबईचे भूषण आहे. 26/11 च्या अतिरेकी हल्यामध्ये अतिशय महत्वाची कामगिरी बजावलेले हे हॉस्पिटल आहे. त्यामुळे हे हॉस्पिटल जनसामान्यांसाठी त्वरित सुरु व्हावे अशी माझी या औचित्याच्या मुद्याद्वारे विनंती आहे.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, गुरचरणाचर जमीन खाजगी बिल्डर आणि कारखानदारांना विकण्याचे काम पंचांना हाताशी धरुन अधिकारी आणि काही पुढारी करीत आहेत. अलिबाग तालुक्यातील परहूर ग्रामस्थांची 100 एकर जागा जवळ जवळ 70 ते 80 कोटी रुपयांची जागा पंच अल्प किंमतीमध्ये विकत आहेत. पंच म्हणून फेरफार बदलामध्ये नोंद झाली असतानाही जुन्या पंचांच्या नावावर व्यवहार करण्यात येत आहे त्याची चौकशी करण्यात यावी. यासंबंधीची सविस्तर माहिती मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती महोदय, माझा दुसरा औचित्याचा मुद्दा असा आहे की, वाडी जोड रस्ता मार्ग यासाठी राज्य शासनाने पैसे दिलेले आहेत. रायगड जिल्हयातील अधिकाऱ्यांनी निकष बदलून वाडी रस्त्याचा प्रोग्रॅम मंजूर केलेला आहे. त्याला तात्काळ स्थगित द्यावी अशा प्रकारची मागणी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करतो. सभापती महोदय, या संदर्भात आठ निकष दिलेले आहेत. ज्या ठिकाणी डांबरीकरणाचे रस्ते आहेत, ज्या ठिकाणी 500 पेक्षा जास्त लोकवस्ती आहे. अशाच गावांना या वाडी रस्त्याचे पैसे दिले गेलेले आहेत.म्हणून या वाडी जोड रस्त्याची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी आणि त्या कार्यक्रमाला स्थगित देण्यात यावी आणि संबंधित नियोजन समितीच्या बैठकीत त्याला मंजुरी घ्यावी किंवा शासनाच्या बजेटमध्ये मंजुरी घ्यावी आणि मगच तो कार्यक्रम सुरु करण्यात यावा तोपर्यंत तो कार्यक्रम रद्द करण्यात यावा. अशी मागणी मी औचित्याच्या मुद्याद्वारे करु इच्छितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ KTG/

उप सभापती : सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांचा लोणावळा रिसॉर्टच्या संदर्भातील औचित्याचा मुद्दा काल मांडण्यात आला आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे :सभापती महोदय, मी आज सकाळी दोन औचित्याचे मुद्दे दिलेले आहेत.

उप सभापती : आता दि.15/12/2010 रोजीचे औचित्याचे मुद्दे सुरु आहेत. दि.16/12/2010 रोजीचे मुद्दे चर्चेला घेण्यात येतील त्यावेळी मी आपल्याला औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी देईन.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, घर कामगारांच्या प्रश्नाच्या संदर्भात मी औचित्याचा मुद्दा दिलेला आहे.

उप सभापती : दि.16/12/2010 रोजीच्या औचित्याच्या मुद्यामध्ये आपला मुद्दा असेल. ते ज्यावेळी सभागृहासमोर चर्चला घेण्यात येतील त्यावेळी मी आपल्याला तो मांडण्याची परवानगी देईन.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी दोन औचित्याचे मुद्दे मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपले दोन्ही औचित्याचे मुद्दे मांडावेत.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माझे दोन्ही औचित्याचे मुद्दे आता न मांडता विदर्भाच्या चर्चेच्या वेळी मी त्या मुद्यांवर बोलणार आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : सन्माननीय सदस्या ॲड. उषा दराडे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

ॲड. उषा दराडे : सभापती महोदय, राज्यामध्ये इंग्रजांच्या काळापासून महसूल विभागात कोतवाल हा कर्मचारी कार्यरत असून सद्य:स्थितीत त्याला दरमहा केवळ 2010 रुपये मिळतात. शिवाय कोतवालांना नव्यानेच घातलेली शिक्षणाची अट, सेवानिवृत्त मृत कोतवालांच्या विधवांना निर्वाह भत्ता मिळण्याची मागणी, कोतवालांना वर्ग-4 मध्ये समाविष्ट करुन घेण्याची मागणी, या मागण्या प्रलंबित असणे, या विषयी शासनाने करावयाची उपाययोजना याकडे मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाचे लक्ष वेधू इच्छिते.

सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने माझा दुसरा औचित्याचा मुद्दा मांडते. याच हिवाळी अधिवेशनामध्ये परळी येथील छत्रपती शिवाजी चौकाचे सुशोभिकरण करण्याची अर्धा-तास चर्चा देण्यात आली होती. ती अर्धा-तास चर्चा काही अडचणीमुळे सभागृहाच्या कामकाजात येऊ शकली नाही. सभापती महोदय, अर्धा-तास चर्चा उपस्थित करण्यात आल्यानंतर छत्रपती शिवाजी चौकाचे सुशोभिकरण करण्याचे काम सुरु झाले होते. पण ती अर्धा-तास चर्चा सभागृहात चर्चेला आली नाही त्यामुळे ते काम लगेच बंद करण्यात आलेले आहे. तेथे या चौकाच्या सुशोभिकरणासाठी आणलेले मटेरिअल पडलेले आहे. त्या मटेरिअलमुळे रस्ते बंद झालेले आहेत. सभापती महोदय, या पध्दतीने परळी येथील छत्रपती शिवाजी चौकाच्या सुशोभिकरणाच्या संदर्भात जी गैरसोय निर्माण झालेली आहे त्याची शासनाने दखल घ्यावी याकडे मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाचे लक्ष वेधू इच्छिते.

यानंतर श्री. बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. एका अतिशय महत्वाच्या विषयाबाबत मी औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे. शेतकरी कामगार पक्ष ज्यासाठी लढतो त्यासंदर्भातील हा मुद्दा आहे. आपल्याला या सभागृहात बसताना लाज वाटावी इतका हा गंभीर मुद्दा आहे. केंद्राच्या ग्रामीण विकास मंत्रालयाने बीपीएल सेन्सस 2002 मध्ये महाराष्ट्रातील 70 लाखाहून अधिक कुटुंबांपैकी 6 लाख कुटुंबे वेठबिगार आहेत असे म्हटले आहे. ही शासनाची अधिकृत आकडेवारी आहे. केंद्राच्या ग्रामविकास विभागाच्या वेबसाईटवर बीपीएल सेन्ससची माहिती आली. मी माहितीच्या अधिकाराखाली माहिती मागवली. त्यामध्ये दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची सामाजिक गटानुसार कामगारांची स्थिती दिलेली आहे त्यामध्ये सामाजिक गट अनुसूचित जमाती यामध्ये 94 हजार 610 कुटुंबे वेठबिगार आहेत. अनुसूचित जातीमध्ये 1 लाख 6 हजार 667 कुटुंबे वेठबिगार आहेत. इतर मागासवर्गीयांमध्ये 74 हजार 311 कुटुंबे वेठविगार आहेत आणि इतरमध्ये 3 लाख 21 हजार 791 कुटुंबे वेठबिगार आहेत. अशी महाराष्ट्रातील एकूण 15.45 टक्के दारिद्र्य रेषेखालील जनता वेठबिगारी करीत आहे. वेठबिगारीला कायद्याने बंदी आहे. आपण महाराष्ट्र राज्य निर्मितीचा सुवर्ण महोत्सव साजरा करीत आहोत आणि आपल्या राज्यामध्ये ही वेठबिगारी चालू आहे. आम्ही कसा विकास केला याबाबत काल माननीय उपमुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांचे तडफदार भाषण आम्ही ऐकले. ही वेठबिगारी होत असताना लवासाचे समर्थन कसे करणार हे आपण आम्हाला सांगावे. मी राजकीय बोलत नाही. कालचा संदर्भ आला म्हणून बोलतो. केवळ ही माहिती पटलावर आणणे असा माझा उद्देश नाही किंवा सरकारचे अपयश दाखविणे एवढाच माझा उद्देश नाही. केंद्र सरकारच्या ग्रामविकास खात्याने महाराष्ट्राच्या सर्वेक्षणात ही माहिती दिली असेल तर आपल्या शासनाला महाराष्ट्रातील ही कुटुंबे कोणती आहेत हे माहीत आहे काय ? बेकायदेशीर वेठबिगारी होत आहे आणि अधिकृतपणे सरकार यामध्ये येत आहे. त्यासाठी सरकार काय पावले उचलणार आहे ? राज्याचे तरुण तडफदार माननीय गृह राज्यमंत्री श्री. सतेज पाटील आता सभागृहात आलेले आहेत. वेठबिगारी बेकायदेशीर आहे. या विषयात त्याचा तपास करु आणि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/

श्री. विनोद तावडे ....

वेठबिगारी कशी बंद होईल आणि शासन याबाबतीत काय करणार याबाबत माननीय मंत्रिमहोदय काही सांगणार आहेत काय ? वेबसाईटवर सविस्तर माहिती दिलेली आहे. मी जिल्हावार माहिती सांगितली तर माननीय सभापती महोदय म्हणतील की औचित्याचा मुद्दा लवकर मांडा. हा विषय केवळ सभागृहात आला असे व्हावयास नको. सरकारने याबाबत काही सांगितले पाहिजे असे आपण शासनाला सांगितले तर याला काही अर्थ राहील. या ठिकाणी बेकायदेशीर वेठबिगारी होत आहे. हे मान्य आहेच. हे म्हणणे सरकारचेच आहे. याबाबतीत सरकार काय करणार आहे हे शासनाने सांगितले पाहिजे नाही तर आपण निर्देश दिले पाहिजेत.

उप सभापती : यासंदर्भात शासनाने सगळी माहिती घेऊन आवश्यक ती उपाययोजना करावी.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. मोहन जोशी : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. पुणे येथील म्हाडा वसाहतीत राहणाऱ्या रहिवाशांना 2.5 चटईक्षेत्र निर्देशांक देण्याबाबत शासनाकडून घोषणा करण्यात येऊन मुंबई व इतर ठिकाणी शासनाच्या घोषणेनुसार 2.5 चटईक्षेत्र निर्देशांक देण्यात आला परंतु पुणे, पिंपरी-चिंचवड येथे राहणाऱ्या हाऊसिंग बोर्डाच्या वसाहतीतील नागरिकांना अजूनपर्यंत हा 2.5 चटईक्षेत्र निर्देशांक देण्यात आलेला नाही. त्यामुळे या संपूर्ण रहिवाशांमध्ये तीव्र असंतोष आणि संतापाची भावना निर्माण झालेली आहे. शासनाने याबाबतीतील निर्णय लवकरात लवकर जाहीर करावा.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : यानंतर सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. लोकप्रतिनिधी म्हणून विशेषत: शिक्षक आमदार असल्यामुळे शाळांच्या, शिक्षकांच्या व शिक्षण क्षेत्रातील समस्यांबाबत शिक्षणाधिकारी, शिक्षण उपसंचालक, शिक्षण संचालक, शिक्षण विभागाचे सचिव यांच्याकडे सातत्याने आम्हाला पत्र व्यवहार करावा लागतो. परंतु गेल्या 6 वर्षांचा अनुभव अत्यंत क्लेशदायक आहे. माननीय मुख्यमंत्र्यांना दिलेल्या पत्राचे आम्हाला एक महिन्यामध्ये उत्तर मिळते. परंतु शासकीय अधिका-यांना दिलेल्या निवदेनाचे उत्तर आम्हाला 6-6 महिन्यानंतर किंवा एक वर्षानंतरही मिळत नाही. आमच्या निवेदनाची दखल घेतली जात नाही. एवढेच नव्हे तर लोकप्रतिनिधी म्हणून माहितीच्या अधिकारानुसार माहिती घेण्यासाठी गेल्यास हे अधिकारी माहिती देण्यास टाळाटाळ करतात. म्हणून या औचित्याच्या मुद्याद्वारे मी शासनाला विनंती करतो की, आम्ही एखाद्या विषयाबाबत तक्रार करतो किंवा निवेदन देतो, समस्या मांडतो त्याचे उत्तर किमान एक महिन्याच्या आत मिळाले पाहिजेत यासाठी संबंधित अधिका-यांना शासनाने आदेश द्यावेत.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : यानंतर सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. दिनांक 12.12.2010 रोजी कशेळी घाटात तवेरा व लक्झरी गाडीच्या झालेल्या जोरदार टकरीत तवेरा चालकासह भांडुप, मुंबई येथील एकाच कुटुंबातील 9 व्यक्तींचा मृत्यू होणे, त्यामुळे सदर कुटुंबावर पसरलेले दु:खाचे व शोककळेचे वातावरण तसेच या घाटामध्ये वर्षभरात 300 च्या वर व्यक्तींचा झालेला मृत्यू याबाबत सखोल चौकशी करुन शासनाने केलेल्या व करण्यात येत असलेल्या उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : यानंतर सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. महाराष्ट्र विधिमंडळातील अनुसूचित जातीतील सन्माननीय सदस्यांचा दिल्लीच्या धर्तीवर महाराष्ट्र विधानमंडळ अनुसूचित जाती फोरम प्रस्थापित झालेला आहे. त्या फोरमची दोन्ही सभागृहातील सर्व पक्षीय सदस्यांची संख्या साधारणपणे 39 आहे. सभासदांना संरक्षण, अनुसूचित जातीचा निधी दुसरीकडे वळविला जाऊ नये, त्यांच्या निधीचे संरक्षण, अनुशेषाचे संरक्षण, इत्यादी बाबीचा पाठपुरावा करणे हा या फोरमचा उद्देश आहे. महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई येथे अनुसूचित जाती फोरमच्या कार्यालयासाठी व दैनंदिन कामासाठी जागेची मागणी केली होती. माननीय सभापती, माननीय अध्यक्ष यांनी त्याला तत्वत: मान्यता दिली. जागेचे वाटप झाल्यानंतर बोर्डही लावलेला होता, परंतु तो काढून टाकण्यात आला आहे. म्हणून आपण संबंधितांना आदेश द्यावेत.

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. सभापती महोदय, नागपूर येथील हिवाळी अधिवेशनामध्येच घरेलू महिला कामगारांचा प्रचंड मोर्चा घेऊन आल्या होत्या. 2008 सालच्या हिवाळी अधिवेशनामध्ये घरेलू महिला कामगारांचे विधेयक मंजूर झालेले आहे. घरेलु महिला कामगारांचा प्रश्न अतिशय गुंतागुंतीचा आहे. मुंबई, पुणे, कोल्हापूर व नागपूर या सर्व ठिकाणी घरेलू कामगारांच्या संघटनांचे असे म्हणणे आहे की, घरेलु कामगार मंडळ तयार करण्यात आले आहे, परंतु त्यासाठी शासनाने निधीची तरतूद केलेली नाही. तसेच घरेलू कामगारांची नोंदणी करणारी यंत्रणा कामगार विभागाकडे अस्तित्वात नाही. सन्माननीय कामगार मंत्र्यांकडे अनेक वेळा शिष्टमंडळे नेली, मोर्चे घेऊन गेल्यावरही सन्माननीय कामगार मंत्र्यांनी याबाबत दिलेल्या कोणत्याही आश्वासनांची अंमलबजावणी या अधिवेशनामध्येही केलेली नाही. मी या औचित्याच्या मुद्याद्वारे मागणी करते की, या घरेलू कामगार मंडळासाठी निधीची तरतूद करण्यात यावी व त्यांच्या नोंदणीची व्यवस्था व्हावी आणि त्यांना अधिकार मिळण्यासाठी शासनाने त्वरित पावले उचलावीत.

यानंतर श्री.शिगम

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला मुद्दा मांडावा.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. हा औचित्याचा मुद्दा स्फोटक आहे. दै."सकाळ" वृत्तपत्रामध्ये आलेल्या जाहिरातीकडे मी सभागृहाचे लक्ष वेधले होते. अशा प्रकारच्या अनेक मोठमोठया वर्तमानपत्रामध्ये मसाजर म्हणून पुरुष कामगार पाहिजेत अशा जाहिराती दिल्या जातात. अशा जाहिरातीमुळे शेकडो तरुण मुलांची फसवणूक झालेली असून त्यांचे शोषणही झाल्याचे नंतर उघडकीस आलेले आहे. अशा प्रकारे वर्तमानपत्रातून तीन प्रकारच्या जाहिराती दिल्या जातात. 1) नोकरी बद्दलच्या जाहिराती 2) काविळ, संधीवात अशा विविध रोगावरील रामबाण औषधांच्या जाहिराती असतात. या ठिकाणी माननीय आरोग्य मंत्री उपस्थित आहेत. ह्या ज्या औषधांच्या जाहिराती वृत्तपत्रामध्ये दिल्या जातात ती औषधे बनावट व भेसळयुक्त असल्यामुळे ज्या ज्या लोकांनी ही औषधे घेतलेली आहेत त्यांच्या आरोग्यावर वाईट परिणाम इ ालेले आहेत. तेव्हा अशा प्रकारच्या जाहिरातींची गांभीर्याने दखल घेऊन सर्वसामान्य माणसाची फसवणूक होऊ नये म्हणून या बाबतीत सार्वजनिक आरोग्य विभागाने त्वरित कारवाई केली पाहिजे. तिसरा प्रकार म्हणजे हल्ली गाण्यातून मुलींच्या नावाचा वापर वेगवेगळया अर्थाने केला जातो. अलीकडे दोन गाणी फार गाजत आहेत. त्या गाण्यातून मुन्नी आणि शिला या नावाचा वारंवार उल्लेख होतो. या गाण्यामुळे माझ्या माहिती प्रमाणे मुन्नी आणि शिला नावाच्या काही महिलांनी त्यांची नावे बदलून घेतलेली आहेत. अशा प्रकारची गाणी सातत्याने वाहिन्यांवरुन दाखविली जात असल्यामुळे मुलींना, महिलांना अवमान सहन करावा लागतो. तेव्हा गाण्यामध्ये व्यक्तीच्या नावाचा वापर करताना तो कशा पध्दतीने केला जावा यासंबंधी काही निर्बंध घालण्याच्या दृष्टीने शासन उपाययोजना करणार आहे काय ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. शासन सेवेमध्ये मागासवर्गीय आरक्षणबाबात 1995 मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने निर्णय देऊनही मंत्रालयामध्ये कक्ष अधिकारी पदाच्या नियुक्त्या करताना मागील 15 वर्षामध्ये त्या निर्णयाचे पालन न केल्याची धक्कादायक घटना उघडकीस येणे. दि. 1.9.97 रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशा प्रमाणे कारवाई करु असे लेखी आश्वासन उच्च न्यायालयाला शासनातर्फे देण्यात आलेले आहे. दि.5.5.2010 रोजी शासनाने उच्च न्यायालयात सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशा प्रमाणे कक्ष अधिका-यांची ज्येष्ठता यादी बनविण्यात येईल असे आश्वासन दिलेले आहे. त्रिपाठी समितीने डिसेंबर 2008मध्ये अहवाल देऊनही शिफारशींची अंमलबजावणी होत नाही. 2009मध्ये तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी घोषणा केल्यानंतर त्याबाबतीत कारवाई झाली नाही. कक्ष अधिका-यांची एकूण पदे किती आहेत याची शासनास माहिती नसल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. त्यामुळे अधिकारी आणि कर्मचा-यांमध्ये तीव्र असंतोष पसरलेला आहे. याबाबतीत शासनाने तातडीने कार्यवाही करावी आणि तात्काळ निवेदन करावे.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, याबाबतीत माहिती घेऊन ती पटलावर ठेवण्यात येईल.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी तालुक्यातील सुहानी विठ्ठल माळकर ही इयत्ता 11वीमध्ये शिकणारी मुलगी 2 दिवस बेपत्ता झाल्याची तक्रार पोलीस स्टेशनला देऊनही पोलिसांनी त्याकडे दुर्लक्ष केले. तिच्या पालकांनी तिच्या मोबाईल फोनवरील सर्व माहिती पोलिसांना देऊनही त्याकडे पोलिसांनी दुर्लक्ष केले. त्यानंतर दोन दिवसांनी विवस्त्रावस्थेत तिचा मृतदेह जंगलामध्ये सापडला. खरे म्हणजे सुरुवातीलाच पोलीस स्टेशनला तक्रार केल्यानंतर त्या तक्रारीची दखल घेतली असती तर त्या मुलीचा जीव वाचला असता. परंतु पालकांनी केलेल्या तक्रारीकडे पोलिसांनी दुर्लक्ष केल्यामुळे हा दुर्दैवी प्रकार घडलेला आहे. असाच प्रकार दोडामार्ग तालुक्यातील सुजाता तळवडेकर हिच्या बाबतीत घडला. तिचा मृतदेह नदीमध्ये आढळून आला. या मुलीवर बलात्कार करुन तिचा खून करण्यात आल्याचे नंतर निष्पन्न झाले आणि 26 परप्रांतीयांना अटक करण्यात आली. अशा प्रकारच्या घटना वारंवार घडत आहेत. त्या घडू नयेत म्हणून पोलीस यंत्रणेने सतर्क राहून गुन्हेगारांना जेरबंद करण्यासाठी तसेच सुहानी विठ्ठल माळकर हिच्या मोबाईलवर आलेल्या फोनची चौकशी करुन पोलिसानी आरोपीपर्यन्त पोहोचावे यासाठी मी हा औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

श्री. सतेज पाटील : सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या औचित्याच्या मुद्याची नोंद घेतलेली असून कारवाई करण्यात येईल.

...नंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.राजन तेली : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. सिंधुदुर्ग जिल्हयाला 131 कि.मी.लांबीचा समुद्र किनारा लाभला आहे. कर्नाटक आणि केरळ राज्यातील छोट्या बोटीद्वारे मासेमारी करणाऱ्या मच्छिमारांना रेशन दुकानामार्फत कमी दराने केरोसिन उपलब्ध करुन दिले जाते. त्याच पध्दतीने महाराष्ट्र शासनाने सिंधुदुर्ग जिल्हयात किनारपट्टीवर मासेमारी करणाऱ्या कोळी बांधवांना रेशन दुकानामार्फत स्वस्त दराने केरोसिन उपलब्ध करुन द्यावे. मागील पाच वर्षे सातत्याने या कोळी बांधवांना मासळीच्या दुष्काळाला सामोरे जावे लागले आहे. मी औचित्याच्या मुद्याद्वारे या बाबीकडे शासनाचे लक्ष वेधू इच्छितो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.राजन तेली : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. सिंधुदुर्ग जिल्हयात लेप्टोस्पायरोसिस या रोगामुळे गेल्या 10 वर्षात फार मोठया प्रमाणात लोक मृत्यूमुखी पडले आहेत. यावर्षी जवळजवळ 26 लोकांचा या रोगामुळे मृत्यू झाला आहे. या रोगाला जे लोक बळी पडले ते सर्व शेतकरी कुटुंबातील असून 20 ते 45 या वयोगटातील आहेत. या मृतांच्या वारसांना किंवा कुटुंबियांना खास बाब म्हणून शासनामार्फत 2 लाख रुपये आर्थिक मदत दिली जावी तसेच ज्यांना कोल्हापूर व गोवा येथे औषधोपचारासाठी पाठविले गेले अशा रुग्णांना 50 हजार रुपयांची आर्थिक मदत दिली जावी अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे मागणी करीत आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. राज्यामध्ये देवदासी प्रथा आणि देवदासींचे पुनर्वसन व्हावे यासाठी कायदा केल्याचे शासनाने जाहीर केले. परंतु आजपर्यंत राज्यात या कायद्याची अंमलबजावणी झाल्याचे दिसून येत नाही. तत्कालीन महिला व बालविकास मंत्री श्री.सुभाष झनक यांनी शासनाच्या 'लोकराज्य' या मासिकामध्ये या कायद्याची अंमलबजावणी सुरु केल्याचे जाहीर केले होते. परंतु राज्यात अद्याप या कायद्याची अंमलबजावणी सुरु झालेली दिसून येत नाही. देवदासींना मुले असतात, परंतु नवरा नसतो. म्हणून देवदासींच्या मुलांना वडील नसतात. त्यामुळे शाळेत जाताना किंवा सामाजिक क्षेत्रात वावरत असताना त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. देवदासींच्या या समस्येकडे शासनाने त्वरित लक्ष देऊन त्यांच्या पुनर्वसनासाठी आणि ही प्रथा बंद करण्यासाठी पावले उचलावीत अशी मी औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाला विनंती करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री.हुसेन दलवाई यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.हुसेन दलवाई : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. सहाय्यक पोलीस आयुक्त श्री.अरुण बोरुडे यांनी केलेल्या बलात्काराच्या घटनेसंबंधी या सभागृहात लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून चर्चा झाली होती. चर्चेच्या वेळी माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले होते की, त्यांना लवकरच अटक करण्यात येईल. परंतु संपूर्ण बोरुडे कुटुंब राज्याबाहेर पळून गेले आहे. त्यामुळे त्यांना अद्याप अटक झालेली नाही. या संदर्भात गांभीर्याने कारवाई करुन त्यांना अटक केली जाणार आहे का? अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाला विनंती करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. महाराष्ट्रातील थोर स्वातंत्र्यसेनानी व्यंकटराव रणवीर, वय वर्षे 90 यांनी स्वातंत्र्य लढ्यात सहभागी होऊन तीन वेळा कारावास भोगला. महाराष्ट्राच्या स्वातंत्र्य लढ्यात कै.नानासाहेब पाटील यांच्या बरोबरीने त्यांचे नाव घेतले जाते. त्यांचे दु:खद निधन झाले. आयुष्यभर आणि वयाच्या 90 व्या वर्षी देखील सातपुड्याच्या पायथ्याशी जाऊन आदिवासींची सेवा करणाऱ्या थोर स्वातंत्र्यसेनानींचे दु:खद निधन झाल्यानंतर शासनाचा एकही प्रतिनिधी त्याठिकाणी गेला नाही. जिल्हाधिकारी गेले असतील, त्यांनी पुष्पचक्र वाहिले असेल. परंतु थोर स्वातंत्र्यसेनानीचे अंत्यसंस्कार शासकीय इतमामात होणे आणि तेथे राज्याचा प्रतिनिधी म्हणून पालकमंत्री किंवा संपर्कमंत्री यांनी उपस्थित राहणे अत्यंत आवश्यक होते. मला अतिशय खेद होत आहे. नंतर मंत्रीमहोदय त्यांच्या घरी गेले. परंतु अशा थोर स्वातंत्र्यसेनानीच्या निधनानंतर शासनाने त्याची दखल घेऊन शासनातर्फे योग्य ती मानवंदना देणे आवश्यक होते. या औचित्याच्या मुद्याकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: लक्षवेधी सूचनेसंबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवणे

सहसचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेवरील बाब क्रमांक 8 च्या अंतर्गत दाखविण्यात आलेल्या क्रमांक 1 ते 69 या लक्षवेधी सूचनांसंबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली क्रमांक 1 ते 69 ही निवेदने कृपया छापावीत)

नंतर यू.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पुढे सुरु.....

उप सभापती : माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, मी औचित्याच्या मुद्याच्या अनुषंगाने सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार राज्यशासनाला 10 लाख रुपयांचा दंड तसेच तत्कालीन मुख्यमंत्र्यांवर ताशेरे सुध्दा ओढले आहेत. एका सावकाराला पाठीशी घालण्याबाबतचे हे प्रकरण होते. त्याचा निकाल लागला असून 10 लाख रुपयाचा दंड या राज्याला झाला त्यामुळे राज्याची नाचक्की झालेली आहे. तसेच राज्यात ज्या सावकारीमुळे असंख्य शेतकऱ्यांनी आत्महत्त्या केल्या व त्यासाठी राज्यात शासनाने सावकारी प्रतिबंधक कायदा आणण्याचे वचन दिले होते. त्यानुसार हा कायदा राज्यात अमलात असताना देखील असे प्रकार होतात. एका बाजूला आत्महत्त्या थांबविण्यासाठी असा कायदा आणला जातो आणि दुसऱ्या बाजूला मात्र तत्कालीन मुख्यमंत्री अशा कायद्याची कठोर अमलबजावणी करण्याऐवजी एका सावकाराला पाठीशी घालतात. जिल्हाधिकारी आणि स्थानिक पीएसआयला बंगल्यावर बोलावून या सावकाराच्या विरुध्द कुठल्याही प्रकारच्या केसेस करु नका, अशा प्रकारचे आदेश देतात. तशाच प्रकारची पत्रे व स्टेशन डायरीच्या नोंदीचे नमुने सुध्दा यापूर्वी सभागृहात दाखल करण्यात आले आहेत. तरी सुध्दा सरकारने कुठल्याही प्रकारे या तक्रारींची दखल घेतली नाही. तसेच हा सावकार त्यासाठी उच्च न्यायालयात गेला आणि उच्च न्यायालयाने आपल्या निर्णयात शासनाला 25 हजार रुपयाचा दंड ठोठावला होता व मुख्यमंत्र्यांवर ताशेरे सुध्दा ओढले होते. नंतर राज्य सरकार उच्च न्यायालयाच्या विरोधात दाद मागण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात गेले होते, त्याचा निकाल नुकताच लागलेला आहे. त्या निकालात सर्वोच्च न्यायालयाने सरकारला 10 लाख रुपयाचा दंड तर ठोठावलाच पण तत्कालीन मुख्यमंत्र्यांवर ताशेरे सुध्दा ओढले, त्यामुळे या राज्याची नाचक्की झाली. तसेच हा 10 लाख रुपये दंड देखील शासनाला भरावा लागणार असून तो राज्याच्या तिजोरीतूनच भरला जाणार आहे, जनतेच्या पैशातूनच भरावा लागणार आहे. अशा प्रकारे एका सावकाराला पाठीशी घालून जनतेच्या पैशाचा अशा प्रकारे अपव्यय होणार असेल तर तो आम्ही सहन करणार नाही. म्हणून यासंदर्भात मी सभागृहात परवाच हा मुद्दा उपस्थित करुन मंत्री महोदयांनी याबाबतचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

निवेदन करावे अशी विनंती केली होती. आजचा अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. आजच निवेदन केले तरच होईल, अन्यथा असे निवेदन सभागृहात करण्याची संधी पुढील अधिवेशनाशिवाय मिळणार नाही, म्हणून मंत्री महोदयांनी या विषयावर सभागृहात आताच निवेदन करावे असा आग्रह आम्ही धरत आहोत. तत्कालीन मुख्यमंत्री आता कोणत्याही पदावर असले तरी त्यांना शासनाने राजीनामा मागितला पाहिजे व आजच्या आज सभागृहाचे कामकाज थांबवून संबंधित मंत्र्यांना सभागृहात पाचारण करण्यात यावे व या विषयावरील निवेदन करण्यासंबंधीचे निदेश आपण द्यावेत, अशी मी विनंती करतो.

डॉ. दीपक सावंत : महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जो मुद्दा सभागृहात उपस्थित केला त्याचे समर्थन करीत असताना मी असे निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न करणार आहे की, ही गोष्ट या राज्याला तसेच आपणा सर्वांनाच भूषणावह अशी नाही. कारण राज्याच्या तत्कालीन मुख्यमंत्र्यांवर ताशेरे ओढले जातात व 10 लाख रुपयाचा दंड न्यायालयाकडून करण्यात येतो व हा दंड गोरगरिबांच्या तिजोरीतून भरावा लागणार आहे हे उचित नाही. हा पैसा विदर्भासाठी खर्च केला असता तरी चांगले झाले असते परंतु दंड म्हणून कशासाठी भरावा हा प्रश्न आहे. दुसरे म्हणजे माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सभागृहात यापूर्वी देखील अनेक वेळा हाच विषय वेळोवेळी उपस्थित केला पण त्यासंदर्भात त्यांना कधीच न्याय मिळाला नाही. म्हणून मी त्यांचीच मागणी उचलून धरतो आणि तत्कालीन मुख्यमंत्री आज कोणत्याही पदावर असोत, त्यांनी तात्काळ आपल्या पदाचा राजीनामा दिला पाहिजे आणि राज्याच्या तिजोरीतून ही 10 लाख रुपये दंडाची रक्कम न भरता तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी वैयक्तिक रित्या भरावी, तसेच यासंदर्भात माननीय मंत्री महोदयांनी आजच सभागृहात निवेदन करावे अशी आमची मागणी आहे.

उप सभापती : यासंबंधी सभागृहात स्पष्ट झाले आहे की, आज शासनाच्या वतीने निवेदन करण्यात येईल.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : महोदय, यासंदर्भात खालच्या सभागृहात निवेदन करण्यात आले आहे. तसेच ॲडव्होकेट जनरलकडून मत मागवावयाचे होते. त्यासंबंधीची कार्यवाही संबंधित मंत्री महोदयांकडून होईलच पण खालच्या सभागृहात निवेदन केलेले असल्याने माननीय संसदीय कामकाज मंत्र्यांना सभागृहात बोलावून निवेदन करण्याबाबतची कल्पना देण्यात येईल.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील...

सन्माननीय सदस्यांना सरकारच्या माध्यमातून जे निवेदन पाहिजे आहे ते करण्यात येईल.

श्री. विनोद तावडे: सभापती महोदय, मला नम्रपणे निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की,..

उप सभापती : नम्रपणे म्हणावयाचे व नंतर आवाज चढवून बोलावयाचे, यामध्ये कोणता नम्रपणा आला ?

श्री. विनोद तावडे :सभापती महोदय, शेतक-यांच्या आत्महत्येचा विषय आहे. सन्माननीय सदस्य श्री. जैनुद्दीन जव्हेरी यांना बोलावयास दिल्यानंतर त्यांचा जसा आवाज चढतो तसे थोडे आमचे होते. शेतक-यांच्या आत्महत्येचा हा विषय आहे. जळते म्हणून आवाच चढतो. या विषयाबात सुप्रीम कोर्टाचा निकाल सकाळी 11.00 वाजता आल्यानंतर आपले सभागृह सुरु झाल्याबरोबर माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी हा विषय सभागृहात काढला होता. हा विषय खालच्या सभागृहात दुस-या दिवशी काढण्यात आला होता. सुप्रीम कोर्टाने या विषयाच्या बाबतीत जे काही वक्तव्य केले होते ते सर्व वक्तव्य माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या सभागृहात ऑन रेकॉर्ड मांडलेले आहे. हा मूळ विषय या सभागृहात पहिल्यांदा मांडण्यात आला होता असे असतांना खालच्या सभागृहात प्रथम निवेदन कसे काय केले जाते ? आमच्या सभागृहाला सापत्न वागणूक का दिली जाते ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात निवेदन करण्याची सरकारची जी भूमिका होती मांडण्यात आलेली आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आमच्या सभागृहाला सापत्नतेची वागणूक का दिली जाते ? माननीय संसदीय कामकाज मंत्र्यांनी या विषयाच्या संदर्भात जे काही निवेदन केलेले आहे ते निवेदन येथे जोपर्यंत केले जात नाही तोपर्यंत सभागृहाचे कामकाज स्थगित करण्यात यावे.

उप सभापती : सभागृहाचे कामकाज संपण्यापूर्वी यासंदर्भातील निवेदन येथे झाले पाहिजे असा निर्णय झाला होता.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हा विषय या सभागृहात पहिल्यांदा मांडला गेल्यामुळे यासंदर्भातील माहिती आपल्या सभागृहाला पहिल्यांदा दिली पाहिजे. विधानपरिषदेत हा विषय पहिल्यांदा उपस्थित झाला होता व नंतर हा विषय विधान सभेत उपस्थित झाला होता असे असतांना विधान परिषदेच्या अगोदर विधानसभेत या विषयाचे निवेदन कसे काय केले जाते ? सभापती महोदय, शासनाकडून आपल्याला जी सापत्नतेची वागणूक दिली जात आहे ती काही बरोबर नाही. त्यामुळे आताच माननीय संसदीय कामकाज मंत्र्यांना येथे बोलावून ताबडतोब यासंदर्भातील निवेदन करावयास सांगितले पाहिजे अशी आमची मागणी आहे. जोपर्यंत माननीय संसदीय कामकाज मंत्री येथे येऊन निवेदन करीत नाही तोपर्यंत सभागृहाचे कामकाज 5 मिनिटांसाठी स्थगित करण्यात यावे.

उप सभापती : माझी आपल्याला विनंती आहे की, सभागृहाचे कामकाज अत्यंत सुरळीतपणे सुरु आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, राज्याला शरमेने मान खाली घालावी लागेल अशा प्रकारचे वर्तन तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी केलेले आहे. महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात अशा प्रकारच्या घटना घडत असतील, राज्याचे मुख्यमंत्री जर सावकारांना पाठीशी घालत असतील तर ते योग्य नाही. त्यामुळे संसदीय कामकाज मंत्र्यांना येथे ताबडतोब निवेदन करावयास सांगण्यात आले पाहिजे. माननीय संसदीय कामकाज मंत्री या सभागृहात निवेदन करीत नाही तोपर्यंत सभागृहाचे कामकाज स्थगित करण्यात यावे. संसदीय मंत्र्यांना आपण पाच मिनिटात बोलवावे अशी विनंती आहे.

उप सभापती : सभागृहाचे कामकाज 10 मिनिटांसाठी स्थगित करण्यात येत आहे. सभागृहाचे कामकाज दुपारी 1.00 वाजता पुन्हा सुरु करण्यात येईल. माननीय संसदीय कामकाज मंत्र्यांनी सभागृहाचे आजचे कामकाज संपण्यापूर्वी या ठिकाणी निवेदन करावे.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : होय.

(सभागृहाची बैठक 12 वाजू 49 मिनिटांनी 1.00 वाजेपर्यंत स्थगित करण्यात आली.)

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, या सदनामध्ये सन्माननीय विरोधी पक्ष नेते आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या संदर्भात सरकारने निवेदन करावे अशी येथे चर्चा झाली. या संदर्भात विधानसभा सभागृहात चर्चा झाली. विधानसभा सभागृहात संसदीय कार्य मंत्र्यांनी जे निवेदन केले तेच निवेदन येथेही करावे अशी याठिकाणी चर्चा झाली, अशी मला माहिती मिळाली.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सदरहू विषय याठिकाणी उपस्थित करण्यात आला त्यावेळी माननीय सभापतींनी निर्देश दिले होते की, या संदर्भात तातडीने निवेदन करण्यात यावे...

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या सभागृहात विषय उपस्थित केल्यानंतर त्याबाबत माननीय सभापतींनी सरकाने या संदर्भात उद्या निवेदन करावे असे निर्देश दिले होते. त्या निर्देशाची प्रत मला प्राप्त झाली आहे, ही गोष्ट खरी आहे. या संदर्भात माननीय सर्वोच्च न्यायालयाने जो निर्णय दिलेला आहे त्याची सर्टीफाय कॉपी मिळावी यासाठी सरकारी वकिलांनी कालच माननीय सर्वोच्च न्यायालयाकडे अर्ज सादर केलेला आहे. ते जजमेंट 45 पानांचे आहे असे समजते. सदरहू जजमेंट इंटरनेटवरुन देखील घेण्याचा प्रयत्न केला. सरकारला निवेदन करावयाचे आहे परंतु आमच्या जवळ सर्टीफाय कॉपी नाही. सर्टीफाय कॉपी प्राप्त झाल्यानंतर त्यावर ॲडव्होकेट जनरल यांचे मत घेण्यात येईल त्यानंतरच निवेदन करण्यात येईल.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, आजचे कामकाज संपण्यापूर्वी सर्टीफाय कॉपी मिळेल काय ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, आमचे तसे प्रयत्न सुरु आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>नियम 93 अन्वये सूचनांवरील निवेदनासंदर्भात</u>

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, म.वि.प.नियम 93 अन्वये सूचना देणे आमचा अधिकार आहे. आज अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी सर्व निवेदने देण्यात आलेली आहेत. या निवेदनांवर चर्चा होणार नाही. तेव्हा माझी आपणास विनंती आहे की, आपण नियम 93 अन्वये सूचनांवर शासनास निवेदन करण्याचे निर्देश दिल्यानंतर त्याबाबतची निवेदने लवकरात लवकर करावी आम्हाला संरक्षण मिळावे अशी मी आपल्याला विनंती आहे.

उपसभापती : नियम 93 अन्वये सूचनांवरील निवेदने वेळेवर द्यावीत अशाप्रकारची सक्त सूचना मी सरकारला देत आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उपसभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते, महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते, महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते आणि महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्ष नेत्यांचे वेतन व भत्ते (सुधारणा) विधेयक.

L.A. BILL NO. XC OF 2010.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LEGISLATIVE COUNCIL (CHAIRMAN AND DEPUTY CHAIRMAN) AND MAHARASHTRA LEGISLATIVE ASSEMBLY (SPEAKER AND DEPUTY SPEAKER) SALARIES AND ALLOWANCES ACT, THE MAHARASHTRA MINISTERS' SALARIES AND ALLOWANCES ACT, THE MAHARASHTRA LEGISLATURE MEMBERS' SALARIES AND ALLOWANCES ACT AND THE LEADERS OF OPPOSITION IN MAHARASHTRA LEGISLATURE SALARIES AND ALLOWANCES ACT, 1978.)

श्री.हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्य मंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि.स.वि.क्र.90-महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उपसभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते, महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते, महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते आणि महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्ष नेत्यांचे वेतन व भत्ते (सुधारणा) विधेयक मांडतो.

उपसभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.हर्षवर्धन पाटील :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि.स.वि.क्र.90 महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उपसभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते, महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते, महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते आणि महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्ष नेत्यांचे वेतन व भत्ते (सुधारणा) विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

यानंतर श्री.गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील..

सभापती महोदय, हे विधेयक मांडत असतांना मी एवढेच सांगू इच्छितो की, वेतन भत्ता, दूरध्वनी वापराचा भत्ता, प्रवास भत्ता, बैठक भत्ता, एकत्रिकृत भत्ता, आतिथ्य भत्ता, लेखन सामग्री भत्ता व टपाल भत्ता, दैनिक भत्ता, रेल्वे प्रवास भत्ता,मैल भत्ता अशा बाबींचा अंतर्भाव या विधेयकात करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे रुल्समध्ये वाहन कर्जावरील व्याजाचा परतावा व दैनिक भत्ता इत्यादी बाबीचा देखील समावेश करण्यात आला आहे.कायद्यामध्ये कोण कोणत्या सुधारणा करण्यात येणार आहेत या संबंधी या विधेयकात सविस्तर खुलासा केलेला आहे त्यामुळे सभागृहाने या विधेयकाला मान्यता द्यावी अशी माझी विनंती आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, या विधेयकाच्या निमित्ताने मला एवढेच सांगावयाचे आहे की, विरोधी पक्षाचे काही आग्रहाचे मुद्दे असल्यामुळे काही वेळा सभागृहाचे कामकाज स्थगित करावे लागते.त्यामुळे जनमानसात अशी प्रतिक्रिया उमटते की या ठिकाणी कामकाज केले जात नाही व सदस्यांना भत्ते दिले जातात. त्यामुळे ज्या दिवशी सभागृहाचे कामकाज प्रत्यक्षपणे होणार नाही त्या दिवसाचे भत्ते सरकार जमा करावेत अशी सुधारणा करावयास पाहिजे. आताच्या विधेयकामध्ये लगेच अशी सुधारणा करता येणार नाही हे मला मान्य आहे. तेव्हा माननीय संसदीय कार्य मंत्र्यांना माझी अशी विनंती आहे की, दोन्ही सभागृहांनी जर अशा प्रकारचा विचार केला तर राजकीय व्यवस्थेवरील विश्वास वाढण्यास त्यामुळे मदतच होईल.

श्री.हर्षवर्धन पाटील :सभापती महोदय,सन्माननीय सदस्य श्री विनोद तावडे यांनी जी सूचना केलेली आहे त्या बाबतीत सर्व गट नेत्यांची बैठक आपण बोलवावी. ज्या दिवशी सभागृहाचे कामकाज होणार नाही त्या दिवसाचा भत्ता आम्हाला देण्यात येऊ नये अशा प्रकारचे पत्र काही सन्माननीय सदस्यांनी दिलेले आहे. त्यामुळे गट नेत्यांची बैठक आपण बोलवावी आणि त्या बैठकीत जो काही निर्णय होईल त्याप्रमाणे आपण करु. त्याकरता सुधारणा आणण्याची गरज नाही. त्यासाठी संबंधित शाखेला फक्त कळवावे लागेल की, एखाद्या दिवशी जर सभागृहाचे कामकाज झाले नाही तर त्याचा भत्ता देण्यात येऊ नये. परंतु या संदर्भात आपण गट नेत्यांची बैठक बोलवावी आणि त्या बैठकीत यासंबंधीचा निर्णय घेण्यात यावा. सन्माननीय सदस्यानी जी सूचना कलेली आहे ती मान्य करण्यास आमची काही हरकत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हुसेन दलवाई : सभापती महोदय, सभागृहाचे कामकाज जे चालवू इच्छितात त्यांना हा दंड लावणे चुकीचे आहे. सभागृहाचे काम मुद्दामहून काही जणांना चालवू द्यावयाचे नाही. लोकसभेचे कामकाज चालवू दिले नाही. त्यामुळे मोठया प्रमाणावरील खर्च वाया गेला आहे. जे कामकाज चालवू इच्छित नाहीत त्यांनी ही नैतिक जबाबदारी घेतली पाहिजे व त्यांना हा दंड लावला पाहिजे. माननीय मंत्री महोदयांनी आता जे विधेयक आणले आहे ते मला वाचता आले नाही. ब-याचदा अशा प्रकारचे विधेयक सभागृहासमोर आणल्यानंतर सरकारी अधिका-यांना किती पैसे मिळतात असे विचारले जाते. परंतु त्यांना जे काही मिळते त्याबाबतीत आपल्याला राग असण्याचे काही कारण नाही.मला एवढेच सांगावयाचे आहे की, लोकप्रतिनिधींना मोठया प्रमाणावर खर्च येत असतो. मी एकच उदाहरण देतो .माझ्या कार्यालयात दररोज 25 ते 30 व्यक्ती येत असतात त्यांना चहा देण्यासाठी खर्च येत असतो. वर्तमानपत्रातून याबाबतीत नेहमीच टीका केली जाते पंरतु जे लोक वेगळया मार्गाने पैसे कमावत नाहीत त्यांना हा खर्च भागवतांना नाकीनऊ येते.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री मोहन जोशी)

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रमाणीकरणासाठी नाही

श्री. हुसेन दलवाई...

त्यासंदर्भात वाढीव मानधन देणे चुकीचे नाही. याठिकाणी 2 हजार रुपये बेसिक वेतन प्रस्तावित केले आहे. ही एकप्रकारे आमची चेष्टा केल्यासारखे आहे. यामध्ये भत्ते आणि मानधन मिळून सदस्यांच्या एकूण वेतनामध्ये किती वाढ होणार आहे याची मला कल्पना नाही.परंतु सर्व मिळून किमान 1 लाख रुपये तरी त्यांना मिळाले पाहिजे अशी माझी सूचना आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, माननीय वित्त मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली वेतन व भत्ते सुधार समिती गठीत करण्यात आली आहे. त्या समितीमध्ये या सदनातील दोन्ही बाजूकडील माननीय सदस्यांचा समावेश असतो. त्याचप्रमाणे संसदीय कार्य मंत्री हे निमंत्रित असतात. तेव्हा या समितीच्या बैठकीला निमंत्रित म्हणून मी देखील उपस्थित होतो. या सभागृहामध्ये वेतन व भत्ते सुधारणा विधेयक मांडण्यापूर्वी आपल्याला या समितीकडे जावे लागते. तशी या समितीच्या मॅन्युअलमध्ये तरतूद आहे. या समितीने शिफारस केल्यानंतर मंत्रिमंडळापुढे प्रस्ताव घेऊन जावे लागते. मंत्रिमंडळाने त्या प्रस्तावाला मान्यता दिल्यानंतर आपण हे विधेयक सभागृहाच्या मान्यतेसाठी सादर करतो. म्हणून या संदर्भात मागील सहा महिन्यामध्ये आपण संपूर्ण अभ्यास केल्यानंतर सर्व मिळून 44 हजार रुपये असलेले मानधन 75 हजार रुपये करण्याबाबत शिफारस केली आहे. यामध्ये सर्व बाबींचा विचार करुनच शासनाने आपली भूमिका मांडली असल्यामुळे सभागृहाने हे विधेयक संमत करावे अशी विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती (श्री. मोहन जोशी) : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 25 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. राधाकृष्ण विखे पाटील : सभापती महोदय, हे विधेयक एकमताने संमत करावे अशी मी विनंती करतो.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि.स.वि. क्रमांक 90 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती : सन 2010 चे वि.स.वि. क्रमांक 90 एकमताने संमत झाले.

---- (यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मुंबई ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (दुसरी सुधारणा) विधेयक.

L.A. BILL NO. LXXXVIII OF 2010.

(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY VILLAGE PANCHAYATS ACT, 1958 AND THE MAHARASHTRA ZILLA PARISHADS ACT PANCHAYAT SAMITIS ACT, 1961.)

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील(ग्रामविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2010चे विधानसभा विधेयक क्रमांक 88. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम,1958 आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम,1961 यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

तालिका सभापती (श्री. मोहन जोशी) : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.सतेज पाटील : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे विधानसभा विधेयक क्रमांक 88. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम,1958 आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम,1961 यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय,या विधेयकाच्या माध्यमातून ग्रामपंचायत सदस्य, पंचायत समितीचे सदस्य, जिल्हा परिषद सदस्य यांच्या निवडणुकीसाठी त्यांच्या स्वत:च्या घरात शौचालय असावेत यासंबधीचे हे विधेयक आहे. एक्झिस्टिंग सदस्यांसाठी 90 दिवसाची मुदत यामध्ये दिलेली आहे. भविष्यकाळात जे निवडणुकीला उभे रहाणार आहेत त्यांचे स्वत:च्या घरामध्ये शौचालय असावे अशा प्रकारची तरतूद या विधेयकात करण्यात आलेली आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, विधेयक क्रमांक 88 वर बोलत असताना या विधेयकातील उद्देश आणि कारणे जरी चांगली असली तरी उमेदवारासाठी असलेली पात्रता मग जिल्हापरिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, ग्रामपंचायत सदस्य, आमदार, खासदार या सर्वांना एकाच पात्रतेची आवश्यकता आहे. असे असताना राज्य शासनाने फक्त ग्रामपंचायतीचे सदस्य, जिल्हापरिषद सदस्य आणि पंचायत समितीचे सदस्य यांच्यावर ही पात्रता लादलेली आहे.

सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, ही पात्रता सन्माननीय आमदारांसाठी आणि सन्माननीय खासदारांसाठी का लागू करण्यात येत नाही? नियम सर्वांसाठी असले पाहिजेत. लोकप्रतिनिधी कोणीही असो त्या सगळयांसाठी नियम असले पाहिजेत. सभापती महोदय, या विधेयकात ज्यांच्याकडे शौचालय नाही मात्र जे नियमितपणे सार्वजनिक शौचालयाचा वापर करतात असे म्हटले आहे. सभापती महोदय, सार्वजनिक शौचालये कुठे आहेत? महानगरपालिका, नगरपालिका क्षेत्रात किंवा एखादी ग्रामपंचायत छोटी असेल तर त्याठिकाणी ही शौचालये आहेत. पण ग्रामीण भागातील अवस्था अशी आहे की, त्यांच्या जवळ अजूनही शौचालयाची व्यवस्था नाही. हा कायदा आणत असताना शासनाने याचा विचार केला आहे काय? महाराष्ट्रातील प्रत्येक खेडयात आणि पाडयात प्रत्येक घरामध्ये शौचालयाची व्यवस्था निर्माण करण्यासाठी शासनाने कोणता विशेषकृती कार्यक्रम घेतलेला आहे? याची माहिती या ठिकाणी देण्यात यावी. खऱ्या अर्थाने ही जी व्यवस्था आहे ती चांगली व्यवस्था आहे. गावे हागणदरी मुक्त करीत असताना ग्रामपंचायतीला फार मोठे बक्षिस आणि अनुदान देण्यात आलेले आहे. ज्या गावांना पारितोषिक मिळालेले आहे त्या गावांमध्ये आजही जाऊन बघितले तर रस्त्याच्या बाजूला माणसे प्रातर्विधीसाठी बसलेले असतात. भगिनीसुध्दा बसलेल्या असतात. सभापती महोदय, प्रायोगिक तत्वावर ज्या ग्रामपंचायतींना प्रोत्साहनपर बक्षीस दिलेले आहे. त्या ग्रामपंचायतीसाठी विशेष कायदा करण्यात येणार आहे काय? कारण ते गाव हागणदरी मुक्त झालेले आहे. पण त्या गावामध्ये प्रदुषण होत आहे याला जबाबदार कोण] त्यांच्यावर शासन कोणती कडक कारवाई करणार आहे? ग्रामपंचायतीचा, पंचायत समितीचा, जिल्हा परिषदेचा विचार करीत असतांना त्या योजनेवर लाखो करोडो रुपये खर्च करण्यात आलेले आहेत. आता देखील सप्लीमेंटरी बजेटमध्ये त्यासाठी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर...

मोठया प्रमाणात तरतूद करण्यात आलेली आहे. एवढा पैसा खर्च करण्यात येत असताना या योजनेचे लक्ष पूर्ण करण्यासाठी सातत्याने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. हे काम एका माणसाचे नाही. मंत्र्यांचे नाही. तर हे सार्वजनिक जनहिताचे काम आहे.म्हणून सार्वजनिक जनहिताच्या कामामध्ये लोकप्रतिनिधी मग ते गावातील असोत,शहरातील असोत, विधानपरिषदेतील असोत वा विधानसभेतील असोत या सर्वांनी हा कार्यक्रम राबविण्यासाठी मदत केली पाहिजे असे मला वाटते. यासंबंधीचे विधेयक आणत असताना निश्चितपणे या गोष्टींचा विचार केला पाहिजे.

यानंतर श्री. बरवड.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर ....

सभापती महोदय, सन 2010 चे वि. स. वि. क्रमांक 88 हे जे विधेयक शासनाने आणले आहे ते चांगले विधेयक आहे. मी या विधेयकाचे स्वागत करतो आणि माझे विचार संपवितो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MMP

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2010 चे वि. स. वि. क्रमांक 88 या विधेयकाचा हेतू चांगला आहे. जे लोकप्रतिनिधी आहेत त्यांनी सुध्दा काही नियम पाळले पाहिजेत. या ठिकाणी उद्देश व कारणे सांगत असताना हा एक योगायोग म्हणावा की मुद्दाम केलेली रचना म्हणावी हे माहीत नाही पण माननीय गृह राज्यमंत्री हेच ग्रामविकास राज्यमंत्री सुध्दा आहेत. म्हणजे पोलिसांनी आता हे सुध्दा तपासण्याचे काम करावयाचे काय असा प्रश्न मनामध्ये तयार होतो. आपण नियमामध्ये जे म्हटले आहे त्याबद्दल माझा थोडा आक्षेप आहे. संबंधित ग्रामपंचायत सदस्य हे गावातील सार्वजनिक शौचालय वापरतात की नाही याचे प्रमाणपत्र ग्रामपंचायत आणि ग्रामसभेने द्यावयाचे आहे.

आपल्याला माहीत आहे की, अनेक गावांमध्ये गटबाजी असते आणि या गटबाजीमध्ये दुर्दैवाने अविश्वासाचा ठराव वगैरे आणावयाचा असेल तर ज्या ठिकाणी अगदी थोडक्यात बहुमत जात असेल अशा ठिकाणी गाव पातळीवर मुद्दाम एखादा सदस्य सार्वजनिक स्वच्छतागृहाचा उपयोग करीत असून देखील तो तसे करीत नाही अशा पध्दतीने ठराव करुन ग्रामसभा आणि ग्रामपंचायतीकडून या कायद्याचा दुरुपयोग केला जाण्याची शक्यता आहे. जर एखाद्या उपसरपंच महिलेवर अविश्वास ठराव आणण्याचे ठरले किंवा उपसरपंच दलित असेल किंवा विशेष कॅटेगरीतील असतील तर याचा दुरुपयोग करण्याची शक्यता आहे. या अविश्वास ठरावाच्या वेळेला स्वत: तहसीलदार उपस्थित असतात. स्वत: निरीक्षक उपस्थित असतात किंवा प्रशासक पाठवून अविश्वास ठराव योग्य आहे की नाही, हा ठराव दबावाखाली घेतला गेला आहे काय याची खातरजमा केली जाते. मला असे सूचवावयाचे आहे की, एखाद्या ग्रामसभेमध्ये या मुद्यावरुन ग्रामपंयायत सदस्याचे सदस्यत्व रद्द करण्यापर्यंत परिस्थिती जाईल. त्यामध्ये अपील करणे किंवा त्यांनी वस्तुस्थिती चॅलेंज केली किंवा ग्रामसभेमध्ये दबाव आणला गेला तर याची काय प्रक्रिया असणार हे माननीय मंत्री महोदयांच्या भाषणात स्पष्ट झाले पाहिजे. अन्यथा नेहमीच्या प्रोसीजरमध्ये सर्व ठराव करीत गेले आणि त्या ग्रामपंचायत सदस्याला सार्वजनिक शौचालयाचा वापर करीत असून देखील तो करीत नाही अशा पध्दतीने सूडबुध्दीने याचा उपयोग केला जाण्याची शक्यता मला दिसून येते. कारण अनेक गावांमध्ये पाहिजे तसे निकोप आणि स्वच्छ वातावरण नाही. आपण तंटामुक्त समित्या जरी केल्या असल्या तरी तंटामुक्त समितीच्या अध्यक्षालाच मारहाण झाल्याच्या घटना अनेक ठिकाणी घडलेल्या आहेत.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ....

सभापती महोदय, माझी दुसरी सूचना अशी आहे की, परिच्छेद 2 मध्ये खालून चौथ्या वाक्यामध्ये असे म्हटले आहे की, ग्रामपंचायत लोकांसमोर आदर्श ठेवण्याचा हा नमुना आहे. याबाबत माझी अशी दुरुस्ती आहे की, या ठिकाणी ग्रामपंचायत लोकांसमोर चांगले उदाहरण ठेवण्याचा हा नमुना आहे असा उल्लेख करावा. कारण आदर्श शब्द आला की, मनामध्ये थोड्याशा शंका निर्माण होतात. त्यामुळे ग्रामपंचायत लोकांसमोर चांगले उदाहरण ठेवण्याचा हा नमुना आहे असा उल्लेख यामध्ये केला असता तर चांगले झाले असते असे मला वाटते. तिसरा मुद्दा असा की आपण ग्रामविकास विभागातर्फे निर्मल ग्राम योजना राबवितो. परंतु या निर्मल ग्राम योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी त्यामध्ये अंगणवाडी शिक्षिकांना समाविष्ट करुन घेतो. त्यांनी सकाळी जाऊन लोकांना सांगावयाचे आहे की, तुम्ही उघड्यावर प्रातर्विधी करु नका. अशा पध्दतीने अंगणवाडी शिक्षिकांना हे काम दिलेले आहे. निर्मल ग्राम करीत असताना तुम्ही असे करु नका यासाठी जे लोक त्यांना प्रवृत्त करतात त्यांना लोकांनी दगड मारणे, शिव्या देणे, वाटेल तसे बोलणे अशा गोष्टी करीत असतात. त्यांनी किती वाजता लोकांना परावृत्त करावयाचे ? त्यांनी सकाळी जाऊन परावृत्त करावे हे काही मला योग्य वाटत नाही. कारण नसताना या अंगणवाडी शिक्षिकांना हेटाळणी सहन करावी लागते. हे विधेयक जरी चांगले असले तरी त्याच्या अंमलबजावणीमध्ये राजकीय सूडबुध्दी वापरली जाऊ नये यादृष्टीकोनातून शासन काय दक्षता घेणार हे स्पष्ट व्हावे अशी विनंती करुन मी माझे भाषण संपविते

अशुधारित प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

RDB/ D/ MMP/

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2010 चे वि. स. वि. क्र. 88 यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभी आहे. आपली घरची महिला बाहेर जावी असे कोणालाही वाटणार नाही. जेथे राजे शहाजहान यांनी स्वत: बायकोच्या प्रेमापोटी ताजमहाल बांधला त्या ठिकाणी बायकोच्या प्रेमापोटी संडास बांधाण्यामध्ये ग्रामीण भागातील कोणीही माणूस मागे पाहणार नाही. प्रश्न असा आहे की, यासाठी त्याला आतापर्यंत जी आर्थिक मदत दिली जात होती ती आता पुरेशी मिळत नाही. त्यामुळे तेवढे बांधकाम करण्याची ग्रामीण भागातील लोकांची आज परिस्थिती नाही. ज्यावेळी सार्वजनिक शौचालय बांधण्याचा विषय येतो त्यावेळी सगळ्यात अडचणीची बाब अशी आहे की, त्या संडासच्या स्वच्छतेसाठी लागणारे जे पाणी आहे ते आपण पुरवू शकत नाही. त्यामुळे आपण सार्वजनिक शौचालये कितीही चांगली आणि सुंदर बांधली तरी पाण्याअभावी या शौचालयांमुळे ग्रामीण भागातील आरोग्य बिघडविण्यासारखी परिस्थिती आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभाताई फडणवीस...

म्हणून याठिकाणी शासनाने जे विधेयक आणलेले आहे त्याबाबत माझे एवढेच म्हणणे आहे की, ग्रामीण भागामध्ये 90 दिवसांची मुदत दिलेली आहे. त्यांनी 90 दिवसामध्ये ते बांधून घ्यावे हे ठीक आहे. परंतु जे मागासवर्गीय असतील, आदिवासी असतील, ज्यांची आर्थिक परिस्थिती बरोबर नसेल, दारिद्रय रेषेखालील असतील त्यांना 100 टक्के अनुदान शौचालय बांधून देण्यासाठी मदत करावी.

सभापती महोदय, या शौचालयांच्या पाण्याची व्यवस्था करण्यासाठी शासनाने पाणीपुरवठा योजनांना आर्थिक मदत करावी. जेणे करुन ग्रामीण भागाचे स्वास्थ्य चांगले राहील.

सभापती महोदय, तिसरा मुद्दा असा आहे की, शिक्षकांनी आता कोणकोणती कामे करावीत अशी शासनाची अपेक्षा आहे ? माझ्या क्षेत्रामध्ये एकदा दोन शिक्षक मोटर सायकल घेऊन रस्त्यावर उभे होते. मला वाटले की, ते दोघे आपल्या मित्राची वाट बघत उभे राहिले असतील. मी त्याच रस्त्याने दीड-दोन तासांनी परतल्यावर ते दोघे तेथेच उभे असल्याचे मला आढळून आले. त्यावेळी मी त्यांना विचारले की, आज शाळा चालू असताना तुम्ही शाळेमध्ये का गेला नाहीत ? त्यावर ते मला म्हणाले की, आज शाळा चालू आहेत, परंतु आम्हाला सरकारने असे सांगितले आहे की, ग्रामीण भागातील कोणती माणसे बाहेर शौचालयासाठी जातात, त्यामध्ये पुरुष किती, महिला किती, आदिवासी किती, दलित किती हे मोजावे. या कामासाठी आम्ही उभे आहोत. अशाप्रकारचे काम जर शिक्षकांकडे देऊ लागलो तर शिक्षणाचे वाटोळे होण्यासाठी वेळ लागणार नाही. शिक्षक हा शिक्षण क्षेत्रातील महत्वाचा घटक आहे, विद्यार्थ्यांचे गुरु आहेत, त्यांचा दर्जा काय आहे हे पाहून तरी त्यांच्याकडे हे काम देऊ नये. म्हणून हा कायदा करीत असताना हे काम मजुरांकडे द्यावे, त्यासाठी कोणाची तरी नियुक्ती करावी. बाहेर शौचालयासाठी जाणाऱ्यांची मोजदाद करण्यासाठी शिक्षकांचा वापर होत असेल, त्यांची यादी तयार करण्याचे काम त्यांच्याकडे दिले जात असेल तर शिक्षणाचे मोठया प्रमाणात वाटोळे होण्यासाठी वेळ लागणार नाही. म्हणून मी यापूर्वी सांगितल्याप्रमाणे जे गरीब, आदिवासी, दारिद्रय रेषेखालील, दलित आहेत त्यांना शौचालय बांधण्यासाठी शासनाने 100 टक्के आर्थिक मदत करावी व शौचालयांसाठी लागणा-या पाण्यासाठी शासनाने सोय करावी एवढया दोन मागण्या करुन मी या विधेयकावरील माझे मनोगत पूर्ण करते.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/

श्री.रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम,1958 आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम,1961 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता सन 2010 चे वि.स.वि.क्रमांक 88 मांडण्यात आले आहे. या विधेयकावर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, हे विधेयक आणण्यासाठी सरकारने घाई केली आहे असे मला वाटते. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी आता जे विचार मांडले त्याच्याशी मी 100 टक्के सहमत आहे. हे विधेयक आणण्यापूर्वी शासनाने प्रथम महाराष्ट्रात सर्व्हे करणे आवश्यक होते. या राज्यामध्ये 200-300 इतकी लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायती किती आहेत, 1 हजार लोकवस्ती असलेल्या ग्रामपंचायती किती आहेत, 1 हजारापेक्षा जास्त लोकवस्तीच्या ग्रामपंचायती किती आहेत याचा सर्व्हे करणे आवश्यक होते. मी आपल्यामार्फत शासनाला सांगेन की, हा सर्व्हे करीत असताना महाराष्ट्रातील छोटया छोटया गावामध्ये आतापर्यंत नळ पाणीपुरवठा योजना पोहोचवू शकलो नाही. आजही ग्रामीण भागातील महिलांना 2-2 किमी अंतरावरुन डोक्यावरुन पाणी घेऊन यावे लागते. आपल्या मुलांना शाळेत सोडल्यानंतर पिण्याचे पाणी डोक्यावरुन आणावे लागते. पंचायत समितीच्या सदस्यांच्या किंवा जिल्हा परिषदेच्या सदस्यांच्या किंवा ग्रामपंचायत सदस्यांच्या घरामध्ये स्वत:चे शौचालय असणे आवश्यक आहे. ते चालू असले पाहिजे. परंतु त्या गावामध्ये नळ पाणीपुरवठा योजना चालू असेल, त्यांच्या घरात पाण्याची टाकी असेल किंवा शौचालय असेल तेव्हाच ते त्या शौचालयाचा वापर करु शकतील. म्हणून यानिमित्ताने मी शासनाला प्रश्न विचारतो की, आजपर्यंत किती गावातील नळ पाणीपुरवठा योजना बंद पडलेल्या आहेत त्याची माहिती शासनाकडे आहे का ? अनेक गावामध्ये नळ पाणीपुरवठा आहेत परंतु त्याची दुरुस्ती केलेली नाही, त्यांनी विजेचे बिल भरलेले नाही म्हणून त्या बंद आहेत. हे मी अतिशय जबाबदारी बोलतो. या योजना दुरुस्त करण्यासाठी या विधेयकात काही तरतूद केलेली आहे काय ?

यानंतर श्री.शिगम

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम...

राज्यातील अनेक योजना ग्रामपंचायतीने बिल न भरल्यामुळे 6-6 महिन्यापासून, एक-एक वर्षापासून बंद आहेत. मग अशा वेळी पाण्याअभावी ग्रामपंचायतीच्या सदस्यांकडील शौचालय वापरात नसतील तर ते सर्व सदस्य बाद ठरतील आणि ग्रामपंचायतीचे अस्तित्वच राहाणार नाही. अशी परिस्थिती निर्माण झाली तर शासन काय करणार आहे ? या विधेयकाचा दुसरा अर्थ असा होतो की, जो श्रीमंत आहे, ज्याच्या घरामध्ये शौचालय आहे, ज्याने स्वत:हून पाणी आणलेले आहे तोच भविष्यामध्ये ग्रामपंचायतीचा सदस्य होऊ शकतो. हे विधेयक शासनाने कोणासाठी आणलेले आहे ? हे विधेयक धनदांडग्यांसाठी आणलेले आहे. हे विधेयक ग्रामीण भागातील तळागाळातील गरीब माणसासाठी, मागासवर्गीयासाठी, अल्पभूधारकासाठी, भूमिहिनांसाठी आणलेले नाही. माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, या विधेयकामध्ये अगदी साध्या तरतुदी आहे. परंतु सभापती महोदय, आपण ख-या अर्थाने विचार केला तर हे साधे विधेयक नाही असेच आपल्याला दिसून येते.

सभापती महोदय, युती शासनाच्या वेळी माननीय श्री. मनोहर जोशी हे राज्याचे मुख्यमंत्री होते. त्यावेळी त्यांनी राज्यातील ग्रामीण भागातील भगिनींसाठी 50 लाख मोफत शौचालयाची योजना जाहीर केली. त्यावेळी त्यांनी केलेल्या भाषणातील एक वाक्य अजूनही मला आठवते. त्यांनी असे म्हटले होते की, "आम्ही जेव्हा ग्रामीण भागातून लाल दिव्यांच्या गाड्या घेऊन जातो त्यावेळी गाड्यांच्या दिव्यांच्या पडणा-या प्रकाशामुळे लाजेखातर आमच्या भगिनी उठून उभ्या राहातात. ही परिस्थिती महाराष्ट्राला भूषणावह नाही." मग हे विधेयक आणत असताना राज्यातील जो शेवटचा तळागाळातील माणूस आहे, जो आदिवासी आहे, जो मागासवर्गीय आहे, जो अल्पभूधारक आहे, जो दारिद्र्य रेषेखालचा आहे त्याचा विचार शासनाने जरासुध्दा केलेला नाही. सभापती महोदय, आपल्या ग्रामीण भागामध्ये आज देखील अशी गरीब माणसे आहे की ती दिवसभर कष्ट करुन 50 रुपये मिळवतात आणि संध्याकाळी त्या 50 रुपयात आपल्या पोटाची आग विझवतात. असे 30 टक्के लोक आपल्या राज्यात आहेत. मग अशा लोकांना ग्रामपंचायतीचा सदस्य होण्याचा अधिकार आपण देणार नाही काय ? मंत्री महोदय असे सहज बोलून गेले की, ज्याच्या घरामध्ये शौचालय आहे आणि ते वापरात आहे त्यालाच ग्रामपंचायतीचा सदस्य होण्याचा अधिकार आहे. हे विधेयक

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आणत असताना ग्रामीण भागातील शेवटच्या माणसाचा शासनाने यत्किंचितही विचार केलेला नसल्यामुळे या विधेयकाला माझा तीव्र विरोध आहे. या निमित्ताने मी शासनाला अशी सूचना करीत आहे की, अशा प्रकारचे विधेयक आणण्यापूर्वी शासनाने प्रत्येक गावाचा, वाड्यांचा, पाड्यांचा, तांड्याचा सर्व्हे करावा. त्या ठिकाणी नळ योजना चालू आहेत काय, तेथील माणसाला पाणी मिळते काय हे पाहिले पाहिजे. घरामध्ये शौचालय अनिवार्य करीत असताना तो गरीब माणूस आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे काय हे पाहिले पाहिजे. जर तो सक्षम नसेल तर तो तसा सक्षम होण्यासाठी त्याला हक्काचा रोजगार मिळाला पाहिजे. अशी व्यवस्था शासनाने केली तर मग शासन सांगू शकते की तू दिवसाला 200 रुपयाप्रमाणे महिन्याला 6000 रुपये कमावतोस त्यामुळे तू घरामध्ये शौचालय बांधू शकतोस. परंतु अशी परिस्थिती शासनाने राज्यात निर्माण केलेली आहे काय ? तर नाही. म्हणून मी या विधेयकाला विरोध करीत आहे. एका बाजूला माणूस अर्धपोटी आहे, त्याला रोजगार नाही, दोन-दोन दिवस तो उपाशी राहातो आणि दुस-या बाजूला त्याला घरामध्ये शौचालय बाधंण्यास सांगितले जाते हे कितपत योग्य आहे? हे विधेयक शासनाने कशासाठी आणलेले आहे ? या ठिकाणी हे विधेयक आणत असताना मंत्री महोदयांनी असे सांगावे की, आम्ही राज्यातील ग्रामीण भागातील प्रत्येक माणसाला आर्थिकदृष्ट्या सक्षम केलेले आहे, तो घरामध्ये पाणी आणू शकतो, शौचालय बांधू शकतो. लोकशाहीमध्ये लोकांनी निवडून दिलेल्या सरकारने लोकांच्या अन्न,वस्त्र आणि निवारा या तीन मूलभूत गरजा पूर्ण केल्या पाहिजेत. या मूलभूत गरजा शासनाने दिलेल्या आहेत काय ?

सभापती महोदय, राज्य शासनाची आज काय परिस्थिती आहे ? राज्य शासनातील आयएएस आणि आयपीएस अधिकारी 5-5 फ्लॅटमध्ये रहात आहेत आणि शेवटच्या माणसाला राहायला घर नाही की खायला अन्न नाही अशी राज्यातील परिस्थिती आहे. अशी परिस्थिती असताना तुमच्या घरामध्ये पाणी असेल, शौचालय असेल तरच तुम्हाला ग्रामपंचायतीचे सदस्य होता येईल असे सांगण्याचा राज्य शासनाला काय अधिकार आहे ? हे विधेयक मागे घ्यावे अशी मी शासनाला विनंती करतो. हे विधेयक आणण्यापूर्वी राज्य शासनाने पहिल्यांदा असे सांगावे की, त्यांनी राज्यातील साडेअकारा कोटी लोकांच्या खाण्या-पिण्याची, राहाण्याची, पाण्याची , रोजगाराची

....3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

व्यवस्था केलेली आहे. ग्रामीण भागातील लोकांना रोजगार मिळण्यासाठी रोजगार हमी योजना राबविली. पण या रोजगार हमी योजनेचे पैसे शासनाने कुठे वळविले ?

....नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.....

शेवटच्या माणसाचे रोजगार हमी योजनेचे 20 हजार कोटी रुपये तुम्ही दुसरीकडे वळविले आहेत. शेवटच्या माणसाचा रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून हाताला काम मिळविण्याचा हक्क होता. त्यांचे 20 हजार कोटी रुपये कुठे वळविले? रोजगार हमी योजनेचा पैसा तुम्ही पळवून नेत आहात. गरीब माणसाच्या घरामध्ये शौचालय असले पाहिजे असे सांगत आहात. परंतु त्या गरीब माणसाला तुम्ही रोजगार देऊ शकत नाही. त्यांची आर्थिक क्षमता वाढवू शकत नाही. शासन त्या गरीब माणसाला रोजगार उपलब्ध करुन देणार आहे काय? या बिलामध्ये शौचालय बांधण्यासाठी 90 दिवसांची मुदत दिली आहे. एक शौचालय बांधण्यास किती खर्च येतो? किमान 8 ते 10 हजार रुपयांमध्ये आज चांगले शौचालय बांधता येणार नाही. शासन फक्त 2500 रुपये देणार आहे. तो गरीब माणूस 7500 हजार रुपये कुठून आणणार? घरामध्ये शौचालय असले पाहिजे असे सांगून शासन त्या गरीब माणसाच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम करीत आहे. त्या गरीब माणसाची चेष्टा केली जात आहे. शासनाने या सभागृहात जाहीर करावे की, होय, आम्ही शौचालय बांधण्यासाठी त्या गरीब माणसाला 10 हजार रुपये देणार आहोत. घरापासून 1 कि.मी., 2 कि.मी., 5 कि.मी.वर असलेल्या नळ योजनेतून पाण्याचे कनेक्शन देण्यासाठी जो खर्च येईल तो देणार आहोत, असे मंत्रीमहोदयांनी याठिकाणी सांगितले तर मी ताबडतोब खाली बसतो.

सभापती महोदय, गरीब माणसाच्या घरात पाण्याची व्यवस्था नाही, त्यासाठी निधी द्यायचा नाही, नळ योजना बंद पडली तर दुरुस्तीला पैसा द्यायचा नाही. ज्या गावामध्ये 300 ते 400 लोकसंख्येची ग्रामपंचायत आहे अशा गावातील नळ योजना बंद पडली तर ती दुरुस्त करण्याची त्या ग्रामपंचायतीची क्षमता नसते. त्यामुळे वर्षानुवर्षे त्या गावातील नळ योजना बंद असते. जो गरीब आहे, आदिवासी आहे तो शौचालय बांधण्यासाठी पैसा कुठून आणणार? शेवटचा माणूस नजरेसमोर ठेवून तुम्ही हे विधेयक आणले आहे. राज्यातील प्रत्येक नागरिक आर्थिकदृष्टया सक्षम आहे असे गृहीत धरुन हे विधेयक आणले आहे. माझी आपल्यामार्फत शासनाला विनंती आहे की, हे विधेयक दोन्ही सभागृहाच्या 35 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे पाठवावे. त्याठिकाणी साधकबाधक चर्चा व्हावी. माननीय मुख्यमंत्री, ग्रामविकास मंत्री यांनी चर्चा करुन कॅबिनेटपुढे हा विषय मांडावा आणि शेवटचा माणूस आर्थिकदृष्टया सक्षम होईल, त्याच्या घरात पाण्याची व्यवस्था होईल, अशी व्यवस्था करावी.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.....

सभापती महोदय, सन्माननीय ग्रामविकास राज्यमंत्री श्री.सतेज पाटील यांना याची कल्पना नसावी. मागील एक वर्षात राज्यातील 15 लाख लोक दारिद्र्यरेषेच्या खाली गेले आहेत. मी हे जबाबदारीने सांगत आहे. या महाराष्ट्रामध्ये मागील एक वर्षात 15 लाख लोक दारिद्र्यरेषेच्या खाली गेले आहेत. 15 लाख लोक दारिद्र्यरेषेच्या वर येण्याऐवजी दारिद्र्यरेषेच्या खाली गेले आहेत. राज्यातील बीपीएल खालील जनता एपीएलमध्ये येण्यासाठी बचत गटाच्या माध्यमातून करोडो रुपये खर्च केले जात आहेत. रिझल्ट काय आहेत? उद्देश हाच आहे की, बचत गटाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिला दारिद्र्यरेषेच्या वर आल्या पाहिजेत. परंतु या राज्यात उलटी गंगा वाहते आहे. या राज्यातील धनदांडगे अधिक धनिक होत आहेत आणि गरीब माणसे अधिक गरीब होत आहेत. हे विधेयक गरीब माणसांची चेष्टा करणारे आहे, त्यांच्या जखमेवर मीठ चोळणारे असल्यामुळे मी या विधेयकाला तीव्र विरोध करुन माझे भाषण पूर्ण करतो.

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन 2010 चे वि.स.वि. क्रमांक-88 यावर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, सर्वसामान्य माणसाला अशी अट घालण्यात आली आहे की, त्याचे स्वत:चे शौचालय असले पाहिजे. मी अत्यंत जबाबदारीने कथन करतो. अजूनही पश्चिम महाराष्ट्रातील प्रगत जिल्हयामध्ये सुध्दा हजारो गावे अशी आहेत की, त्या गावांमध्ये लाखो कुटुंबांकडे स्वत:चे शौचालय नाही. माननीय ग्रामविकास राज्यमंत्री श्री.सतेज पाटील यांचे एका गोष्टीकडे लक्ष वेधू इच्छितो. माननीय मंत्रीमहोदय हे गगनबावडा तालुक्यातील मूळ रहिवासी आहेत. त्या तालुक्यात शेकडो गावांमधील 8 ते 10 घरांमध्ये देखील शौचालयाची व्यवस्था नाही.

नंतर 2इ.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे .....

महोदय, या विधेयकाच्या माध्यमातून शासनाला "घर तेथे शौचालय" अशी व्यवस्था देखील करता आली असती, पण ती शासनाने केली नाही. ज्यांच्याकडे शौचालय बांधण्याची क्षमता नाही त्यांना बिनव्याजी कर्ज देऊन त्यांच्या घरात शौचालयाची व्यवस्था शासनाने केली असती तर आम्ही त्याचे स्वागतच केले असते. सभागृहात बोलत असताना सन्माननीय सदस्यांनी एका गोष्टीचा उल्लेख केला की बऱ्याच ठिकाणी पाणीपुरवठा सुध्दा होत नाही. गावापर्यंत पाणी पुरवठा केला तरी स्वत:च्या खर्चाने घरापर्यंत नळ घेण्याचीही ऐपत नसलेली लाखो कुटुंबे आजही या राज्यात जगत आहेत. अशा परिस्थितीत ते आपल्या घरात शौचालय कसे बांधतील आणि त्याला पाणी कोठून आणणार हा संशोधनाचा विषय आहे, याचा मात्र शासनाने विचार केलेला दिसत नाही. खरे म्हणजे पाण्याचे नळ ही दुसरी योजना शासनाने जनतेसाठी जाहीर केली तरच हा नैतिक अधिकार शासनाला प्राप्त होतो, अन्यथा ग्रामपंचायतीच्या कायद्यात दुरुस्ती करण्यासंबंधीचे जे विधेयक आहे त्याचा फायदा फक्त मूठभर धनिकांनाच होणार आहे. गरीब लोकांना मात्र प्रतिनिधीत्वाचा जो अधिकार आपल्या घटनेनेच दिलेला आहे त्यांची ऐपत शासनाच्या म्हणण्यानुसार नसल्याने त्यांना त्यांच्या घटनादत्त अधिकारापासून वंचित ठेवण्याचे काम या विधेयकाच्या माध्यमातून शासन करीत आहे, असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही. मी मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न करणार आहे की, हे विधेयक घटनेच्या विरोधात आणलेले असल्याने ते आपल्याला पास करुन घेता येणार नाही. म्हणून सन्माननीय सदस्यांनी 35 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे हे विधेयक पाठविण्यासंबंधीचा जी सूचना केली आहे त्या सूचनेला मी पाठिंबा देत आहे.

महोदय, या विधेयकात असेही म्हटले आहे की, ज्यांच्याकडे शौचालये आहेत ते त्याचा वापर करतात की नाही, नसतील तर त्यांना संधी मिळणार नाही. ही अट, उमेदवारी अर्जांची छाननी करीत असताना नको असलेले पॅनल्स उडविण्यासाठी घातली असावी असा मला संशय येतो. जर ते वापरत असतील त्यांच्या बाबतीत हा आक्षेप घेतला जाणार नाही असेही यामध्ये म्हटले आहे. परंतु हे कोण ठरविणार आहे याचा मात्र खुलासा केलेला नाही. वास्तविक गरीब व्यक्ती जेव्हा शौचालय बांधणार तेव्हा ती वापरात आणणारच, अन्यथा बांधणारच नाही. अशी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ D/ MMP/

श्री. भगवान साळुंखे .....

परिस्थिती असताना ही अट घालण्याची काय गरज होती हे मला समजत नाही. हा खरे तर सामाजिक प्रबोधनाचा विषय आहे म्हणून ही वस्तुस्थिती शासनाच्या लक्षात आणून देण्याचा मी प्रयत्न करीत आहे. अशा तिन्ही बाबी उत्तर देतांना लक्षात घ्याव्यात, केवळ घाईघाईने हे महत्वाचे विधेयक पारित करु नये तर हे विधेयक संयुक्त समितीकडे परत पाठवावे अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करतो.

....3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राम पंडागळे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2010 चे विधानसभा विधेयक क्रमांक-88 हे विधेयक शासनाने सभागृहात मान्यतेसाठी आणलेले असून अत्यंत योग्य असे विधेयक आहे, असेच मी म्हणेन. त्याचबरोबर प्रत्येक गावात, प्रत्येक घरात प्रस्थापितांपासून अगदी दारिद्र्यरेषेखाली असलेल्या कुटुंबांच्या घरांमध्ये सुध्दा शौचालय असावे अशी जी शासनाच्या मनात धारणा आहे ती देखील मला अतिशय योग्य वाटते. पण या निमित्ताने मी शासनाला अशी विनंती करणार आहे की, शासनाला शक्य नसेल तर शासनाने आपल्या प्रतिनिधींना अशा वाड्या व खेडे गावांमध्ये पाठवावे व जाणून घ्यावे की, या योजनेमुळे जिल्ह्या-जिल्ह्यात किती हानी होणार आहे. राज्यातील दलित, मागासवर्गीय तसेच आदिवासी पाड्या व वस्त्यांवरील लोकांची किती हानी होणार आहे याची जाणीव शासनाने करुन घेतली पाहिजे. कारण या विधेयकामुळे आदिवासी तसेच दलितांची फार मोठी कुचंबना होणार आहे. सन्माननीय सदस्या ॲड. उषाताई दराडेताई आपण डोंगराळ भागाचे प्रतिनिधीत्व करीत आहात तसेच आपण वाड्या वस्त्यांवर देखील फिरुन लोकांच्या समस्या जाणून घेत असतात. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे पोटाची खळगी भरण्याची भ्रांत असलेल्या लोकांनी शौचालये कोठून बांधावीत हा महत्वाचा प्रश्न असल्यानेच त्यांची कुचंबणा होणार आहे.

महोदय, मुंबई-नागपूर सारख्या अवाढव्य शहरांमध्ये ज्या झोपड्या आहेत त्यात देखील दलित आणि गरीब लोकच राहतात.....

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राम पंडागळे....

सभापती महोदय, मुंबई, ठाणे रेल्वे लाईनच्या कडेला सकाळी जे दृश्य दिसते ते दृश्य इतर मोठ मोठया शहरात सुध्दा आपल्याला पहावयास मिळते. मोठ मोठया झोपडपट्टयांमध्ये शौचालयाची सोय नसते तर मग वाडया-वस्त्यांमध्ये शौचालयाची सोय कोठून असणार आहे ? आपली कल्पना चांगली आहे त्यामुळे तुम्ही दलित, आदिवासींना घरे बांधून द्या. तुमच्या बिलामुळे आमची कुचंबणा होणार नाही, घटनेची अवहेलना होणार नाही, दलित-आदिवासी बांधव बाधित होणार या सर्वांची दक्षता घेतल्यानंतरच सुधारणा करुन हे विधेयक आणावे अशी मी आपल्याला विनंती करतो.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील (ग्रामविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, हे अत्यंत महत्वाचे विधेयक आहे. दोन वेळेस हे विधेयक कॅबिनेट पुढे गेले होते. अनेक सन्माननीय सदस्यांनी या विधेयकावर आपले विचार मांडलेले आहेत. या विधेयकाच्या संदर्भात श्री. केशवराव मानकर, श्रीमती शोभा फडणवीस, डॉ.नीलम गो-हे, श्री. भगवान साळुंखे , श्री. रामदास कदम, श्री. राम पंडागळे यांनी या विधेयकांच्या संदर्भात आपले बहुमोल विचार मांडले आहेत.

महाराष्ट्र राज्यात 27 हजार ग्रामपंचायती आहेत. महाराष्ट्रातील सर्व खेडी आपल्याला सुजलाम सुफलाम करावयाच्या असतील तर आरोग्याच्या दृष्टीने ती आपल्याला प्रथम सक्षम करावी लागतील. म्हणून केद्रशासनाच्या माध्यमातून संपूर्ण राज्यामध्ये निर्मल ग्राम योजना राबवली जात आहे. राज्यात जवळ जवळ 8388 ग्रामपंचायती निर्मल ग्राम पंचायती झालेल्या आहेत. आरोग्याच्या दृष्टीने निर्मल ग्राम योजना अत्यंत महत्वाची आहे. एका बाजूला निर्मल ग्राम योजना करीत असतांना ग्रामपंचायतीने आपापल्या स्तरावर ही योजना करावयाची असते. ही योजना राबविण्यासाठी शिक्षकांची किंवा अंगणवाडी सेविकांची सेवा घेण्याविषयी किंवा अंगणवाडयांची सेवा घेण्याचे शासनाचे निर्देश नाही. अशा प्रकारच्या कोणत्याही लेखी सूचना शासनाच्या नाहीत. स्थानिक ग्रामपंचायत आपापल्या परीने नियोजन करीत असते. निर्मल ग्राम योजना ग्रामपंचायतीने आपल्या स्तरावर राबवावी अशा सूचना निश्चितपणे आहेत. अनेक गावे 100 टक्के निर्मल ग्राम झाल्याचे आपण पाहिलेले आहे. ज्यावेळेस लोकप्रतिनिधी गावाचा, तालुक्याचा किंवा जिल्हा परिषदेत कारभार करतो त्याच लोकप्रतिनिधीच्या घरात शौचालय नसेल तर विपरीत परिस्थिती निर्माण होईल. घरात शौचालये असले पाहिजे, सार्वजनिक शौचालयाचा वापर झाला पाहिजे असे सांगत असतांना जे लोकप्रतिनिधी आहेत त्यांच्यावर अशाप्रकारचे निर्बंध घातले नव्हते त्यामुळे अशा प्रकारचे निर्बंध घालण्याचा आपण प्रयत्न केलेला आहे. दारिद्रय रेषेखालील व्यक्तींना, मागासवर्गीय व्यक्तींना जिल्हा परिषदेच्या माध्यमातून शौचालये उपलब्ध करुन दिली जातात. या प्रक्रियेमध्ये आमदार म्हणून मी सुध्दा काम केलेले आहे. माझ्या तालुक्यात 100 टक्के निर्मल ग्राम योजना राबवलेली आहे. यामध्ये काय अडचणी येतात त्या मी माझ्या डोळयांनी पाहिलेल्या आहेत. एका महिलेबरोबर 10X10 च्या घरात शौचालय बांधण्याच्या संदर्भात मी वाद घातला त्यावेळेस त्या महिलेने घरात शौच खड्डा खोदला व मला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील .....

सांगितले की, "तुम्हीच या उद्घाटन करायला." आमदार म्हणून अशा प्रसंगामधून मी गेलेलो आहे. ज्या गावांमध्ये निर्मल ग्राम योजना राबवली आहे, ज्या गावांमध्ये चांगल्या प्रकारे योजनेची अंमलबजावणी झालेली आहे तेथील प्राथमिक आरोग्य केंद्राचा अहवाल बघितला तर ज्या गावांनी ही योजना राबवली नाही त्या गावांपेक्षा या गावातील 50 टक्क्याने आजार कमी झाल्याचे दिसून आलेले आहे.

....4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, ज्या पध्दतीने माननीय मंत्रीमहोदय शौचालयाच्या संदर्भात जे काही सांगत आहेत ते दलित-आदिवासी बांधवांच्या प्रश्नांना बगल देऊन पुढे जात आहे. हा फंडामेंटल राईटस्चा प्रश्न आहे.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पंडागळे...

परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या घटनेनुसार आम्हाला मूलभूत अधिकार मिळाले आहेत. त्या अधिकारांची पायमल्ली करण्याचा प्रयत्न होत आहे. ग्रामपंचायतीमध्ये आणि जिल्हापरिषदेमध्ये दलित, आदिवासी व मागासवर्गीय व्यक्ती जाऊ नयेत असा प्रयत्न होत आहे. दलित, आदिवासी व मागासवर्गीयांच्या घरातील शौचालये शासनाने बांधून दिली आहेत काय याची खात्री केल्यानंतरच हे विधेयक आणावे असा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री.सतेज पाटील : सभापती महोदय, याठिक्राणी कोणत्याही वर्गाला वंचित ठेवण्याचा प्रश्न येत नाही. स्वत:च्या घरात शौचालय असेल पाहिजे. भाड्याच्या घरात कोणी राहत असेल तर ते तेथील शौचालय ग्राहय धरण्यात येईल. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी उपस्थित केलेल्या मुद्याबाबत सांगू इच्छितो की, एखाद्या ग्रामसभेने एखाद्या सदस्याविरुध्द असत्य ठराव दिला तर त्याला जिल्हाधिकाऱ्यांकडे अपील करता येईल. तेव्हा कोणी सूड बुध्दीने वागून याठिकाणी कायद्याचा उपयोग करुन सदस्यांचे सदस्यत्व घालविण्याचा प्रश्न उद्भवणार नाही.

सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी येथे काही मुद्दे मांडले. राष्ट्रीय पेय जल योजना, महाजल योजना आणि इतर योजना गावागावांमध्ये सुरु आहेत. तो आजच्या चर्चेच्या विषय नसला तरी निर्मल ग्राम योजने अंतर्गत जी गावे 100 टक्के यशस्वी होतील त्या गावांना पाणी पुरवठा करण्या संदर्भातील निदेश देण्यात येतील.

आपला महाराष्ट्र पुरोगामी विचारांचा आहे. आपला लोकप्रतिनिधी कसा वागतो याचे उदाहरण सर्वसामान्य जनतेपुढे जाणे आवश्यक आहे. हे विधेयक महत्वाचे आहे. तेव्हा माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, आपण हे विधेयक मंजूर करावे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, सत्तेपुढे शहाणपण नसते हे मला माहीत आहे. मी याठिकाणी नम्रपणे सांगू इच्छितो की, मी या विधेयकाच्या अनुषंगाने दोन-तीन मुद्दे उपस्थित केले होते. राज्यातील किती वाड्यांपर्यंत पाणी पाहोचले याची माहिती माननीय मंत्रीमहोदय देऊ शकणार नाहीत. आपण अशाप्रकारचे विधेयक आणल्यामुळे घटनेचा अवमान होऊ शकतो. दुसरे म्हणजे शासन शौचालय बांधण्यासाठी किती पैसे देते ? माझी मंत्रीमहोदयांनी विनंती आहे की,

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.....

आपण या विधेयकातून दारिद्र्य रेषेखालील लोकांना वगळावे. मग ती व्यक्ती आदिवासी असो, दलित असो वा अन्य कोणत्याही घटकातील असो. आपण याठिकाणी पुरोगामी महाराष्ट्राच्या गप्पा मारता. शाहू-फुले-आंबेडकर यांचे नाव घेता परंतु त्यांच्या विचारांची अंमलबजावणी करीत नाही. मला वेड लागले म्हणून मी बोलत नाही. गेली 20 वर्षे मी आमदार म्हणून काम करीत आहेत. या सरकारने रोहयोचे 20 हजार कोटी रुपये घेतले. गावातील आरोग्य चांगले राहिले पाहिजे यामध्ये दुमत असण्याचे कारण नाही. माझी मागणी आहे की,आपण यातून दारिद्र्य रेषेखालील लोकांना वगळावे. आपण प्रत्येकाला आर्थिकदृष्टया सक्षम केले तर तो घरी शौचालय बांधू शकतो. रस्त्यावर शौच करायची कोणाला हौस नाही. तेव्हा माझ्या मागणीचा माननीय मंत्रीमहोदयांनी विचार करावा अशी विनंती करतो.

यानंतर श्री.गायकवाड..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ D/ KGS/ MMP/ KTG/ प्रथम श्री.शिगम 13.55

श्री.राम पंडागळे : दलित समाजावर अन्याय होता कामा नये. या विधेयकामुळे दलित समाजावर मोठा अन्याय होणार आहे. हक्का पासून हे लोक वंचित राहणार आहेत. त्यांच्या फंडामेंटल राईटचा हा प्रश्न आहे.त्यामुळे या विधेयकात सुधारणा करुन नंतर हे विधेयक सभागृहासमोर आणावे. अशी माझी आपल्याला हात जोडून विनंती आहे.

(सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन बसतात)

ग्रामपंचायती आणि पंचायत समितीमध्ये जाण्यास त्यांच्यावर बंधने येणार आहेत तेव्हा या विधेयकात सुधारणा करुन नंतर विधेयक आणावे अशी मी पुन्हा एकदा विनंती करीत आहे.

श्री.राधाकृष्ण विखे पाटील :सन्माननीय सदस्यांनी जागेवर जाऊन बसावे अशी मी त्यांना विनंती करतो.

श्री.सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री रामदास कदम यांनी जो मुददा मांडलेला आहे त्या बाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की, या विधेयकामध्ये अशी तरतूद करण्यात आलेली आहे की, गावागावात बांधण्यात आलेल्या सार्वजनिक शौचालये जर वापरत असतील व त्यासबंधीचा दाखला देण्यात आला तर तो सुध्दा चालू शकणार आहे.त्याचबरोबर सन्माननीय सदस्य श्री राम पंडागळे यांनी सांगितल्याप्रमाणे कोणावरही अन्याय करण्याचा शासनाचा उद्देश नाही. निर्मलग्राम करण्याचा आपला प्रयत्न सुरु आहे त्यामुळे शौचालये बांधण्यास सर्वाना प्रवृत्त करीत आहोत अशा वेळी गावचे प्रतिनिधित्व करणारे जे आहेत....

श्री.रामदास कदम :आपला उद्देश चांगला आहे .परंतु ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हापरिषदेमध्ये या लोकांना जाण्याचे दरवाजे बंद होता कामा नये याची खबरदारी घेतली पाहिजे. ग्रामपंचायतीचा सरपंच हा खोत असतो त्याची जी वाडी असते त्या ठिकाणी शौचालये असतात आपण वाडीमध्ये जाऊन पहा. बौध्द आणि आदिवासी ज्या वाडीत राहतात तेथे नसतात. खोताची वाडी गावातील मधल्या भागात असते तेथेच शौचालये असतात .आपण ज्याप्रमाणे ग्रामीण भागातून आलेला आहात त्याप्रमाणें मी सुध्दा ग्रामीण भागातच लहानाचा मोठा झालो आहे. सार्वजनिक शौचालय जर दोन किलो मीटर अंतरावर असेल तर त्याचा वापर करण्यासाठी हे लोक त्या ठिकाणी येतील काय ?मागासवर्गीय, दलित, आदिवासी आणि दारिद्रय रेषेखालील व्यक्तींना वगळण्यात येईल अशी सुधारणा करुन हे विधेयक आणावे अशी माझी विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतेज उर्फ बंटी डी. पाटील : शौचालये बांधण्यात आली पाहिजेत अशी सर्वांची इच्छा आहे. इको व्हीलेज आपण करीत आहोत आणि त्या माध्यमातूनही शौचालये व्हावीत अशीच अपेक्षा आहे नुकत्याच ग्रामपंचायतीच्या निवडणुका होऊन 1 लाख 32 हजार सदस्य निवडून आलेले आहेत त्यामुळे आता एक वर्षा नंतर पुन्हा निवडणुका होणार आहेत. त्यामुळे ग्रामपंचायती ,जिल्हा परिषदा आणि पंचायत सामित्याच्या निवडणुका होण्यास अजून एक वर्षाची मुदत आहे. ज्यांची ग्रामपंचायतीमध्ये जाण्याची प्रामाणिक इच्छा आहे त्याने शौचालय बांधले पाहिजे अशी अट मान्य करावी अशी माझी आग्रहाची विनंती आहे .ज्यांना प्रतिनिधित्व दिलेले आहे त्यांचे प्रतिनिधित्व काढून घेण्यात येणार नाही किंवा त्याच्या हक्कावर गदा आणण्याचा प्रश्न येत नाही पंरतु लोकप्रतिनिधी म्हणून काम करण्याची एखाद्याची इच्छा असेल तर किमान ही पथ्ये असावीत अशी माझी धारणा असून या विधेयकाला मान्यता द्यावी अशी माझी विनंती आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

. **तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश:विचारात घेण्यात येईल.

खंड 2 व 3 , विधेयकाचे भाग झाले

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतूवाक्य विधेयकाचे भाग झाले

श्री. रामदास कदम :सभापती महोदय, मी पोल मागतो.

(गोंधळ)

आपण नियमबाहय काम करीत आहात . मागासवर्गीयावर अन्याय करता कामा नये.

(सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे वेलमध्ये येऊन विधेयकाच्या प्रती फाडतात)

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत/ प्रसिद्धीसाठी नाही

(गोंधळ)

(विरोधी पक्षाचे माननीय सदस्य "वेल" मध्ये उभे राहून घोषणा देतात.)

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि.स.वि. क्रमांक 88 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

(गोंधळ)

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : सन 2010 चे वि.स.वि. क्रमांक 88 संमत झाले आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या विधेयकावर आम्ही पोल मागितल्यानंतर आपण आम्हाला पोल द्यावयास पाहिजे होता. अशापध्दतीने बहुमताच्या जोरावर कायदा मंजूर करणे योग्य नाही. हा आमच्यावर अन्याय आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या घटनेनुसार ग्रामीण भागातील गरीब, दलित, आदिवासी माणसांच्या मूलभूत हक्कांचे रक्षण करण्याऐवजी त्यांच्यावर या विधेयकामुळे अन्याय होणार आहे. त्यामुळे आपण पाशवी बहुमताच्या जोरावर हे विधेयक संमत केले आहे त्याचा आम्ही निषेध करतो आणि सभात्याग करतो.

(विरोधी पक्षाचे माननीय सदस्य बर्हिगमन करतात.)

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विशेष उल्लेखाच्या सूचनांसंबंधी

तालिका सभापती : कालचे राहिलेले विशेष उल्लेख आता घेण्यात येतील. माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत, माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे, ॲड. उषा दराडे...

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, ही पध्दत बरोबर नाही....

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विशेष उल्लेख

पृ. शी. : राज्यातील अंगणवाडयांना शासनाची इमारत नसणे

मु. शी. : राज्यातील अंगणवाडयांना शासनाची इमारत नसणे याबाबत ॲड. उषा दराडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : मा□□य सदस्या डॉ. उषा दराडे यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

ॲड. उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडते.

"राज्यातील 34 जिल्हयांमध्ये 97 हजार 462 अंगणवाडी केंद्रे शहरी व ग्रामीण भागात असून त्यामधील 58 हजार 779 अंगणवाडी केंद्रांना शासनाच्या इमारती नसल्याने सदर अंगणवाडया जिल्हा परिषद शाळांचे वऱ्हांडे, समाज मंदिर भाडयाच्या इमारतीत तर काही ठिकाणी उघडयावर भरतात, परिणामी केंद्र शासनाने विशेष कार्यक्रम आखून बालकांना औपचारिक शिक्षण मिळण्याचा हेतू साध्य होण्यास येत असलेला अडसर, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया".

अशुद्धीत प्रत / मुद्रणेसाठी नाही

पृ. शी. : शासकीय निम-शासकीय कार्यालयामधील अनुसूचित जातीच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांची रिक्त असलेली पदे

मु. शी. : शासकीय निम-शासकीय कार्यालयामधील अनुसूचित जातीच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांची रिक्त असलेली पदे याबाबत श्री.सुभाष चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : मा□□□य सदस्य श्री. सुभाष चव्हाण या□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ा दिली आहे. त्या□ ती मांडावी.

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ा मांडतो.

"राज्यात अनेक शासकीय-निमशासकीय कार्यालये, महानगरपालिका, शासनाची संचालनालये, विद्यापीठे इत्यादींमध्ये अनुसूचित जातींच्या उमेदवारांची गट "अ" ते "ड" मधील अधिकारी व कर्मचाऱ्यांची रिक्त असलेली पदे, या प्रवर्गातील अधिकाऱ्यांना कार्यकारी स्वरुपाची पदे न देता, दुय्यम दर्जाच्या पदावर नियुक्ती केली जाते. अथवा त्यांना पदोन्नती न देता सदर पदे रिकामी ठेवली जातात. विहित कालावधीत विभागीय पदोन्नती समितीच्या बैठका न घेता सदर बैठका घेण्यास वारंवार टाळाटाळ केली जाते. पदोन्नती देतांना, गोपनीय शेरे विचारात न घेता खोटया तक्रारीच्या आधारे त्यांना पदोन्नतीपासून वंचित ठेवले जाते.

याबाबत शासनाकडून सापत्न वागणुकीमुळे परिणामी मागासवर्गीय अधिकाऱ्यांमध्ये असंतोष पसरलेला आहे. शासनाला मागासवर्गीय संघटनांकडून निवेदने देऊन पाठपुरावा करुन आजतागायत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. तरी संबंधित विभागाने योग्य ती कार्यवाही करावी."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

हरकतीच्या मुद्दयासंबंधी

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या सभागृहामध्ये अत्यंत चुकीच्या पध्दतीने कामकाज सुरु आहे, नियमबाह्य पध्दतीने सुरु आहे. सभापती महोदय, आपण तालिका सभापती असल्यामुळे वास्तविक या सभागृहामध्ये बसलेल्या अधिकाऱ्यांनी आपल्याला मार्गदर्शन करणे आवश्यक होते. परंतु त्यांच्याकडून मार्गदर्शन न करता सभागृहाचे कामकाज रेटून नेले आहे आणि ते नियमबाह्य झाले आहे. आमचा पोल मागण्याचा अधिकार आहे, आपणाकडे मेजॉरिटी आहे. माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब नेहमी सांगत असतात की, तुम्ही पाशवी बहुमताच्या जोरावर पाहिजे ते करु शकता. तर मग आम्ही पोलची मागणी केली असतांना तुम्ही कां घाबरता? सभापती महोदय, गरीब माणसासाठी, दलित माणसासाठी, समाजातल्या शेवटच्या वर्गासाठी हे विधेयक होते. त्याला त्याच्या हक्कापासून आपण वंचित ठेवीत आहात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या घटनेचा आपण उपमर्द करीत आहात. अशाप्रकारे सभागृहामध्ये जे काही कामकाज चालू आहे ते योग्य नाही, ते वैधानिक संस्कृतीला धरुन नाही. आम्ही या ठिकाणी दु:ख व्यक्त करावे, संताप व्यक्त करावा की, वेदना व्यक्त कराव्यात हे आम्हाला समजत नाही. आम्हाला या सभागृहामध्ये पोल मागण्याचा अधिकार नसेल तर या सभागृहात सकाळपासून संध्याकाळपर्यंत कशासाठी बसायचे? तुम्ही सर्व विधेयके एकतर्फी मंजूर करुन घ्या. म्हणून मी या प्रकाराचा निषेध व्यक्त करतो.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सभापती महोदय, याच सभागृहात हिवाळी अधिवेशनात त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री. जोगेंद्र कवाडे यांनी दलितांवर होणाऱ्या अन्यायाच्यासंदर्भात राजीनामा दिला होता. आपण त्यावेळी या सभागृहात नव्हतात. ते अनुसूचित जातीच्या प्रश्नासाठी, दलितांच्या अधिकारासाठी लढणारे सदस्य होते. बरोबर, चूक याबाबतीत मतभिन्नता असू शकते. पण सन्माननीय सदस्य या ठिकाणी वस्तुस्थिती मांडीत आहेत. वस्तुस्थिती मांडत असताना राजकीय पक्षाचा प्रश्न उद्भवत नाही. विधेयक फेटाळण्यात यावे असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे नव्हते. त्यांचे म्हणणे एवढेच होते की, अमुक अशी परिस्थिती आहे तिचा विचार करण्यात यावा. अशा वेळेला सहानुभूतीने सन्माननीय मंत्री महोदयांनी विचार करणे दूरच राहिले. पण एखादा मनुष्य जातीने अल्पमतात आहे म्हणून पाशवी बहुमताने काम रेटून नेण्यात येत असेल तर सभागृहाच्या बाहेर दलितांचा जो आक्रोश आहे त्याला शासन गप्प बसवू शकणार नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, विधिमंडळाचे कामकाज करण्याच्या बाबतीत आपण काही नियम घालून दिलेले आहेत. हे कायदेमंडळ आहे. एकदा कायदा झाला की, तो सर्व राज्याला लागू होतो. या देशामध्ये लोकशाही आहे. लोकशाहीमध्ये प्रत्येक माणसाला मतदान करण्याचा अधिकार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला आहे. निवडणुकीला उभे रहाण्याचा अधिकार दिलेला आहे. सभापती महोदय, असे असताना निवडणुकीसाठी उभे रहात असताना काही अटी घालून त्याला निवडणुकीपासून वंचित ठेवण्याचा हा एक प्रकार आहे. निर्मल ग्रामयोजनेच्या नावाखाली समाजातील आदिवासी, मागासवर्गीय, दलित आणि ओबीसी यांच्या संदर्भात सर्व्हे झाला त्या नुसार जवळपास 40 टक्के जनता विना शौचालय जगत आहे. अशा अवस्थेमध्ये 40 टक्के जनतेला हे विधेयक आणून ग्रामपंचायतीच्या निवडणुकीपासून वंचित ठेवण्यात येत आहे. यासंदर्भात अशा प्रकारची मागणी करण्यात आली होती की, दलित, आदिवासी, मागासवर्गीय या लोकांसाठी ही सवलत देण्यात यावी. या लोकांच्या घरी शौचालय नसले तरी चालेल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी आपली मते व्यक्त केल्यानंतर या विधेयकाच्या बाबतीत पोल मागण्यात आला. पाशवी बहुमत असतांना शासनाला घाबरण्याचे काही

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

कारण नाही. सभापती महोदय, नियमानुसार पोल देऊन हे विधेयक मंजूर झाले असते तर विरोधी पक्षाचा विरोध नोंदवला गेला असता आणि बहुमताच्या जोरावर शासनाने हे विधेयक मंजूर केले असा मेसेज गेला असता. परंतु अशा पध्दतीने जर या सभागृहात विधेयके पारित केली जात असतील तर आमच्या या सभागृहात बसण्याला काही अर्थ रहात नाही. सभापती महोदय, विरोधी पक्षाने आपली मते व्यक्त कारावीत आणि शासनाने विनामतदान विधेयक रेटून न्यावे ही निषेधार्ह बाब आहे. सभापती महोदय, विधेयकाच्या चर्चेच्या वेळी आम्ही सभागृहात बसावयाचे की नाही याचा विचार आम्हाला करावा लागेल. विधेयके पारित करणे हा महत्वाचा विषय आहे. या ठिकाणी सर्वसामान्य माणसाला लागू होणारा कायदा बनतो. त्या कायद्याच्या बाबतीत आम्ही आपले मत मांडल्यानंतर मतदान मागितल्या नंतर नियमाने मतदान झाले पाहिजे पण मतदान न होताच विधेयक रेटून नेण्याचा प्रकार या ठिकाणी होत आहे. त्यामुळे भविष्यामध्ये विधेयकावरील चर्चेच्या वेळी या सभागृहात बसावयाचे काय याचा विचार विरोधी पक्षाला करावा लागेल. सभापती महोदय, जे घडले ते योग्य घडलेले नाही. मागच्या आठवडयामध्ये असाच प्रकार झाला होता. म्हणून या सभागृहात ज्या पध्दतीने कामकाज चाललेले आहे ते योग्य नाही. आम्ही याचा निषेध व्यक्त करतो. हे दुरुस्त झाले पाहिजे अशा प्रकारची अपेक्षा करतो.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, या विधेयकावर मी भाषण केलेले आहे म्हणून माझा हरकतीचा मुद्दा आहे आणि या हरकतीच्या मुद्यासंबंधीचा निर्णय आपल्याकडून मिळेल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, विधिमंडळ ज्याला आपण कायदेमंडळ म्हणतो. ताक घुसळल्यानंतर जसे लोणी बाहेर पडते तशा पध्दतीने दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी चर्चा केल्यानंतर कायदा निर्माण होतो. पण अशा पध्दतीने कायदा होतो हे मी आज पहिल्यांदाच या सभागृहात बघितले आहे. मी गेल्या 20 वर्षापासून विधानसभेमध्ये होतो.

यानंतर श्री. बरवड.....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. रामदास कदम ....

अशा प्रकारे कायदा पास होऊ शकतो हे मी गेल्या 20 वर्षामध्ये आज पहिल्यांदा पाहिले. सभापती महोदय, आपण न्यायाधीश आहात. ही खुर्ची कोणत्याही पक्षाची नाही. आमचे संरक्षण करणे हे जेवढे शासनाचे काम आहे तेवढेच आपलेही काम आहे. आमच्या हक्कावर कोणतीही गदा येणार नाही हे पाहण्याचे आपलेही काम आहे. त्यासाठी ती खुर्ची ठेवलेली आहे. त्या ठिकाणी वर जे लिहिले आहे ते तेवढ्यासाठीच लिहिले आहे. पोल मागणे हा आमचा विरोधी पक्षाचा अधिकार आहे. तोही अधिकार आपल्याकडून आम्हाला मिळत नाही. मग या सभागृहाला आपण कायदेमंडळ कशासाठी म्हणतो ? कायदा कसा होणार ? मग विरोधी पक्ष कशाला पाहिजे ? चर्चा कशाला पाहिजे ? असे असेल तर मग तुम्ही बसावयाचे, त्यांनी बिल मांडावयाचे, मंजूर करुन टाकावयाचे निघून जावयाचे. मी पहिल्यांदाच असे झालेले पाहात आहे. काल एका सन्माननीय सदस्याने सांगितले की, मी आमदार आहे. ते आता आमदार झाले. आम्हाला 20 वर्षाचा अनुभव आहे. परंतु आम्ही असे कधी पाहिले नाही. माझी आपल्याला विनंती आहे की, हे बिल पुन्हा आले पाहिजे. नाही तर मी आपल्याला सांगतो की, महाराष्ट्रामध्ये दलित, बौध्द, आदिवासी यांच्यामध्ये प्रचंड असंतोष निर्माण होईल. लोक रस्त्यावर येतील. सर्वसामान्य गरीब माणसाला निवडणुकीपासून वंचित ठेवण्याचा अधिकार तुम्हाला कोणी दिला ? डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटना लिहिली नसती तर आपण त्या खुर्चीमध्ये बसला नसता आणि मी या ठिकाणी आलो नसतो. घटनेचा अवमान करण्याचे काम तुमचेही नाही आणि माझेही नाही.

सभापती महोदय, मी साधा प्रश्न विचारला की, प्रत्येक गावामध्ये आपण नळयोजना दिल्या काय ? प्रत्येक गावामध्ये घरात शौचालय असल्यानंतर त्या ठिकाणी आम्ही वापरण्यासाठी पाणी दिले आहे असे आपण सांगावे. मी स्पष्टपणे बोललो होतो यातून आपण दलित, बौध्द, आदिवासी, दारिद्र्य रेषेखालील माणसे यांना वगळावे. यामध्ये काय अडचण होती ? माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, आम्हाला पोल का मिळाला नाही ? अनेक वेळा आम्ही पाहतो की, ज्यावेळी अशी बाब येते त्यावेळी सचिव खालून सन्माननीय सभापतींना मार्गदर्शन करीत असतात. पण यावेळी उपस्थित असलेले अधिकारी श्री. भाऊसाहेब कांबळे, त्यांचे आडनाव कांबळे आहे, ते आपल्याला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम .....

काही तरी चिठ्ठी लिहून देतील असे आम्हाला वाटले होते. पण त्यांनी तसे काही केले नाही. नको त्या वेळेला येऊन पटकन आपल्याकडे येऊन मार्गदर्शन करतात. परंतु ज्या समाजामध्ये आपण वाढलो, मोठे झालो, बाबासाहेबांच्या आशीर्वादाने इथपर्यंत येऊन बसलो त्या समाजासाठी काही करण्याचे आपले काम नाही काय ? सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे की, आजचे जे नियमबाह्य काम झालेले आहे ते आपण दुरुस्त करुन घ्यावे. म्हातारी मेल्याचे दु:ख नाही पण काळ सोकावता कामा नये. ही प्रथा चालू झाली तर माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी सांगितल्याप्रमाणे ज्यावेळी एखादे बिल येईल त्यावेळी आम्ही बाहेर थांबू. विरोधकांची आवश्यकता नसेल तर तुम्हीच बिल पास करुन घ्या. म्हणून माझा जो हरकतीचा मुद्दा आहे त्याबाबत आपल्याकडून रुलींग मिळावे अशी माझी आपल्याकडून अपेक्षा आहे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, या ठिकाणी...

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, मी जो हरकतीचा मुद्दा उपस्थित केलेला आहे त्याबाबत आपल्याकडून निर्णय पाहिजे. ज्यावेळी हे बिल मंजूर करण्यात आले त्यावेळी माननीय मंत्री महोदय श्री. भास्कर जाधव या सभागृहामध्ये उपस्थित नव्हते.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, त्यावेळी मी सभागृहात नव्हतो हे मी मान्य करतो. या बिलाच्या संदर्भात आधी सभागृहात जे काही घडले त्यावेळी मी सभागृहात उपस्थित नव्हतो ही वस्तुस्थिती आहे. परंतु मी सभागृहात आल्यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत, डॉ. नीलम गोऱ्हे, श्री. रामदास कदम तसेच माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी जे विचार मांडले त्यातून काय घडले असेल हे आपल्याला कळते. याबाबतीत सन्माननीय सदस्यांच्या भावना निश्चितपणे दुखावलेल्या दिसतात. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले की, आता घडले आहे पण पुढच्या काळात यासंदर्भात काळजी घ्यावी. सरकारने निश्चितपणे ती काळजी घेतली पाहिजे. आम्ही ती काळजी निश्चितपणे घेऊ.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, भविष्यामध्ये अशी काळजी घ्यावी असे माननीय विरोधी पक्ष नेते म्हणाले नाहीत. माननीय मंत्रिमहोदयांनी त्यांच्या तोंडी हे शब्द घालू नये.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य पोल वगैरे म्हणतात पण आपण या ठिकाणी साधारणपणे युनॅनिमसली काम करीत असतो. एकमेकांच्या समजदारीने, अंडरस्टँडींगने एकमेकांना समजून घेऊन हसतखेळत काम करीत असतो. कधी कधी लोकशाहीमध्ये त्यांनी मागणी करावयाची असते आणि आम्ही त्यांना विनंती करावयाची असते आणि एकमेकांना समजून घ्यावयाचे असते. आतापर्यंत जसे आपण या सभागृहामध्ये एकमेकांना समजून घेतले तसे समजून घेऊ या. आपण पुढचे कामकाज सुरु करावे अशी मी विनंती करतो.

डॉ. दीपक सावंत : हरकतीच्या मुद्याबाबत माननीय सभापतींना निर्णय देण्याचा अधिकार नाही काय ? सभापती महोदय, आपण याबाबत निर्णय दिला पाहिजे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : या बिलामुळे मागासवर्गीय, आदिवासी माणसे ग्रामपंचायतीची निवडणूक लढवू शकणार नाहीत, त्यामुळे महाराष्ट्रामध्ये असंतोष निर्माण होईल, ही साधी बाब नाही. ही बाब रामदास कदम किंवा भास्कर जाधव यांची नाही. या बिलामुळे शेवटच्या माणसाचे दरवाजे कायमचे बंद होणार आहेत आणि ते पाप विधिमंडळाकडून होणार आहे. हे आमचे दु:ख आहे. म्हणून आपण आमच्या हरकतीचा मुद्यासंबंधी निर्णय द्यावा अशी माझी मागणी आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आपण माझ्या हरकतीच्या मुद्याबाबत निर्णय द्यावा.

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना मी सांगू इच्छितो की, सभागृहासमोर जे कामकाज सुरु आहे ते पूर्ण होऊ द्यावे.

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात.)

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, आपण कामकाज सुरु ठेवावे. सन्माननीय सदस्यांची माननीय सभापतींनी आताच निर्णय द्यावा ही मागणी बरोबर नाही. हा माननीय सभापतींचा अधिकार आहे. सन्माननीय सदस्यांनी मागणी केली आहे, त्यावर निर्णय केव्हा द्यायचा हा माननीय सभापतींचा अधिकार आहे. सभापती महोदय, याबाबतचा निर्णय देण्यासाठी आपण विचारविनिमय करावा. त्यामुळे कामकाजपत्रिकेवरील कामकाज आपण चालू ठेवले पाहिजे.

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात.)

श्री.पांडुरंग फुंडकर : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित केला. त्या हरकतीच्या मुद्याला मी पाठिंबा दिला. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित केला आहे. आमचे म्हणणे असे आहे की, या सभागृहात एखादे विधेयक मांडल्यानंतर विरोधी पक्षाने जर मतदानाची मागणी केली तर नियमाप्रमाणे आपल्याला मतदान घ्यावे लागते की नाही या प्रश्नाचे आम्हाला उत्तर पाहिजे.

दुसरा मुद्दा असा आहे की, सभागृहात मांडण्यात आलेल्या हरकतीच्या मुद्याला सभापतींनी त्वरित निर्णय दिला पाहिजे. हरकतीचा मुद्दा आता उपस्थित करावयाचा आणि त्याबाबत दोन दिवसांनी निर्णय द्यावयाचा असे होत नाही. त्यामुळे आपण निर्णय दिला पाहिजे. आम्ही वेळेववर मतदान मागितले आहे हे मान्य केले पाहिजे. त्यामुळे मतदान घेणे आवश्यक आहे. नियमाप्रमाणे

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

श्री.पांडुरंग फुंडकर.....

जर मतदान मागितले असेल तर ते दिले पाहिजे. आम्ही योग्य वेळी मतदान मागितलेले आहे. सन्माननीय मंत्री श्री.भास्कर जाधव हे यापूर्वी सभागृहात उपस्थित नव्हते. आम्ही योग्य वेळी पोलची मागणी केलेली आहे.

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, सभागृहासमोर मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, 1958 आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, 1961 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता वि.स.वि.क्रमांक 88 मांडण्यात आलेले आहे. हे विधेयक चांगले आहे. परंतु त्यातील काही तरतुदींना आम्ही सगळयांनी विरोध केला आहे. त्यामुळे आम्ही या विधेयकाला सुधारणा सुचविली आहे. ज्यांच्या घरामध्ये शौचालय नसेल त्याला ग्रामपंचायतीच्या निवडणुकीला उभे राहता येणार नाही किंवा त्याचे सदस्यत्व रद्द होईल, अशी यामध्ये तरतूद आहे. आज अनेक वाडया, वस्त्या, आदिवासी पाडे, मागासवर्गीय, बौध्द वस्त्या या सर्व ठिकाणी शासनाने पाणीपुरवठा केलेला नाही. एक शौचालय बांधण्यासाठी शासन 2500 रुपये देते. परंतु प्रत्यक्षात एका शौचालयासाठी 10 हजार रुपये खर्च येतो. सभापती महोदय, ग्रामीण भागामध्ये अनेक लोकांचे हातावर पोट आहे, दिवसाकाठी 50-100 रुपये कमवून ते संध्याकाळी आपल्या पोटाची भूक भागवितात. त्यामुळे शौचालयासाठी ते 10 हजार रुपये कोठून आणणार ? शासनाने मागासवर्गीयांना जे आर्थिक दुर्बल घटकातील आहेत व पाण्याची व्यवस्था असेल त्याठिकाणी त्या लोकांना 10 हजार रुपये द्यावे अशी आम्ही सुधारणा सुचविली आहे. ज्या वाडयांमध्ये पाण्याची व्यवस्था नसेल त्याठिकाणी डोक्यावरुन पाणी आणून ते शौचालय वापरु शकणार नाहीत. ज्यांची घरामध्ये शौचालय बांधण्याची कुवत नाही. शासनाने आतापर्यंत अनेक बौध्द पाडयामध्ये, वाडयामध्ये पाणी दिलेले नाही. आज ग्रामीण भागातील महिला 2 किलोमीटर अंतरावरुन पाणी आणतात. त्यांच्यासाठी हे निकष वगळवावेत.

यानंतर श्री.शिगम

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. रामदास कदम....

मागासवर्गीय, बौध्द, आदिवासी, दारिद्ररेषेखालील माणूस यांना या विधेयकातून वगळावे किंवा त्यांना शौचालय बांधण्यासाठी पैसे द्यावेत. बौध्द, आदिवासी, मागासवर्गीय लोकांचे ग्रामपंचायतीचे दरवाजे बंद करण्यासाठी हे विधेयक आणलेले आहे. खरे तर डॉ. बाबासाहेब आंबेडकराची घटना पायदळी तुडविण्याचे पाप या सरकारने केलेले आहे. त्या पापामध्ये आम्ही विरोधी पक्ष सहभागी होऊ इच्छित नाही. म्हणून या विधेयकाला सभागृहाची संमती मागत असताना आम्ही विभाजनाची मागणी केली. ही विभाजनाची मागणी योग्य वेळी केलेली आहे. जर अशा नियमबाह्य पध्दतीने विधेयके या सभागृहामध्ये संमत करुन घेतली जात असतील तर या सभागृहामध्ये सत्ताधारी पक्ष आणि सभापती म्हणून आपण बसून दोघांनी विधेयके संमत करावी. सभापती महोदय, विरोधी पक्षाला संरक्षण देण्याची जबाबदारी आपली आहे. तेव्हा मी उपस्थित केलेल्या हरकतीच्या मुद्याच्या बाबतीत आपण निर्णय द्यावा अशी माझी विनंती आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित केला. त्या आधी मी हरकतीचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर निर्णय मागण्यासाठी मी उभा आहे. सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी उपस्थित केलेला हरकतीचा मुद्दा शंभर टक्के बरोबर आहे. सत्ताधारी पक्षातील आमचे सहकारी सन्माननीय सदस्य देखील ही गोष्ट मान्य करतील. विधेयक संमत करण्याच्या वेळी माननीय तालिका सभापतींना अधिका-यांनी मार्गदर्शन करायला पाहिजे होते. परंतु तसे मार्गदर्शन केले नाही आणि सभागृहाचे कामकाज एकतर्फी रेटून नेण्यात आले. असा प्रकार या सभागृहामध्ये होता कामा नये. सभापती महोदय, आपल्यावर आमचा प्रचंड विश्वास आहे. सभागृहाच्या दोन्ही बाजूकडून हे विधेयक संमत झालेले नाही. विधेयक संमत करण्याच्या स्टेजला आम्ही विभाजनाची मागणी केली होती आणि ती धुडकावण्यात आली. विभाजनाची मागणी आम्ही योग्य वेळीच केलेली आहे. तेव्हा माझ्या हरकतीच्या मुद्या बाबत आपण निर्णय द्यावा आणि आता विधेयक संमत करण्यासंबंधी जे काही कामकाज झाले त्यामध्ये दुरुस्ती करावी अशी माझी आपणास विनंती आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम आणि सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी या सभागृहामध्ये जे घडले याबद्दल आपले मत व्यक्त केले. एक गोष्ट निश्चित आहे की, आपण सर्वांनी दिलेल्या सहकार्यामुळे अद्यापर्यन्त या सभागृहामध्ये कोणतेही विधेयक कधीही मतदानाला टाकले गेले नाही. कधी कधी तर सभागृहामध्ये सत्ताधारी पक्षाची सदस्य संख्या कमी असतानाही विधेयकाच्या बाबतीत विरोधी पक्षाने सहकार्य केलेले आहे ही गोष्ट मान्य करावी लागेल. समजा या ठिकाणी तालिका सभापतीकडून चूक झालेली असेलही, माझ्या सारख्याकडूनही चूक होऊ शकते. सन्माननीय सदस्य अनुभवी आहेत. त्यांच्या गाठीशी फार अनुभव आहे. या ठिकाणी काही वेळा अपर्याप्त परिस्थितीमध्ये विभाजन मागितलेही गेले असेल. सन्माननीय सदस्यांचा विभाजन मागण्याचा अधिकार अबाधित असतो. या बाबतीत कटुता टाळण्यासाठी हे विधेयक सभागृहाने मंजूर केलेले आहे असे मी समजतो आणि पुढील कार्यवाहीसाठी मला संमती द्यावी अशी आपणास विनंती करतो.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हे विधेयक संमत केलेले आहे असे जरी आपण म्हणत असलात तरी आम्ही त्या विधेयकाला संमती दिलेली नाही. या विधेयकामध्ये आम्ही दुरुस्त्या सुचविलेल्या होत्या. त्या दुरुस्त्या मंत्री महोदयांनी मान्य न करता विधेयक रेटून नेण्याचा प्रयत्न केलेला आहे. या विधेयकाचे प्रारुप आम्हाला मान्य नव्हते म्हणून आम्ही विभाजनाची मागणी केली.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखी नोंदी

श्री.पांडुरंग फुंडकर.....

हे याठिकाणी नमूद झाले पाहिजे. बिल रेटून नेण्यात आले. आम्ही पोलची मागणी केली होती. आम्हाला पोल दिला गेला नाही. भविष्यात अशा घटना घडू नयेत. अशाप्रकारच्या घटना घडणार असतील तर आम्ही निर्णय घेतला आहे. बिलांवरील चर्चेच्या वेळी आम्ही सभागृहात बसणार नाही.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझी कळकळीची आणि हात जोडून विनंती आहे. मागासवर्गीय, गरीब माणसांवर अन्याय होता कामा नये. ग्रामपंचायत लोकशाहीचा पाया आहे. घटनेची पायमल्ली होता कामा नये. शेवटच्या माणसावर अन्याय होता कामा नये. म्हणून फक्त मागासवर्गीय, आदिवासी आणि ज्या ज्या वाड्यांमध्ये पाण्याची व्यवस्था नसेल, ज्या वाड्यांमधील माणूस शौचालय बांधण्यासाठी सक्षम नसेल, शासन त्यांना शौचालय बांधण्यासाठी पैसा देणार असेल, तशी दुरुस्ती झाली तर आमची हरकत नाही. परंतु गरीब, मागासवर्गीय, आदिवासींवर अन्याय होता कामा नये. हे बिल मंजूर झाले असले तरी त्यामध्ये दुरुस्ती करुन घेण्यात यावी, तसा शब्द आपल्याकडून आम्हाला मिळावा.

उप सभापती : आपण दिलेली जी सूचना आहे तिचा अंतर्भाव पुढील वेळी नक्की करावा यासाठी मी देखील प्रयत्नशील राहीन. आपल्याला जे अभिप्रेत आहे ते करण्यासाठी मी वचन देतो.

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, बिल मंजूर झाल्यानंतर काय करणार?

उप सभापती : यामध्ये अधिक विसंगती निर्माण होऊ नये. अनेक बिले मंजूर झाल्यानंतर देखील भविष्यकाळात त्यामध्ये अनेक गोष्टीबद्दल सुधारणा होत असतात. त्या प्रक्रियेनुसार मी विनंती केली आणि माननीय सदस्यांनी ती मान्य केली आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, बिल मंजूर झाले असे समजू नये.

उप सभापती : असे मी समजलो होतो. परंतु याठिकाणी स्पष्टीकरण केल्यानंतर मी तसे समजलो नाही. मी ती प्रक्रिया पुन्हा पाहतो.

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, या बिलामध्ये सुधारणा करावी अशी मी शासनाला हात जोडून विनंती केली, खाली बसून पाया पडलो होतो. आमच्या घटनादत्त अधिकाराचा प्रश्न आहे. सदनामध्ये सदस्याला आपल्या अधिकारापासून मज्जाव करण्याचा प्रयत्न होऊ नये अशी मी शासनाला विनंती केली होती. शासनाने कठोर भूमिका घेऊन एकप्रकारे आमच्या अधिकारावर गदा आणण्याचा प्रकार केला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विशेष उल्लेखाच्या सूचना

पृ. शी. : दारिद्रय रेषेखालील सर्व्हे यादीमध्ये नाव असलेल्या व्यक्तींना पिवळी शिधापत्रिका मिळणे

मु. शी. : दारिद्रय रेषेखालील सर्व्हे यादीमध्ये नाव असलेल्या व्यक्तींना पिवळी शिधापत्रिका मिळणे याबाबत डॉ.दीपक सावंत, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

उपसभापती : मा□□य सदस्य डॉ.दीपक सावंत यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, राज्यामध्ये पिवळ्या शिधापत्रिका देताना ज्या व्यक्तीचे नाव 1998 च्या दारिद्र्यरेषेखालील असलेल्या सर्व्हे यादीमध्ये आहे अशाच व्यक्तींना देता येतात असा नियम आहे. 2002 च्या दारिद्र्यरेषेखालील असलेल्या सर्व्हे यादीमध्ये ज्या व्यक्तीचे नाव आहे अशा व्यक्तींना पिवळी शिधापत्रिका देता येत नाही असे शासनाचे आदेश आहेत, असे समजते. संगमनेरच्या तहसीलदार तसेच जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी देखील तशी माहिती दिली आहे. 2002 च्या सर्व्हे यादीतील व्यक्तींनाही पिवळी शिधापत्रिका देण्याबाबत राज्य शासनाने ताबडतोब निर्णय घ्यावा अशी मी या विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे शासनाला विनंती करीत आहे.

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

पृ. शी. : बीड जिल्हयातील स्वस्त धान्य योजनेत होणारा भ्रष्टाचार

मु. शी. : बीड जिल्हयातील स्वस्त धान्य योजनेत होणारा भ्रष्टाचार याबाबत श्री.धनंजय मुंडे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

उपसभापती : मा□□य सदस्य श्री.धनंजय मुंडे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.धनंजय मुंडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, बीड जिल्हयात मोठया प्रमाणात स्वस्त धान्य योजनेतील धान्य पुरवठयामध्ये काळाबाजार होत आहे. बीड जिल्हा हा बहुसंख्य ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणून परिचित आहे. या जिल्हयात सरकारमार्फत जे धान्य वाटप केले जाते त्या धान्य वाटपाची वेळ आणि स्वस्त धान्य दुकानांची वेळ यामध्ये फार मोठी तफावत आहे. सरकारमार्फत स्वस्त धान्य दुकानांना दर महिन्याच्या 1 ते 6 तारखेपर्यंत धान्य वाटप व्हावे आणि दुकानदारांनी हे स्वस्त धान्य शिधापत्रिकाधारकांना दर महिन्याच्या 6 ते 15 तारखेपर्यंत वाटप करावे. आज परिस्थिती अशी आहे की, महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात सरकारकडून स्वस्त धान्य दुकानांना धान्याचे वाटप केले जाते. त्यामुळे आठवड्यानंतर सुरु होणाऱ्या पुढील महिन्यात धान्य संपले असे सांगितले जाऊन उपलब्ध असलेल्या धान्याचा काळाबाजार होतो. म्हणून मी विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे शासनाचे या विषयाकडे लक्ष वेधू इच्छितो.

..नंतर 2ओ.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : केज (जि. बीड) तालुक्यातील शेतकऱ्यांना अनुदान न मिळणे

मु. शी. : केज (जि. बीड) तालुक्यातील शेतकऱ्यांना अनुदान न मिळणे याबाबत ॲड. उषा दराडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा-ा-ीय सदस्या ॲड. उषा दराडे यां-ी विशेष उल्ले?ासंबंधीची सूच-ा दिली आहे. त्यां-ी ती मांडावी.

ॲड. उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले?ासंबंधीची सूच-ा मांडते.

सन 2008-09 सालच्या हंगामात केज तालुक्यातील 122 गावच्या 19 हजार 608 शेतकऱ्यांना सोयाबीनचा फटका बसला असता शासनाने नुकसानग्रस्तांना अनुदान देण्याचा निर्णय घेऊन माहे सप्टेबर, 2010 अखेरपर्यंत 7 हजार शेतकऱ्यांना अनुदान न मिळणे, त्यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यात निर्माण झालेला असंतोष, निराशेचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KGS/ KTG/

पृ. शी. : निवडणूक कर्मचाऱ्यांच्या वयोमर्यादेत वाढ करणे

मु. शी. : निवडणूक कर्मचाऱ्यांच्या वयोमर्यादेत वाढ करणे याबाबत श्री. सुभाष चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□□य सदस्य श्री. सुभाष चव्हाण यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

शासनाने 6 ऑक्टोबर, 2010 रोजी निवडणूक कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत कायमस्वरुपी समाविष्ट करताना 45 वर्ष वयोमर्यादेच्या सवलतीचा अध्यादेश जारी केला, परंतु 1994 नंतर काम केलेल्या काही निवडणूक कर्मचाऱ्यांचे वय वर्षे 45 ओलांडले असल्याने सदर अध्यादेशापासून त्यांना शासन सेवेपासून वंचित रहावे लागत आहे. यासाठी ही वयोमर्यादा वय वर्षे 47 पर्यंत वाढविण्याची नितांत गरज आहे. अशातच शासनाच्या अर्थ खात्याद्वारे दि. 5 जून, 2010 रोजीच्या पदभरती निर्बंधाच्या आदेशामुळे वयोमर्यादेत बसत असलेल्या कर्मचाऱ्यांनादेखील शासन सेवेत समाविष्ट होण्यासाठी अडचण निर्माण झालेली आहे. तरी वयोमर्यादेत बसत असणाऱ्या निवडणूक कर्मचाऱ्यांना तातडीने शासकीय सेवेत समाविष्ट करावे असे मी या विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे सभागृहात सुचवित आहे.

....3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KGS/ KTG/

पृ. शी. : आदिवासी आश्रमशाळातील शिक्षकांचे समायोजन करणे

मु. शी. : आदिवासी आश्रमशाळातील शिक्षकांचे समायोजन करणे, याबाबत श्री. भगवान साळुंखे वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा-ा-ीय सदस्य श्री.भगवान साळुंखे यां-ी विशेष उल्ले?ासंबंधीची सूच-ा दिली आहे. त्यां-ी ती मांडावी.

श्री. भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले?ासंबंधीची सूच-ा मांडतो.

आदिवासी विकास विभागाचे प्रधान सचिव श्री. उत्तमराव खोब्रागडे यांनी या शैक्षणिक वर्षामध्ये त्यांच्या अधिपत्याखालील अनेक अनुदानित आश्रमशाळांना अचानक भेटी दिल्या. त्यामध्ये अनेक प्रकारच्या त्रुटी व अनियमितता आढळून आल्या. संबंधितांना बचावाची संधी देऊन पूर्ण चौकशीअंती आठ आदिवासी आश्रमशाळांच्या मान्यता काढल्या. त्या आश्रमशाळातील विद्यार्थ्यांचे अन्य आश्रमशाळांमधून समायोजनही केले. तसेच दि. 7 ऑक्टोबर, 2010 च्या निर्णयाने या आठ आश्रमशाळातील शिक्षकांच्या समायोजनाचे आदेशही दिले. तथापि अद्याप एकाही शिक्षकाचे समायोजन अन्य अनुदानित आश्रमशाळेत झालेले नाही. या विशेष उल्लेखाद्वारे मी शासनास अशी विनंती करतो की, या शिक्षक व शिक्षकेतरांचे समायोजन विभागाच्या अधिपत्याखालील आश्रमशाळातून त्वरित करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KGS/ KTG/

पृ. शी. : सर्वमान्य बृहत आराखडा तयार करणे

मु. शी. : सर्वमान्य बृहत आराखडा तयार करणे याबाबत श्री. भगवान साळुंखे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा-ा-ीय सदस्य श्री. भगवान साळुंखे यां-ी दुसरी एक विशेष उल्ले?ासंबंधीची सूच-ा दिली आहे. त्यां-ी ती मांडावी.

श्री. भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले?ासंबंधीची सूच-ा मांडतो.

दिनांक 20 जुलै, 2009 च्या शासन निर्णयाने नवीन शाळांना मान्यता देण्यासाठी सर्वमान्य स्वरुपाचा बृहत आराखडा तयार करण्याची घोषणा करण्यात आली होती. आता चालू 2010-11 हे शैक्षणिक वर्षही संपत आले असून अद्याप सर्वमान्य स्वरुपाचा बृहत आराखडा प्रसिध्द करण्यात आलेला नाही. त्यामुळे राज्यभर गोंधळाचे वातावरण निर्माण झाले आहे. सारांश या विशेष उल्लेखाद्वारे मी शासनास अशी विनंती करतो की, शासनाने दि. 31 जानेवारी, 2011 पूर्वी सर्वमान्य स्वरुपाचा बृहत आराखडा तयार करुन त्यास व्यापक प्रसिध्दी द्यावी. त्यानंतर दि. 28 फेब्रूवारी, 2011 पूर्वी नवीन शाळांचे प्रस्ताव मागवावेत. दि. 31 मार्च, 2011 पूर्वी आलेल्या प्रस्तावांची छाननी करुन नवीन शाळांना मान्यता द्याव्यात.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : चिल्ड्रेन एड सोसायटीच्या प्रशासकांचा मनमानी कारभार

मु. शी. : चिल्ड्रेन एड सोसायटीच्या प्रशासकांचा मनमानी कारभार याबाबत श्री. किरण पावसकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□□य सदस्य श्री. किरण पावसकर, यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

बेवारस, हरविलेल्या, निराधार मुलांना संरक्षण मिळावे यासाठी "चिल्ड्रेन एड सोसायटी" या संस्थेचे मुंबईत सात बालगृह असून, संस्थेच्या प्रशासकांचा मनमानी कारभार आणि असुविधांमुळे मुलांना नरकयातना सहन कराव्या लागत असून त्यांचा मानसिक छळ केला जात असल्याने "सिंगल पॅरेट" असणारी मुले या छळ छावणीतून सुटका करुन घेण्याच्या प्रयत्नात असल्याची माहिती उघड होत असणे, या सर्व बालगृहात एकूण दोन हजार मुले आहेत. मुलांसाठी समाज कल्याण खात्यामार्फत बालनगरी शाळा आहे, परंतु प्रशासकांच्या मनमानी कारभाराला कंटाळून मुलांनी अर्ध्यावर शाळा सोडण्याची उदाहरणे असून, मुलांना चौकीत कोंडून ठेवणे, मानसिक छळ करणे अशा प्रकारांनी बालगृहापेक्षा रस्त्यावर जगण्याची भावना मुलांमध्ये निर्माण होणे, मुलांची काळजी घेण्यासाठी पंचाहत्तरी गाठलेले केअर टेकर असणे, गेल्या दहा वर्षांपासून नोकर भरती नाही, कार्यरत कर्मचाऱ्यांना तीन तीन महिने पगार नाही, अनुभवी समुपदेशकाची जागा भरण्यास टाळाटाळ अशा विविध समस्यांमुळे कर्मचाऱ्यांचीही काम करण्याची मानसिकता नसणे, सदर उपाययोजना होणे आवश्यक असल्याने शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. :आदिवासी समाजात सिकलसेल या आजाराचे जास्त असलेले प्रमाण

मु. शी. :आदिवासी समाजात सिकलसेल या आजाराचे जास्त असलेले प्रमाण याबाबत श्री.केशवराव मानकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य श्री. केशवराव मानकर यांनी विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

राज्यातील आदिवासी बहुल परिसरात वावरणा-या समाजात सिकलसेल या आजाराचे प्रमाण जास्त आहे. विदर्भातील गोंदिया, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, यवतमाळ आणि अमरावती या जिल्हयांमध्ये सिकलसेलची नियमित तपासणी करण्याचे आरोग्य विभागाचे निर्देश आहे. त्या अनुषंगाने राज्य शासन आदिवासीबहुल जिल्हयात अस्तित्वात असलेल्या "सिकलसेल" या आजाराचे समूळ उच्चाटन करण्यासाठी कोटयावधी रुपये खर्च करीत असते. त्याचाच एक भाग म्हणून एप्रिल 2010 मध्ये सोल्युबिलीटी चाचणी करण्यासाठी राज्यस्तरावरुन अंदाजे 14 ते 15 लाख रुपये किमतीच्या किट्स गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्हयात पाठविण्यात आलेल्या आहेत. त्या किट्सपैकी गोंदिया जिल्हयाला 1 लाख 27 हजार 750 किट्स पुरविण्यात आलेल्या आहेत. परंतु हायमेडीया या कंपनीच्या असलेल्या या किट्सची निर्मिती मार्च 2010 मध्ये झाली असून त्याची मुदत मार्च 2011 पर्यंत आहे. मात्र मुदत संपायला चार महिने शिल्लक असूनही त्यातील ब-याच किट्स खराब झाल्या आहेत. त्यामुळे सदर किट्स निकृष्ट असल्याचे निष्पन्न होऊनही जिल्हयातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र, ग्रामीण रुग्णालयासह जिल्हा रुग्णालयातही त्या निकृष्ट किट्सचा वापर सुरु आहे. यासंबंधी संबंधित वैद्यकीय अधिका-यांनी लेखी तक्रार करुनही अद्याप त्या किट्स कंपनीला परत करण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे सदर निकृष्ठ किट्समुळे आजाराचे योग्य निदान होत नसल्यामुळे शासनाचा कोटयावधी रुपयांचा निधी वाया जात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर ....

आहे. परिणामी रुग्णांवर व्यवस्थित उपचार होत नसल्यामुळे त्यांच्यावर प्राण गमावण्याची आलेली वेळ लक्षात घेता शासनाने निकृष्ट दर्जाच्या किट्स कंपनीला परत पाठवून कंपनीच्या अधिका-यांवर शासनाने कारवाई करण्याची आवश्यकता आहे त्यामुळेच मी या ठिकाणी विशेष उल्लेखाची सूचना मांडलेली आहे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी.:गोंदिया जिल्हा परिषद शिक्षण विभागात अनेक शिक्षकांना निवडश्रेणी अद्याप न मिळणे

मु. शी. :गोंदिया जिल्हा परिषद शिक्षण विभागात अनेक शिक्षकांना निवडश्रेणी अद्याप न मिळणे याबाबत श्री. केशवराव मानकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य श्री.केशवराव मानकर यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

गोंदिया जिल्हा परिषद शिक्षण विभागात जवळपास पाच हजार शिक्षक कार्यरत आहेत. यापैकी अनेक शिक्षकांनी आपला सेवाकाळ 12 ते 24 वर्षाच्या वर पूर्ण केला आहे. परंतु या उत्तम सेवाकाळासाठी शासनाने ठरवलेली निवडश्रेणी मात्र या शिक्षकांना अद्याप देण्यात आलेली नाही. प्राथमिक शिक्षकांना त्यांच्या सेवाशर्तीच्या अटीवर शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या शासन परिपत्रक क्र. डीएसआर/2491/2615/सीआर40/18,10 फेब्रुवारी,1991 अनुसार जिल्हा परिषदेतील शिक्षकांना वरीष्ठ श्रेणी व निवडश्रेणी लागू करण्यासंबंधीचे आदेश संबंधित विभागाला देण्यात आलेले आहे. यात वरिष्ठ श्रेणी मंजूर करण्यासाठी शिक्षकांचे कार्य समाधानकारक व 12 वर्षे अर्हताकारी सेवेची अट ठेवण्यात आली आहे. त्यानंतर वेळोवेळी सदर शासन निर्णयात फेरबदल करुन दिनांक 31 मे, 2001,नंतर 13 मे, 2004, त्यानंतर 20 एप्रिल, 2006 ला शासन परिपत्रक काढण्यात आलेले आहे. त्यामुळे 20 एप्रिलच्या शासन परिपत्रकानुसार वरिष्ठ श्रेणीत वेतन घेणा-या व दि. 5 जानेवारी, 1968 रोजी सलग 24 वर्षाच्या अर्हताकारी सेवेच्या तरतुदीमुळे 12 वर्षाची अर्हताकारी अट शिथिल करुन वरिष्ठ श्रेणीतील 12 वर्षाहून कमी अर्हताकारी सेवा झाली तरी 1 जानेवारी 1968 रोजी सलग 24 वर्षे अर्हताकारी सेवा पूर्ण करणा-या प्राथमिक शिक्षकांना विहित अटी पूर्ततेच्या अधीन राहून निवडश्रेणीत पात्र ठरविण्याचे आदेश देण्यात आले आहे. परंतु संबंधित विभागाने या परिपत्रकाची अंमलबजावणी न केल्याने आजी-माजी शिक्षकांसह

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर .....

ज्या शिक्षकांचे मृत्यू झाले अशा शिक्षकांनासुध्दा न्याय मिळालेला नरही. एक हजाराच्यावर वरिष्ठ श्रेणी व निवड श्रेणीची प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यामुळे निवड श्रेणीसाठी आजी-माजी शिक्षकांना करावी लागणारी प्रदीर्घ प्रतिक्षा लक्षात घेता शासनाने तातडीने शिक्षकांची वरिष्ठ श्रेणी आणि निवडश्रेणीची प्रलंबित प्रकरणे तात्काळ निकाली काढण्याच्या आदेशाची आवश्यकता असल्यामुळे मी विशेष उल्लेख मांडलेला आहे.

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. :चंद्रपूर जिल्हयातील शेतक-यांना जवाहर रोजगार योजनेपासून वंचित ठेवणे

मु. शी. :चंद्रपूर जिल्हयातील शेतक-यांना जवाहर रोजगार योजनेपासून वंचित ठेवणे याबाबत श्रीमती शोभा फडणवीस, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : सन्मा□□□य सदस्या श्रीमती.शोभा फडणवीस यां□□ विशेष उल्ले□□संबंधीची सूच□□ दिली आहे. त्यां□□ ती मांडावी.

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□□संबंधीची सूच□□ मांडत आहे.

चंद्रपूर जिल्हयातील शेतक-यांकरिता सन 2007-2008 मध्ये प्रती तालुका 300 विहिरी या प्रमाणे 15 तालुक्यांसाठी 4500 जवाहर विहिरी मंजूर झाल्या होत्या. त्या विहिरी पूर्ण झाल्या परंतु अजून पर्यंत शासनाने त्यांना पैसा दिला नाही त्यामुळे निधी पासून शेतकरी वंचित झालेला असल्यामुळे त्याच्यावर कर्जाचे ओझे देखील वाढलेले आहे. म्हणून मी शासनाला विनंती करते की,संबंधित शेतक-यांना ताबडतोब पैसे देण्यात यावे व शेतक-यांना याचा लाभ मिळवून द्यावा.

...6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. :गडचिरोली जिल्हयातील सिरोंचा तालुक्यातील "सोमनूर" हे पर्यटनस्थळ घोषित करणे

मु. शी. गडचिरोली जिल्हयातील सिरोंचा तालुक्यातील "सोमनूर" हे पर्यटनस्थळ घोषित करणे याबाबत श्रीमती शोभा फडणवीस, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : सन्मा□□□य सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडत आहे.

गडचिरोली जिल्हा हा नक्षलवादी जिल्हा आहे तसेच हा जिल्हा निसर्गरम्य जिल्हाही आहे. या ठिकाणच्या आदिवासी मुलांना, सुशिक्षित बेरोजगारांच्या हातांना कोणत्याही प्रकारचे काम मिळत नाही. या ठिकाणी रोजगार हमी योजना व्हायबल नसेलही परंतु या ठिकाणी पर्यटनासाठी चांगले स्पॉट असतांना सुध्दा आपण ते विकसित केलेले नाहीत.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस.....

गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा तालुक्यातील सोमनूर येथे तीन नद्यांचा संगम आहे. तसेच तीन राज्यांचा -महाराष्ट्र, छत्तीसगड आणि आंध्र प्रदेश देखील संगम आहे. सोमनूर हे उंचावर वसलेले आहे. त्याठिकाणी सुंदर निसर्ग सौंदर्य आहे. तेव्हा सोमनूर हे पर्यटनक्षेत्र घोषित केल्यास त्याठिकाणी मोठ्या प्रमाणावर युवकांना काम मिळू शकेल.

तसेच सिरोंचा, कालेश्वर आणि आंध्र प्रदेश यामधून गोदावरी नदी वाहते. हा परिसर देखील निसर्गरम्य आहे. त्याठिकाणी गोदावरी नदी वाहते, आजूबाजूला गर्द झाडी आहेत तेव्हा हा परिसर देखील पर्यटन क्षेत्र म्हणून घोषित करावा अशी मी आपल्या वतीने शासनाला विनंती करते. या कामासाठी शासनाला निधीची कमतरता जाणवत असेल तर आम्ही आमदार निधीतून तो देण्यास तयार आहोत.जेणेकरुन आम्हाला आदिवासींना न्याय देता येईल आणि त्यांना नक्षलवांद्याकडे जाण्यापासून परावृत्त करुन स्वत:च्या पायावर उभे राहण्याची हिम्मत देऊ शकू, अशी विनंती मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : वांद्रे येथील शिधावाटप कार्यालयाची झालेली दुरवस्था

मु. शी. : वांद्रे येथील शिधावाटप कार्यालयाची झालेली दुराास्था याबाबत श्री. हुसेन दलवाई, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य श्री. हुसेन दलवाई यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.हुसेन दलवाई (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

मुंबईतील वांद्रे (पूर्व) खेरनगर येथील शिधावाटप कार्यालय ज्या इमारतीमध्ये आहे ती इमारत अत्यंत जुनी असून मोडकळीस आलेली आहे. इमारतीच्या दुरवस्थेमुळे तसेच पावसाळ्यात त्याठिकाणी पाणी साचत असल्यामुळे कार्यालयीन अभिलेख भिजले आहेत. त्यातच कार्यालयात मुंग्या आणि मच्छरांचा प्रादूर्भाव जास्त असल्यामुळे तेथील कर्मचारी वर्ग आणि कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना त्रास होत आहे. सदरहू इमारत अत्यंत जीर्ण अवस्थेत असल्यामुळे तेथे केव्हाही दुर्घटना होऊ शकते. त्यामुळे तेथे काम करणारे कर्मचारी आणि त्या परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. तेव्हा या संदर्भात शासन स्तरावर लवकरात लवकर कार्यवाही व्हावी अशी मी या विशेष उल्लेखद्वारे विनंती करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी :फेरतपासणीमध्ये पास होऊनही अंतिम निकालामध्ये त्याचा अंतर्भाव न होणे

मु.शी.: फेरतपासणीमध्ये पास होऊनही अंतिम निकालामध्ये त्याचा अंतर्भाव न होणे याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य डॉ.नीलम गोऱ्हे यां□ विशेष उल्ले□ संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ संबंधीची सूच□ मांडतो.

पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यातील शिवाजी मेमोरियल सोसायटी येथील इलेक्ट्रीकल इंजिनिअरची विद्यार्थिनी कु.अश्विनी बाळासाहेब म्हसे ही वर्कशॉप कॅलक्युलेशन विषयात नापास झाल्याचे जाहीर करण्यात आले होते. तिने पेपर फेरतपासणीसाठी अर्ज केला असता दिनांक 15.2.2010 रोजी तिचा निकाल कायम असल्याचे कळविण्यात आले. त्यामुळे ती जानेवारी महिन्यात झालेल्या पुरवणी परीक्षेला ती बसू शकली नाही. त्यानंतर तिच्या वडिलांनी माहितीच्या अधिकाराखाली उत्तरपत्रिकेची प्रत मागितली असता सदर गुणपत्रिकेवर सहा गुण वाढले आहेत आणि पेपरच्या शेवटी प्रश्न सोडविला असून तो नजर चुकीने तपासण्याचे राहून गेले असे परीक्षा तपासणीकाने नमूद केले आहे. कु.अश्विनीचे सहा मार्क्स वाढल्यामुळे ती पास झालेली आहे. ही माहिती माहितीच्या अधिकाराखाली मिळाली. परंतु तिच्या अंतिम निकालामध्ये मात्र औद्योगिक प्रशिक्षण केंद्राने बदल केलेला नाही. जादा गुण मिळवून ती नापास झाल्यामुळे तिच्यावर अन्याय झाला आहे. संबंधित अधिकाऱ्याकडून तिला न्याय मिळत नसल्यामुळे तिने पुणे जिल्हा पोलीस ग्रामीण अधीक्षक यांना निवेदन देऊन आत्महत्या करण्याचा इशारा दिलेला आहे. तेव्हा कु.अश्विनी म्हसे हिला जे वाढीव सहा गुण मिळाले आहेत ते अंतिम निकालामध्ये अंतर्भाव करुन तिला पास म्हणून जाहीर करावे अशा सूचना माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री.राजेश टोपे यांनी संबंधितांना द्याव्यात अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे मागणी करीत आहे.

------- ..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : शिवप्रताप दिनाच्या कार्यक्रमाला लोकप्रतिनिधी उपस्थित नसणे

मु. शी. : शिवप्रताप दिनाच्या कार्यक्रमाला लोकप्रतिनिधी उपस्थित नसणे याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□□य सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

दिनांक 12 डिसेंबर रोजी शिवप्रताप गडावर "शिवप्रताप दिन" साजरा करण्यात आला. जय भवानी, जय शिवाजी घोषणांनी हा दिन तेथे साजरा झाला. त्याठिकाणी हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी करण्यात आली. अनेक युवक व कार्यकर्ते त्याठिकाणी गेले होते. आपल्या सर्वांना माहीत आहे की, छत्रपती शिवाजी महाराजांनी भवानी मातेच्या दृष्टान्तानंतर अफझलखानाचा कोथळा बाहेर काढण्याचा प्रताप प्रतापगडावर केला होता. म्हणून "प्रताप दिन" साजरा करण्यात येतो. या कार्यक्रमाला जिल्हापरिषदेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष तसेच पदाधिकारी हे राजकीय नेते या कार्यक्रमाला अनुपस्थित होते. "शिवप्रताप दिन" हा संपूर्ण महाराष्ट्राच्या दृष्टीने एक वीरश्री निर्माण करणारा आणि देशप्रेमाचा उत्सव आहे. या कार्यक्रमाला जिल्हापरिषदेचे अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांनी उपस्थित राहून योग्य ती राजकीय प्रतिष्ठा द्यावयास पाहिजे होती, याकडे मी विशेष उल्लेखाद्वारे शासनाचे लक्ष वेधीत आहे.

यानंतर श्री.गायकवाड..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. पुणे महानगरपालिका क्षेत्रातील विविध शासकीय कार्यालयाकडे मिळकत कराची असलेली थकबाकी त्वरित वसूल करणे

मु.शी.:पुणे महानगरपालिका क्षेत्रातील विविध शासकीय कार्यालयाकडे मिळकत कराची असलेली थकबाकी त्वरित वसूल करण्याबाबत श्री.मोहन जोशी,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

उप सभापती : माननीय सदस्य श्री.मोहन जोशी यांनी विशेष उल्लेखासंबधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.मोहन जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो. :

"पुणे महानगरपालिकेच्या क्षेत्रात राज्य शासनाची एकूण 276 कार्यालये असून या कार्यालयाकडे मिळकत कराची देयके पाठविली जातात. परंतु या कार्यालयाकडून मिळकत कराची रक्कम पुणे महानगरपालिकेकडे भरली जात नसल्याचे आढळून आले आहे. मोठया प्रमाणात शासकीय कार्यालयांकडे मिळकत कराची रक्कम थकीत असून माननीय आमदार व माननीय खासदारांच्या दिनांक 22.11.2010 रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार शासकीय कार्यालयाकडे वाहन कर,करमणूक कर व व्यवसाय कर इत्यादी रक्कम पुणे महानगरपालिकेकडे लवकरात लवकर जमा करण्याची आवश्यकता आहे. या महत्वाच्या विषयावर मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. महाराष्ट्र सार्वजनिक आरोग्य विभागातील डॉक्टरांचे निवृत्ती वय 58 वर्षा ऐवजी 62 वर्ष करणे

मु.शी. :महाराष्ट्र सार्वजनिक आरोग्य विभागातील डॉक्टरांचे निवृत्ती वय 58 ऐवजी 62 वर्ष करण्याबाबत ॲड. उषा दराडे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

उप सभापती : माननीय सदस्या ॲड. उषा दराडे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

ॲड.उषा दराडे (विधान सभेने निवडलेल्या) सभापती महोदय मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

"महाराष्ट्रातील वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागातील (DMER) डॉक्टर 58 ऐवजी 62 वर्षापर्यंत काम करु शकतात व नंतर सेवा निवृत्त होतात . एकाच वैद्यकीय महाविद्यालयातून शिक्षण घेतलेले केन्द्र सरकारचे आरोग्य विभागात कार्यरत असलेले डॉक्टर 62व्या वर्षी निवृत्त होतात. देशातील इतर राज्यात सुध्दा डॉक्टरांचे निवृत्ती वयोमान 62 वर्षापर्यंत आहे . महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा वर्ग एक मधील अनेक डॉक्टर्स 58 वर्षाच्या निवृत्ती नंतर निवृत्ती वेतना व्यतिरिक्त एनआरएचएम ,एडस, युनिसेफ इत्यादी प्रकल्पअंतर्गत मासिक 50 ते 1 लाख रुपयापर्यंत अतिरिक्त वेतन घेऊन 62 ते 65 वर्षापर्यंत काम करु शकतात . सार्वजनिक आरोग्य विभागातील महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा वर्ग एक संवर्गातील डॉक्टरांचे निवृत्ती वयोमान 2010-2011 पासून 58 ऐवजी 62 वर्ष करावे यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पू.शी. शिक्षकांना देण्यात येणारी अशैक्षणिक कामे

मु.शी. शिक्षकांना देण्यात येणारी अशैक्षणिक कामे याबाबत श्री.रामनाथ मोते,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

उप सभापती : माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, शिक्षकांना अशैक्षणिक कामे देऊ नयेत असा शासनाने आदेश काढलेला असतांनासुध्दा आजही शिक्षकांना अशैक्षणिक कामासाठी नेमले जाते व त्यासाठी त्यांच्या सेवा अधिगृहीत केल्या जातात. फोटो पास वाटणे, याद्या दुरुस्त करणे, घरोघरी जाऊन मतदारांची माहिती घेणे या कामासाठी देखील शिक्षकांच्या सेवा घेण्यात आलेल्या आहेत.या शिक्षकांना बुथ लेव्हल ऑफिसर "बीएलओ" म्हणूनही काम करावे लागते. अशा प्रकारची कामे जे शिक्षक करणार नाहीत त्यांच्याविरुध्द कारवाई करण्याचे धोरण महसूल विभागाने स्वीकारलेले आहे. या संदर्भात मध्यंतरी मुंबई उच्च न्यायालयामध्ये एक याचिका दाखल करण्यात आली होती. त्यावेळी या शिक्षकाविरुध्द अशा प्रकारची कारवाई करता येणार नाही असा आदेश दिला होता. न्यायालयाने असा आदेश देऊनही ही कामे त्यांना दिली जातात आणि जे शिक्षक हे काम करणार नाहीत त्यांच्या विरुध्द कारवाई केली जाते .जळगाव जिल्हयातील मुक्ताईनगर येथील पाच शिक्षकांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हाधिका-यांचा सल्ला घेऊन निलंबित केले होते, ही बाब अत्यंत गंभीर स्वरुपाची असून याकडे शासनाने लक्ष द्यावे यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.धन्यवाद

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. इंग्रजी माध्यमांच्या शाळांना अनुदान देणे

मु.शी. इंग्रजी माध्यमांच्या शाळाना अनुदान देण्याबाबत श्री रामनाथ मोते, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री रामनाथ मोते यांनी विशेष उल्लेखासबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, राज्यातील इंग्रजी माध्यम वगळून सर्व माध्यमांच्या शाळांना शासनाकडून अनुदान मिळते फक्त इंग्रजी माध्यमांच्या शाळांना अनुदान दिले जात नाही.आज राज्यामधील इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकणा-या विद्यार्थ्यांची संख्या विचारात घेतली तर 75 टक्के मराठी भाषिक विद्यार्थी इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिक्षण घेतात. पालकांनी आपल्या पाल्यांना कोणत्या माध्यमाच्या शाळेत घालावे हा त्या पालकांचा घटनात्मक अधिकार आहे.एखाद्या पालकाचा मुलगा जर इंग्रजी शाळेत शिक्षण घेत असेल तर त्याला फी भरण्याचा भुर्दड पडतो तो कमी होण्यासाठी आणि या शाळेतील शिक्षकांना वेतन मिळत नसल्यामुळे, त्यांचे शोषण होत असल्याने शासनाच्या अनुदान सूत्रामध्ये इतर माध्यमांच्या शाळांबरोबरच इंग्रजी माध्यमांच्या शाळांनासुध्दा अनुदान देण्याच्या संदर्भात शासनाने फेर विचार करावा आणि या शाळांना व शिक्षकांना न्याय द्यावा अशी मी या विशेष उल्लेखाव्दारेशासनाकडे मागणी करतो..

उप सभापती : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि 3.15 वाजता पुन्हा भरेल.

(2.49 ते 3.15 मध्यंतर)

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

(मध्यंतरानंतर)

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

पृ.शी.: विदर्भातील निधीअभावी रखडलेले अनेक प्रकल्प

मु.शी.: विदर्भातील निधीअभावी रखडलेले अनेक प्रकल्प

याविषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, विनोद तावडे, रामदास कदम, संजय केळकर, डॉ.दीपक सावंत, श्रीमती शोभा फडणवीस, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री पाशा पटेल, किरण पावसकर, चंद्रकांत पाटील, परशुराम उपरकर, रामनाथ मोते, गोपीकिसन बाजोरीया, धनंजय मुंडे,वि.प.स. यांचा प्रस्ताव

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"विदर्भाचा सिंचनाचा अनुशेष संपला असे शासनाने सभागृहात जाहिर करुन देखील महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या जून, २००८ मध्ये असलेल्या आकडेवारीवरुन अनुशेष ११ लाख हेक्टर पर्यंत वाढल्याचे लक्षात येणे, विदर्भामध्ये गेल्या २० वर्षापासून सुरु असलेले अनेक प्रकल्प निधीअभावी रखडलेले असणे, आधीच तुटपुंजा निधी मिळाल्याने कासवगतीने सुरु असलेल्या कामांमध्ये अधिकाऱ्यांनी कोटयावधीचा भ्रष्टाचार करणे, उद्योगधंद्यासाठी विदर्भामध्ये अनुकूल परिस्थिती असून देखील रस्त्यांच्या अनुशेषामुळे विदर्भात उद्योगधंदे सुरु न होणे, उद्योगधंदे सुरु न झाल्यामुळे बेरोजगारांची गंभीर समस्या निर्माण होणे, त्यातच मिहानसारख्या महत्वाकांक्षी प्रकल्पाचे काम शासनाच्या दुर्लक्षामुळे धीम्या गतीने सुरु असणे, विदर्भामध्ये लाखो विणकर असतांना एन.सी.डी.सी. व इतर संस्थामार्फत देण्यात येणारे अर्थसहाय्य केवळ सोलापूर व इचलकरंजीलाच देणे, कापूस व संत्रा उत्पादक शेतकरी अनेक समस्यांनी ग्रस्त असतांना शासनाने सातत्याने त्याकडे दुर्लक्ष करणे, आत्महत्या रोखण्यासाठी घोषित केलेल्या पॅकेजचा शेतकऱ्यांना प्रत्यक्ष उपयोग न होणे, वैद्यकीय शिक्षण व आरोग्याच्या मूलभूत सोई-सुविधांचा अनुशेष वाढलेला असणे, डिसेंबर, २००९ च्या अधिवेशनात फसवे विदर्भ विकास पॅकेज घोषित करुन वैदर्भिय जनतेच्या डोळयात धूळफेक करणे, नुकत्याच अवकाळी पावसासाठी घोषित केलेल्या पॅकेजमध्ये देखील त्रुटी असणे, त्यामुळे वैदर्भिय जनतेत निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची उपाय योजना विचारात घेण्यात यावी."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

सभापती महोदय, हे महाराष्ट्र राज्याचे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीला 50 वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यामुळे मागील 50 वर्षामध्ये नागपूरमध्ये होणाऱ्या प्रत्येक अधिवेशनामध्ये गेल्या 25 वर्षापासून विदर्भातील जनता अनुशेषावर जगत आहे. सभापती महोदय, हा अनुशेष केवळ एका गोष्टीचा नाही. सिंचनाचा अनुशेष आहे, उद्योगांचा अनुशेष आहे, रस्त्यांचा अनुशेष आहे, विद्युत पंपाचा अनुशेष आहे, शिक्षणाचा अनुशेष आहे, आरोग्याचा अनुशेष आहे, तांत्रिक शिक्षणाचा अनुशेष आहे, नोकऱ्यांचा अनुशेष आहे. अशाप्रकारे जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये राज्याच्या निर्मितीपासून अनुशेष निर्माण झाला आहे.

सभापती महोदय, या राज्याची निर्मिती ज्यावेळी झाली त्यावेळी संयुक्त महाराष्ट्राची चळवळ महाराष्ट्रामध्ये सुरु झली. मराठी भाषिकांचे एक राज्य असावे म्हणून प्रचंड आंदोलन महाराष्ट्रामध्ये उभे राहिले. या आंदोलनामध्ये 105 हुतात्मे बळी पडले आणि त्यामधून या महाराष्ट्राची निर्मिती झाली.

(यानंतर श्रीमती थोरात)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

मराठवाडा, विदर्भ महाराष्ट्रात सामील होत असताना त्यावेळेला जो नागपूर करार झाला होता त्या कराराचे मी याठिकाणी पूर्ण वाचन करुन सभागृहाचा वेळ घेणार नाही. पण त्यातील कलम 4 मध्ये असे म्हटले आहे की, "एक स्वतंत्र शासन म्हणून त्यांच्या ज्या ज्या गरजा असतील त्यांना बाधा न येता निरनिराळया घटकांवर करावयाच्या खर्चासाठी पैशाचे नियत वाटप त्या भागातील लोकसंख्येच्या प्रमाणात करण्यात यावे. परंतु मराठवाडयाची अविकसित स्थिती लक्षात घेऊन त्या प्रदेशाच्या सर्वांगीण विकासाकरिता मराठवाडयाकडे खास लक्ष पुरविण्यात यावे आणि दर वर्षी राज्य विधानासभेसमोर त्यासंबंधीचा अहवाल ठेवावा." सभापती महोदय, कलम 6 मध्ये असे म्हटले आहे की, व्यावसायिक प्रशिक्षण आणि वैज्ञानिक किंवा अन्य विशेषकृत पेशासंबधीचे प्रशिक्षण मिळण्याच्या सुविधा जेथे आहेत अशा सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश मिळण्यासाठी या घटकांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात चांगल्या व पुरेशा सोयी उपलब्ध होतील अशी खात्रीलायक तजवीज करण्यात यावी." सभापती महोदय, कलम 8 मध्ये असे म्हटले आहे की, शासन नियंत्रित उपक्रमातील सर्व क्षेत्रातील नोकर भरतीच्यावेळी संबंधित घटकांना लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधीत्व द्यावे." सभापती महोदय, पूर्ण नागपूर करार मी या ठिकाणी वाचत नाही. दिनांक 28/09/1953 रोजी हा नागपूर करार झालेला आहे. 1953 साली करार झाल्यानंतर या राज्याची वाटचाल सुरु झाली. सभापती महोदय, असे वाटले होते की, राज्यकर्ते या करारानुसार निधीचे समान आणि न्याय वाटप लोकसंख्येच्या प्रमाणात करतील. राज्याचा समतोल विकास घडवून आणतील मग तो सिंचनाच्या बाबतीत असेल, शिक्षणाच्या बाबतीत असेल, रस्त्याच्या बाबतीत असेल, आरोग्याच्या बाबतीत असेल किंवा उद्योगाच्या बाबतीत असेल हा विकास सर्व भागामध्ये समतोल होईल. अशी अपेक्षा त्यावेळी केली गेली.

सभापती महोदय, आज 50 वर्षे पूर्ण झाल्यानंतर ज्यावेळी आम्ही मागे वळून पहातो त्यावेळी यामध्ये प्रचंड अशी तफावत निर्माण झालेली दिसून येते. ज्यावेळी या विदर्भातील आत्महत्या वाढत गेल्या त्यावेळी या आत्महत्येची दखल या देशाच्या माननीय पंतप्रधांनानी घेतली. माननीय पंतप्रधान विदर्भात आले. दिनांक 1 जुलै, 2006 रोजी नागपूरला अधिकृत पत्रकार परिषद घेऊन अधिकृत वृत्तपत्रामध्ये निवेदन देऊन शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमुख कारण सिंचनाच्या असुविधा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर..

असल्याचे त्यांनी सांगितले व त्याकरिता आत्महत्याग्रस्त जिल्हयांसाठी घोषित केलेल्या पॅकेजमध्ये केवळ सिंचनासाठी 2177 कोटी रुपयांचा निधी माननीय पंतप्रधांनानी उपलब्ध करुन दिला. माननीय पंतप्रधांनानी शेतकरी का आत्महत्या करतो यावर नेमके बोट ठेवले आणि विदर्भाचा अनुशेष कसा दूर करता येईल याचे विचारमंथन करुन विदर्भासाठी पॅकेज घोषित केले. माननीय पंतप्रधानांनी पॅकेज घोषित केल्यानंतर श्रीमती मिश्रा समितीने देखील "सिंचनाच्या अपुऱ्या व्यवस्थेमुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या प्रमाणात वाढ होत असल्याचा अहवाल दिला." एवढयावरच त्या थांबल्या नाहीत तर "सिंचनाचा निधी राज्याच्या तुलनेत विदर्भाला नगण्य प्रमाणात देण्यात आला" असा स्पष्ट आरोप देखील राज्य शासनावर केला. हा आरोप मी केला नाही. माननीय पंतप्रधांनानी जी श्रीमती मिश्रा समिती नेमली होती त्या समितीने राज्य सरकारवर स्पष्ट आरोप केलेला आहे.

सभापती महोदय, आज जलसंपदा नियामक प्राधिकरणाच्या अहवालातून प्राप्त झालेली आकडेवारी, राज्य शासनाच्या डोळयात झणझणीत अंजन घालणारी आहे.

यानंतर श्री. बरवड.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

तसेच गेल्या दोन वर्षामध्ये राज्य शासनाच्या खोट्या दाव्यांना चपराक लावणारी आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाला दरवर्षी सिंचनाचा अनुशेष जाहीर करावा लागतो. तो करताना त्यांना खालील बाबींचा अभ्यास करावा लागतो. जिल्हा घटक धरुन प्रत्येक जिल्ह्याचा मोजण्यात आलेला अनुशेष, जिल्हा पेरणीखालील एकूण क्षेत्र व त्या तुलनेत निर्माण झालेली सिंचन क्षमता, राज्य सरासरीपेक्षा कमी असलेली टक्केवारी आणि हेक्टरामध्ये अनुशेष.

सभापती महोदय, माझ्याकडे जिल्हानिहाय आकडेवारी आहे पण ही आकडेवारी देऊन मी सभागृहाचा वेळ घेणार नाही. अमरावती विभागात जवळपास 31 लाख 37 हजार हेक्टर पेरणीलायक क्षेत्र आहे. त्यापैकी सिंचनाचे क्षेत्र फक्त 8 लाख 10 हजार हेक्टर आहे. नागपूर विभागाच्या बाबतीत आपण पाहिले तर नागपूर विभागामध्ये 19 लाख 69 हजार हेक्टर पेरणीलायक क्षेत्र आहे. त्यापैकी फक्त 10 लाख 84 हजार हेक्टर क्षेत्राला पाणी मिळते. विदर्भातील जवळपास 11 लाख हेक्टर जमीन सिंचनाअभावी पडून आहे. उपरोक्त परिस्थिती पाहिली तर स्पष्टपणे असे लक्षात येते की, विदर्भातील अमरावती विभागात जेमतेम 25.82 टक्के इतकी सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. अमरावती विभागातील पाचही जिल्ह्यातील 31 लाख 37 हजार हेक्टर जमिनीपैकी केवळ 8 लाख 10 हजार हेक्टर जमीन सिंचनाखाली आली. त्याच वेळेला कोल्हापूर जिल्ह्यातील सिंचनाखालील क्षेत्र 9 लाख 54 हजार हेक्टर एवढे आहे. म्हणजे आमच्या पश्चिम विदर्भ एकत्र केला तरी तेवढी सिंचन क्षमता पश्चिम महाराष्ट्रातील एका जिल्ह्याची आहे. पुणे विभागात 36 लाख 63 हजार हेक्टर जमिनीपैकी 35 लाख 30 हजार हेक्टर जमीन सिंचनाखाली आहे. हे खरे चित्र आहे.

सभापती महोदय, पश्चिम महाराष्ट्रातील जवळपास 96.37 टक्के जमीन सिंचनाखाली आली आहे तर अमरावती विभागातील पाचही जिल्ह्यातील सिंचन क्षमता पश्चिम महाराष्ट्रातील एका जिल्ह्याएवढी आहे. मी या ठिकाणी जिल्हावार आकडेवारी देणार नाही पण उदाहरण म्हणून मी बुलढाणा जिल्ह्याची आकडेवारी सांगतो. बुलढाणा जिल्ह्यामध्ये आज 4 मोठे प्रकल्प, 1 मध्यम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

प्रकल्प प्रगतिपथावर आहेत. त्यापैकी जिगाव प्रकल्प 1990 पासून सुरु झाला. हा मोठा प्रकल्प आहे. इतर प्रकल्प सुरु होऊन बराच काळ लोटलेला आहे. त्यामध्ये खडकपूर्णा, पेनटाकळी, वान या धरणांचा समावेश आहे. उतावळी हा एकमेव मध्यम प्रकल्प आहे. आज या सर्व प्रकल्पांची अद्ययावत किंमत 5756 कोटी रुपये आहे आणि या सर्व प्रकल्पांवर ऑक्टोबर, 2010 अखेर फक्त 1892 कोटी रुपये एवढा खर्च झालेला आहे. म्हणजे 3864 कोटी रुपये अद्याप या प्रकल्पाचे येणे बाकी आहे. लघु पाटबंधारे विभागाची सुध्दा तीच स्थिती आहे. बुलढाणा जिल्ह्यामध्ये 8 लघुपाटबंधारे प्रकल्प प्रगतिपथावर आहेत. त्यामध्ये मासरुळ, विद्रुपा, चौडी, निम्न ज्ञानगंगा, अरकचेरी, आलेवाडी, सारंगवाडी, दुर्गबोरी या प्रकल्पांचा समावेश आहे. या सर्व प्रकल्पांची अद्यायावत किंमत 231.79 कोटी रुपये आहे. त्यापैकी ऑक्टोबर, 2010 अखेर फक्त 21 कोटी रुपये खर्च झालेला आहे. अद्याप 210 कोटी रुपये खर्च झालेले नाहीत. चंदपूर पाटबंधारे मंडळामध्ये येणाऱ्या चंद्रपूर, वर्धा, गडचिरोली या जिल्ह्यांसाठी 1298 कोटी रुपये मंजूर केले परंतु प्रत्यक्षात 298 कोटी रुपये मिळाले. वर्धा जिल्ह्यामध्ये पोथरा नाला प्रकल्प आहे. त्या प्रकल्पाचा प्रलंबित निधी 28 कोटी 27 लाख रुपये आहे. लाल नाला प्रकल्पाचा प्रलंबित निधी 22 कोटी रुपये आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील पळसगाव आमडी सिंचन योजनेचा प्रलंबित निधी 69 कोटी रुपये आहे. बेंडारा मध्यम प्रकल्पाचा प्रलंबित निधी 137 कोटी रुपये आहे. बोरघाट सिंचन योजनेचा प्रलंबित निधी 98 कोटी रुपये आहे. गडचिरोली जिल्ह्यातील चिंचडोह बॅरेज प्रकल्पाचा 283 कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

परंतु एक छदाम दिलेला नाही.

गडचिरोली जिल्हयातील चिंचडोह प्रकल्पासाठी 283 कोटी रुपये मंजूर केले होते. परंतु त्याही प्रकल्पाला एकही छदाम दिलेला नाही. भंडारा जिल्हयातील एकही प्रकल्प पूर्ण झालेला नाही. नागपूर जिल्हयातील अनेक प्रकल्प अपूर्ण अवस्थेत आहेत. विदर्भात सिंचनाचा अनुशेष आधीच असताना सरकारने जलसंपत्ती नियमन प्राधिकरण कायदा 2005 अन्वये एक नवा अध्यादेश काढला असून त्या अध्यादेशानुसार विदर्भातील सिंचनाच्या नावाखाली सुरु केलेल्या योजनेतील पाण्याचा उपयोग शेतक-यांसाठी न होता आता त्या उद्योजकांना होणार आहे. त्याचे एकमेव उदाहरण सोफिया प्रकल्प हे आहे. सिंचन प्रकल्पाचे पाणी देताना पहिले प्राधान्य पिण्याच्या पाण्याला, दुसरे शेतीला व तिसरे उद्योगाला असे पुरोगामी महाराष्ट्राचे धोरण होते. परंतु जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाची स्थापन करुन धरणाच्या पाण्याचा प्राथम्यक्रम ठरविण्यासाठी एक उच्चाधिकार समिती नेमण्यात आली. त्या समितीच्या निर्णयाप्रमाणे पहिले प्राधान्य उद्योगाला, दुसरे पिण्याच्या पाण्याला व तिसरे शेतीला दिले गेले आहे. हा आदेश प्रगत विभागासाठी काढला असता तर आम्ही समजू शकलो असतो. हाच आदेश विदर्भाला, मराठवाडयाला सुध्दा लागू आहे. दोन्ही विभाग मागासलेले आहेत. म्हणजे या आदेशामुळे आमच्या भागातील सिंचन व्यवस्था थांबणार आहे. आमचे सिंचनाचे पाणी उद्योगाला दिले जाणार आहे. विदर्भातील 11 लाख हेक्टर सिंचनाच्या अनुशेषापैकी 7 लाख हेक्टरचा अनुशेष एकटया अमरावती विभागामध्ये आहे. असे असताना अप्पर वर्धा धरण झाले. या धरणामुळे अमरावती जिल्हयाला 50 हजार हेक्टर व वर्धा जिल्हयाला 25 हजार हेक्टर जमीन पाण्याखाली येणार होती. परंतु शासनाने अमरावती जिल्हयातील सिंचनासाठी राखीव असलेल्या साठयातून सोफियाला पाणी दिले.

सोफिया प्रकल्पाचा विषय मी यापूर्वीच मांडलेला आहे.त्याचा आज मी उल्लेख करणार नाही. परंतु शासनाने शेतक-यांची क्रूर थट्टा सुरु केली आहे. ज्या शेतक-यांनी या प्रकल्पासाठी आपली जमीन दिली, तो प्रकल्पग्रस्त झाला. भविष्यात आपल्या पिढीला पाणी मिळणार आहे म्हणून शेतक-यांनी जमीन दिली आहे. पाणी मिळाल्यामुळे बागायती पीक वाढेल, बागायतीमधून आपले उत्पन्न वाढणार अशी त्याची आशा होती, असे स्वप्न शेतकरी पहात होता. परंतु या धरणामुळे 23

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/

श्री.पांडुरंग फुंडकर.....

हजार 219 हेक्टर शेती सिंचनाखाली येणार होती ते पाणी या सोफिया प्रकल्पाला दिले जाणार आहे. म्हणजे उद्योगाला दिले जाणार आहे. या उद्योगामुळे काय परिणाम होणार आहे ते मी पुन्हा सांगणार नाही. या सोफिया प्रकल्पातून सुरुवातीला 'इंडिया बुल' या कंपनीने अशी जाहिरात केली की, या प्रकल्पामुळे 25 हजार लोकांना रोजगार मिळेल. आम्ही माहितीच्या अधिकाराखाली माहिती मिळविली आहे. त्यानुसार त्यांच्या प्रकल्प अहवालात रोजगार मिळणा-या कुशल व अकुशल कर्मचाऱ्यांची संख्या 370 एवढीच आहे. या उलट 36 हजार सिंचन क्षमता नष्ट झाली आहे. त्यामुळे 2 लाख लोक रोजगारापासून वंचित झालेले आहेत. या प्रकल्पामुळे भयंकर प्रदूषण निर्माण होऊन शेती बाधित होणार आहे व त्यातूनही हजारो शेतकरी उद्ध्वस्त होणार आहेत. विदर्भाच्या हक्काचा निधी पश्चिम महाराष्ट्रामध्ये वळविताना राज्य शासनाने इंग्रजांना सुध्दा लाज वाटेल इतकी विदर्भातील जनतेची लूट केलेली आहे. हे कमी आहे की काय म्हणून राज्य शासनाचे अधिकारी विदर्भाला मिळणा-या तुटपुंज्या निधीवरही दरोडा टाकत आहेत. कधी जोड प्रस्तावाच्या नावाखाली, कधी निविदांची रक्कम फुगवून तर कधी निकृष्ट दर्जाचे काम करुन कोटयवधी रुपयांचा भ्रष्टाचार विदर्भ पाटबंधारे विभागामध्ये चालू आहे.

यानंतर श्री.शिगम

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

एक तर पैसे मिळत नाहीत आणि मिळाले तरी शासनाचे अधिकारी त्यावर दरोडा टाकून तो पैसा लूटतात.

मी जिगाव प्रकल्पाचे उदाहरण देतो. एकदा रक्कम ठरवून काम दिले जाते, मग चार-सहा महिन्यांनी त्या कामामध्ये बदल करुन किंमत मूळ निविदेच्या दुपटीने-तिपटीने वाढवली जाते. अशा प्रकारे पैसे लुटण्याचा एक नवीन मार्ग शोधून काढलेला आहे. जिगाव प्रकल्प 1990मध्ये मंजूर झाला. त्यावेळी प्रकल्पाची किंमत 396 कोटी रु. होती. 2006मध्ये त्या प्रकल्पाची सुधारित किंमत 1221 कोटी रुपये झाली. त्यानंतर 4 वर्षांनी म्हणजे 2010मध्ये ती किंमत 4044 कोटी रुपये झाली. म्हणजे 396 कोटीच्या या प्रकल्पाची किंमत 10 वर्षामध्ये 4 हजार कोटीच्या वर गेली. ही किंमत एवढी कशी वाढली हे मंत्री महोदय तपासून घेणार आहेत काय ? या ठिकाणी मंत्री महोदय असे सांगतील की, सिंचनासाठी आम्ही विदर्भाला प्रचंड पैसा दिलेला आहे. सिंचनासाठी पैसा दिला असेल. परंतु अशा त-हेने प्रकल्पाच्या किंमती अवाढव्य वाढल्या असतील तर त्याची चौकशी केली पाहिजे. यामुळे आमचा अनुशेष कमी होऊ शकला नाही. आर्थिक अनुशेष भरुन काढण्याचा प्रयत्न झाला. परंतु भौतिक अनुशेष कमी झाला नाही. या जिगाव प्रकल्पामध्ये काय काय भानगडी सुरु आहेत याची जर मंत्री महोदयांनी चौकशी केली तर बरे होईल. या प्रकल्पामध्ये 12 उपसासिंचन योजना घेण्यात येणार आहेत. उपसा सिंचन योजनांसाठी लागणारे स्टील पाईप तिप्पट किंमत देऊन घेतलेले आहेत. पाईपचा दर 55 हजार रु. मे.टन आहे. या दराने पाईप न घेता ते 1.65 लाख रु. मे.टन दराने घेण्यात आले. एवढी किंमत देऊनही ते पाईप निकृष्ट दर्जाचे घेतले. या कामासाठी लागणा-या स्टीलचा दर 70 ते 80 हजार रु. मे.टन लावला असता तर मी ते ग्राह्य धरले असते. परंतु स्टीलचे दर दुपटीने लावण्यात आलेले आहेत. यामुळे घोटाळयाची रक्कम वाढली. उपसा सिंचन ग्रुप 1,मध्ये पंप गृहाचे बांधकाम ,उर्ध्वगामी नलिका पंपिंग मशिनरी, बांधकाम, वितरण कुंड, संतुलन जलाशयाची कामे करावयाची होती. यासाठी 263 कोटी 68 लाख रु.ची निविदा हैद्राबाद येथील एका कंपनीला देण्यात आली. मूळ निविदेमध्ये 18.4 टक्के वाढ करण्यात आली. त्यामुळे ही निविदा 318.22 कोटीवर गेली. अशा त-हेने प्रकल्पाची किंमत वाढत गेली.. मी मंत्री महोदयांना अशी विनंती करु इच्छितो की या जिगाव प्रकल्पामध्ये ज्या काही भानगडी सुरु आहेत त्याची चौकशी करावी. या जिगाव प्रकल्पासाठी आलेला पैसा झारीतील शुक्राचार्यामुळे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

दुसरीकडे चालला आहे.

सभापती महोदय, गोसीखुर्द प्रकल्पाची देखील हीच स्थिती आहे. 350 कोटीचा प्रकल्प 7700 कोटीचा झालेला आहे. या प्रकल्पाच्या डाव्या कालव्याची भिंत आता चक्क चालायला लागली आहे. या प्रकल्पाच्या डाव्या कालव्याची 300 मीटर लांबीची भिंत 1 ते 9 मीटर सरकलेल्या आहेत. अतिशय निकृष्ट दर्जाचे काम करण्यात आलेले आहे. कित्येक निविदा दरसूची पेक्षा जास्त दराने उघडण्यात आल्या तर सह निविदा चक्क दुप्पट दराने भरण्यात आल्या. यासंदर्भात चौकशी करण्याची गरज आहे. विदर्भात हजारो कोटी रुपयाचा अनुशेष असताना 2010मध्ये पाटबंधारे प्रकल्पासाठी 700 कोटी रुपयाची शासनाने तरतूद केली. असे वाटले होते की हा सर्व निधी विदर्भाच्या वाट्याला येईल. परंतु प्रत्यक्षात मात्र विदर्भाला 101.85 कोटी रुपये देऊन विदर्भाच्या जखमेवर मीट चोळण्यात आलेले आहे.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

सभापती महोदय, रोजगार निर्माण करणारा मिहान प्रकल्प आज रखडला आहे. या प्रकल्पासाठी शेतकऱ्यांची हजारो एकर जमीन कवडीमोल किंमतीने संपादित करण्यात आली. त्या ठिकाणी उद्योग येतील, उद्योगांचे जाळे निर्माण होईल असा देखावा उभा करण्यात आला. कुठे घोडे अडले? कोण आडवा आला? हे आम्हाला अद्याप समजलेले नाही. मिहान प्रकल्पामध्ये शेकडो तरुणांना रोजगार मिळेल असे सांगण्यात आले होते. उद्योग उभे राहतील असे सांगितले गेले. हा मिहान प्रकल्प आज रखडला आहे. विदर्भातील जनता या प्रकल्पाकडे डोळे लावून बसली आहे.

सभापती महोदय, विदर्भामध्ये रस्त्यांचा मोठया प्रमाणात अनुशेष आहे. रस्ते, आरोग्य, शिक्षण आदी अनेक विषयावर मला बोलावयाचे होते. परंतु आमचे सहकारी याठिकाणी आपले विचार मांडणार असल्यामुळे मी सर्वच विषयांवर बोलणार नाही. एकच विषय याठिकाणी मांडणार आहे. सभापती महोदय, 3 डिसेंबर, 2010 रोजी या सभागृहात अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीबद्दल चर्चा झाली. अवकाळी पावसामुळे विदर्भातील शेतकरी उद्ध्वस्त झाला. विदर्भातील संत्रा पीक वाया गेले. याठिकाणी राज्याचे शासन आल्यानंतर संत्रा बागायतदारांसाठी प्रत्येक अधिवेशनात काही ना काही घोषणा झाली. प्रत्येक अधिवेशनात नागपूर ही संत्रा नगरी आहे म्हणून राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी संत्रा बागायतदारांच्या दृष्टीने घोषणा केल्या होत्या. मी यासंबंधी भाष्य करणार नाही. परंतु जे प्रश्न मांडणार आहे त्या प्रश्नाबाबत मंत्रीमहोदयांनी उत्तर दिले तर मला वाटते की, संत्रा बागायतदारांना निश्चितच दिलासा मिळेल. काटोल, वरुड, मोर्शी आणि पेठ येथील संत्रा प्रक्रिया प्रकल्प का उभे राहिले नाहीत? नांदगाव पेठ, कारंजा घाडगे येथे संत्रा निर्यात केंद्र उभारण्याची घोषणा झाली. केंद्राने घोषित केलेल्या डाळिंबावरील पेऱ्याच्या डिंक्या रोगावरील अनुदान का दिले गेले नाही? सूक्ष्म सिंचनासाठी 75 ते 90 टक्के अनुदानाचे काय झाले? हवामानावर आधारित पिकांमध्ये संत्रा पिकाचा समावेश का झाला नाही? दुष्काळ, अवकाळी परिस्थितीमुळे नुकसान झालेल्या संत्रा उत्पादकांना मदत का दिली नाही? आजपर्यंत संत्रा फळाचा एकही कंटेनर निर्यात का झाला नाही? संत्रा पिकाला आजपर्यंत एकही पॅकेज का मिळाले नाही? संत्रा उत्पादकांचा आजपर्यंत एकही अभ्यास दौरा का झाला नाही? विदर्भातील शेतकऱ्यांचे मुख्य पीक असलेल्या संत्र्याचे लागवड क्षेत्र का वाढले नाही? ऑरेंज सिटी म्हणून बहुमान असलेल्या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

नागपूरमधील एकमेव नागपूरच्या प्राथमिक प्रतिकृतीची दुरवस्था का व्हावी? संत्र्यावरील एकही शेतकऱ्यांच्या दृष्टीने उपयोगी संशोधन का झाले नाही? या प्रश्नांची उत्तरे मंत्रीमहोदयांनी द्यावीत अशी विनंती करतो. अवकाळी पावसासंबंधी जशी महाराष्ट्रातील नुकसानीची चर्चा झाली तशी विदर्भातील नुकसानीची देखील चर्चा झाली. विदर्भातील कापसाचे पीक नष्ट झाले. विदर्भातील ज्वारीचे पीक, सोयाबीनचे पीक वाया गेले. केवळ चर्चा झाली आणि शासनाने घोषित केले की, आम्ही पंचनामे मागवित आहोत. 12 डिसेंबरपर्यंत पचनामे येतील आणि त्याच दिवशी सरकार आपले धोरण जाहीर करील असे सांगितले गेले. सभापती महोदय, आज अधिवेशन संपणार आहे. 1000 कोटी रुपयांच्या पॅकेजचा ब्रेकअप काय राहणार आहे? द्राक्ष बागायतदारांना शासनाने मदत केली तशी मदत संत्रा बागायतदारांना करणार आहात काय? खरे म्हणजे अधिवेशन संपण्यापूर्वी ही मदत जाहीर झाली पाहिजे. विदर्भातील शेतकरी अधिवेशनाच्या निमित्ताने जाहीर होणाऱ्या निर्णयाच्या अपेक्षेत आहेत. पंचनामे योग्यरित्या झाले की नाहीत? शासनाने काही ठिकाणी निर्देश दिले की, ज्वारी पिकाचे पंचनामे करु नका. फक्त हरभरा, गहू पिकाचे पंचनामे करा. सर्वच पीक नष्ट झाले आहे. याठिकाणी माननीय उपमुख्यमंत्री उपस्थित आहेत. पंचनामे योग्य पध्दतीने झाले नसतील तर फेर पंचनामे करण्यात यावेत. 1000 कोटी रुपयांचे अनुदान शेतकऱ्यांना कोणत्या पध्दतीने दिले जाणार आहे याचा ब्रेकअप जाहीर करावा.

माननीय उपमुख्यमंत्री महोदयांना मी विनंती करतो की, विदर्भातील शेतकरी पुन्हा एकदा उद्ध्वस्त झाला आहे. तो विजेचे बिल भरु शकत नाही.

नंतर 2वाय.1..

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी नोंद

श्री. पांडुरंग फुंडकर .....

विदर्भातील शेतकरी अवकाळी पावसामुळे नुकसान झाल्यामुळे, सिंचनाची सोय नाही म्हणून हतबल झालेला आहे. त्यानी विजेची बिले भरली नाही म्हणून कनेक्शन्स तोडण्यात आली त्यांना विजेची बिले माफ न करता फक्त सवलत द्यावी आणि तोडलेली कनेक्शन्स पुन्हा चार-पाच महिन्यासाठी तरी जोडून द्यावीत अशी मी विनंती करतो. माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सभागृहात घोषणा केल्यानंतर अधिकाऱ्यांनी मात्र आदेश दिले की चालू बिले भरल्याशिवाय कोणाचेही कनेक्शन जोडले जाणार नाही. शासन आता तरी ताबडतोब हे कनेक्शन जोडण्याबाबत आदेश देणार आहे काय ? या विषयावर बोलण्यासारखे खूप आहे परंतु हा विषय आता चावून चावून चोथा झालेला आहे. कारण प्रत्येक अधिवेशनात विदर्भातील अनुशेषावर चर्चा, मागासलेपणावर चर्चा होत असते आणि पदरात मात्र काहीच पडत नाही. आजही तीच परिस्थिती आहे. अधिवेशनाचा तीन आठवड्यांचा कालावधी उलटून गेला पण फलित मात्र काहीच झाले नाही अशी विदर्भाची उपेक्षा चालू आहे. अशा प्रकारे हे शासन विदर्भाचा किती अंत पाहणार आहे हा महत्वाचा प्रश्न आहे. आता तर विदर्भाच्या सहनशीलतेचा अंत संपत आलेला आहे आणि त्यातूनच वेगळ्या विदर्भाची भावना निर्माण होत आहे. म्हणून मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, आपण सभागृहात अगोदर जे बोललात त्यावरच ठाम रहावे आणि विदर्भातील शेतकऱ्यांना न्याय द्यावा. मागच्यासारखे पुन्हा करु नका एवढेच सांगतो आणि माझे भाषण संपवितो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी विदर्भातील विविध प्रश्नांबाबत जो प्रस्ताव येथे चर्चेसाठी आणला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय जलसंपदा मंत्री येथे बसलेले आहेत. बाकीच्या विषयांची सुध्दा चर्चा सभागृहात होणारच आहे, त्यामुळे मला माहीत नाही की त्या विषयांवर कोणते मंत्री महोदय उत्तर देणार आहेत. कारण कोणीही टिप्पण वगैरे घेताना मला दिसत नाही. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर मिळाले पाहिजे अशी अपेक्षा नाही परंतु निदान शासनाचे त्यासंदर्भातील धोरण तरी समजले पाहिजे एवढीच अपेक्षा करतो. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी राज्यातील मुख्यत: विदर्भातील सिंचनावर आपली मते प्रदर्शित केली तसेच मिहान प्रकल्पाबाबत सुध्दा त्यांनी अनेक गोष्टी जाता जाता सांगितल्या. त्या विषयांवर मी बोलणार नाही. प्रत्येक अधिवेशनात नागपूरला वेगवेगळ्या विषयांवर चर्चा होते पण त्या चर्चेतून फलित मात्र काहीच निघत नाही. या चर्चेतून तरी विदर्भातील जनतेला विश्वास मिळेल काय असा माझा मंत्री महोदयांना सवाल आहे. विदर्भाला निधी दिला जाईल, त्याला कट लागणार नाही, याची हमी हे शासन देणार आहे काय ? येणाऱ्या अर्थसंकल्पामध्ये इतर विभागाबरोबरच विदर्भालाही न्याय मिळणार आहे काय ? याचाही खुलासा उत्तरातून होणे आवश्यक आहे. विशेष करुन बेरोजगारी, आरोग्य, शिक्षण आणि रस्ते असे अनेक विषय या विषयात अंतर्भूत आहेत. विदर्भातील आदिवासी हा आजही उपेक्षितच आहे असे म्हटले तर चुकीचे होणार नाही.

सन 1976 पासून सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत अनेक योजना राबविण्यात आल्या पण तरी देखील आरोग्याचा अनुशेष मात्र दूर होत नाही. सिव्हील हॉस्पिटल, प्राथमिक आरोग्य केंद्र ते उपकेंद्र यांच्या बाबतीत तर प्रचंड अनास्था दिसून येत आहे आणि त्याची उदासीनताही जाणवते. आजच माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, आम्ही आरोग्य विभागातील रिक्त पदे भरु. पण उदाहरण म्हणून मी सांगणार आहे की, गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड ग्रामीण रुग्णालयात 25 पदे मंजूर असून त्यापैकी फक्त 13 पदेच भरण्यात आली व 12 पदे अजूनही रिक्त आहेत. वैद्यकीय शिक्षण सहाय्यक, अधीक्षक ही पदे सुध्दा रिक्त आहेत.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. रमेश शेंडगे)

डॉ.दीपक सावंत ....

सभापती महोदय, सिरोंचा ग्रामीण रुग्णालयातील 36 पदांपैकी 7 पदे रिक्त आहेत. या ठिकाणच्या वैद्यकीय अधीक्षकाचे पद तर हे रुग्णालय सुरु झाल्यापासून भरण्यात आलेले नाही. अहेरी उप जिल्हा रुग्णालयात विषय तज्ज्ञ, परिसेविका, अधिपरिचारिका, शल्य चिकित्सक, नेत्रचिकित्सक, बधिरीकरण तज्ज्ञ, ऑर्थोपेडीक तज्ज्ञांची पदे रिक्त आहेत. एटापल्ली येथील ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी वर्ग -1 चे पद कायम रिक्त असल्यामुळे या ठिकाणी 11 खाजगी डॉक्टर्स आपले दुकान जोमाने चालवित आहेत. मूलचेरा ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिका-यांसह 10 पदे रिक्त आहेत. हे रुग्णालय 30 खाटांचे असले तरी या ठिकाणी केवळ 12 खाटा ऑपरेटीव्ह आहेत. कुरखेडा उपजिल्हा रुग्णालयामध्ये वैद्यकीय अधीक्षकाचे पद रिक्त आहे. या ठिकाणच्या 8 अधिका-यांपैकी 5 पदे रिक्त आहेत. तसेच वैद्यकीय तज्ज्ञांची पदे सुध्दा रिक्त असल्यामुळे ब्रम्हपुरीच्या खाजगी रुग्णालयामध्ये रुग्णांना जावे लागत आहे. धानोरा येथील ग्रामीण रुग्णालयात 15 वर्षापासून वैद्यकीय अधिका-याचे पद रिक्त आहे. गडचिरोली जिल्हयातील 12 ग्रामीण रुग्णालयांपैकी 8 रुग्णालयात बालरोग तज्ज्ञ आणि 11 रुग्णालयात स्त्री रोग तज्ज्ञ, भूल तज्ज्ञांची पदे रिक्त आहेत. गडचिरोली जिल्हयात जी भयानक परिस्थिती आहे तशीच परिस्थिती यवतमाळ जिल्हयाची देखील आहे. यापेक्षाही महत्वाचे म्हणजे या ठिकाणी एड्सचे रुग्ण फार मोठया प्रमाणात आढळून आलेले आहेत. राज्यामध्ये 98 हजार एड्सचे रुग्ण आहे असे म्हटले जाते. परंतु मी आपल्याला सांगू इच्छितो की, नागपूर जिल्हयामध्ये 430, चंद्रपूर जिल्हयामध्ये 230, यवतमाळ जिल्हयामध्ये 87, अकोला जिल्हयामध्ये 67 व गोंदिया जिल्हयामध्ये 69 रुग्ण एड्समुळे दगावले गेले आहेत. विदर्भातील नागपूर, चंद्रपूर हे जिल्हे एडस्साठी संवेदनशील मानले गेले आहेत. गडचिरोलीमधील 30 आरोग्य पथकाचे प्राथमिक आरोग्य केंद्रात रुपांतर होणे आवश्यक होते ते आज रखडले गेले आहे. निकषाप्रमाणे हे पाच वर्षापूर्वीच होणे आवश्यक होते. परंतु आजपर्यंत या आरोग्य पथकांचे प्राथमिक आरोग्य केंद्रात रुपांतर झालेले नाही. कूरखेडा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत ....

तालुक्यातील देऊळगाव, एटापल्ली अशा अनेक ठिकाणच्या आरोग्य पथकाचे आरोग्य केंद्रात रुपांतर होणे बाकी आहे. अधिवेशनात नेहमीच मेयो इस्पितळाचा प्रश्न उपस्थित होत असतो. नागपूर जीएमसीचा प्रश्न देखील उपस्थित होत असतो. परंतु पुढील येणा-या वर्षात नागपूर मेडीकल कॉलेजमधील 40 एमबीबीएसच्या जागा धोक्यात आलेल्या आहेत याची आपल्याला कल्पना आहे काय? यासंदर्भात आपण कोर्टामध्ये एमसीआय दाखल केलेले आहे. पुढील वर्षापर्यंत या जागा रेग्युलराईज करुन घेऊ व त्यांना आवश्यक असलेले इन्फ्रास्ट्रक्सर्स तयार करुन देऊ असे सांगण्यात आले होते. परंतु यासाठी शासनाने काहीही केलेले नाही ही वस्तुस्थिती आहे. कोर्टामध्ये या विषयाच्या संदर्भात पुन्हा एकदा प्रतिज्ञापत्र आपण देणार आहात काय ? आर्थोपेडीक आणि रेडीऑलॉजीच्या पीजीच्या दोन जागा डिरेकगनाईज झालेल्या आहेत. येथून पीजीची डीग्री घेणा-या विद्यार्थ्यांना महाराष्ट्राच्या बाहेर जाऊन प्रॅक्टीस करता येत नाही ही वस्तुस्थिती आहे. आपण या जिल्हयातील आहात, जीएमसी आपल्या बाजूला आहे, मेयो इस्पितळ आपल्या बाजूला आहे. यांचा आपण कधी तरी विचार करणार आहात काय ? मेयोमध्ये गेल्या 17 वर्षापासून एकही नवीन विभाग तयार झाला नाही. 17 वर्षापूर्वी मा. अंतुले साहेबांनी त्यावेळी विभाग केले होते. या इस्पितळाची स्वायत्ता अजूनही अधांतरीच आहे. मघाशी विचारण्यात आले होते की, 150 कोटी रुपये यासाठी आले होते त्यातील 25 कोटी रुपयांचे काय केले ? परंतु माननीय मंत्रीमहोदयांकडे यासंदर्भात काहीही उत्तर नाही. मेयोमध्ये अनेक त्रुटी आहेत. या ठिकाणी साधे साधी साधी औषधेही मिळत नाही.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.....

रुग्णालयातील 40 टक्के औषधे रेट कॉन्ट्रॅक्टवर नाहीत. ही परिस्थिती अमरावती, गडचिरोली आणि इतर जिल्ह्यात देखील आहे. तेथील डॉक्टर्स लोकांना चिठ्ठी देऊन बाहेरुन औषधे घेण्यास सांगतात. सरकारचे विदर्भाच्या प्रश्नावर अशा प्रकारे उदासीनतेचे धोरण असेल तर याठिकाणी केलेली चर्चा वांझोटी होईल आणि त्यातून काहीही निष्पन्न होणार नाही. तशीच परिस्थिती मेळघाट परिसरातील कुपोषणाच्या संदर्भात आहे. आपण अतिशय पोटतिडकीने आणि आक्रमकतेने येथे विषय मांडतो.परंतु त्याचे सरकारला काहीही सोयरसूतक नाही इतके सरकार असंवेदनशील बनले आहे.

सभापती महोदय, दाईकिटच्या संदर्भातील सी.आय.डी.अहवाल अजूनही सभागृहासमोर ठेवण्यात आलेला नाही हे दुर्दैव आहे. दाई किट प्रकरणामध्ये जे काही घडले त्याची दाहकता आम्हाला जाणवली आहे असे सांगून माननीय गृहमंत्र्यांनी पुढील अधिवेशनात हा अहवाल ठेवण्यात येईल असे सांगितले. परंतु आजपर्यंत तो अहवाल सभागृहासमोर आलेला नाही. आम्ही हा प्रश्न विशेष उल्लेख, औचित्याचा मुद्दा इत्यादी आयुधांद्वारा उपस्थित केला, परंतु त्याबाबत पुढे कोणतीही कार्यवाही झालेली नाही. आज अनेक भागांत बालके मरत आहेत. रोगी दगावत आहेत.परंतु सरकारला त्याचे काहीही वाटत नाही.

सभापती महोदय, आजच्या लोकमत वर्तमानपत्रात बातमी आहे की, गोंदिया जिल्ह्यातील लाखो रुपयांचे सिकलसेल एनिमियाचे किटट वाया जाणार आहेत. या सिकलसेल किटचे वाटप झालेले नाही. सरकारची इतकी अनास्था असेल तर माणसांनी जगायचे कसे ? विदर्भात सिकल सेल एनिमिया हा एक मोठा प्रश्न आहे. पण तो सोडविण्याबाबत सरकार उदासीन आहे.

सभापती महोदय, दोन दिवसांपूर्वी याठिकाणी फ्लोराईडयुक्त पाण्याचा प्रश्न उपस्थित झाला. आज सर्वत्र फ्लोराईडयुक्त पाणी येत आहे. याबाबत सरकारकडे कोणतेही उत्तर नाही. सरकार या प्रश्नावर कायम स्वरुपी कोणतीच उपाययोजना करीत नाही.सरकार म्हणते पाणी फ्लोराईडयुक्त आहे, आम्ही काय करणार ? माणसे मरत आहेत,त्याचे सरकारला काही नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.....

तिच गोष्ट फायलेरिया बाबत आहे... श्री.रणजित कांबळे आपल्याकडे सार्वजनिक आरोग्य विभागाचा कार्यभार असताना आम्ही ओरडून ओरडून थकलो, पण आपण काही केले नाही. म्हणून आपले खाते बदलण्यात आले आहे.... सभापती महोदय, एन.आर.एच.एम.अंतर्गत सिकलसेलचे कीट घेण्यात आले. विदर्भात सिकलसेलचा आजार मोठ्या प्रमाणावर आहे. परंतु हे सरकार काहीच करु शकत नाही.

सभापती महोदय, शिक्षणा विषयी देखील अशीच परिस्थिती आहे. तरुण पदवी घेत आहेत परंतु ते बेरोजगारीच्या गर्तेत सापडत आहेत. राज्यातील बेरोजगारांना कधी रोजगार उपलब्ध होणार आहे ? गेल्या आठ वर्षात फक्त 535 लोकांना रोजगार देऊ शकलात. विदर्भात एस.ई.झेड, मिहान सारखे प्रकल्प आले. पण या प्रकल्पांमुळे काय झाले ? फक्त शेतकऱ्यांच्या जमिनी गेल्या आणि ते प्रकल्पग्रस्त झाले. गोसीखुर्द प्रकल्पामध्ये बाधित झालेल्यांचे आपण अजूनही पुनर्वसन करु शकलो नाही. याठिकाणी कार्गोहब झाल्यास येथील लोकांना भरपूर नोकऱ्या मिळतील असे वाटले होते. पण काय झाले, 2018 पर्यंत 1 लाख लोकांना रोजगार मिळेल असे सांगितले होते. आपण सन 2010 च्या शेवटच्या महिन्यात आहोत. आपण आतापर्यंत फक्त 535 लोकांना रोजगार देऊ शकलो. सन्माननीय शिक्षण मंत्री श्री.राजेंद्र दर्डा यांनी सांगितले की, आता शिक्षणाचा आलेख चौफेर वाढणार आहे. त्यांना घोषणा करायला काय जाते ? आज विदर्भामध्ये शिक्षणाची काय परिस्थिती आहे, आज विदर्भातील किती आय.टी.आय. बंद झाल्या, किती शाळांमध्ये शिक्षक नाहीत ? आपण या सर्व विषयांवर येथे चर्चा केली.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत ...

राज्यातील आश्रमशाळांची काय परिस्थिती आहे ? श्री.खोब्रागडे यांनी 90 आदिवासींच्या आश्रमशाळा रद्द केल्या त्यातील 50 आश्रमशाळा विदर्भातील आहेत.ज्या आश्रमशाळा सुरु आहे त्यामध्ये सुध्दा विद्यार्थ्यांना काय दिले जाते ? विद्यार्थ्यांना चांगला गणवेश दिला जात नाही. एका गणवेशासाठी 135 रुपये दिले जातात त्यामध्ये वर्षातून फक्त एक गणवेश घेतला जातो. या विद्यार्थ्यांनी एकच गणवेश वारंवार धुवून वापरावयाचा काय ? पूरक पोषण आहाराचीसुध्दा तीच परिस्थिती आहे. विद्यार्थ्यांना देण्यात येणारी खिचडी निकृष्ट दर्जाची असते एका आश्रमशाळेत खिचडीतून साप शिजवला गेला व त्यामुळे या विद्यार्थ्यांना विषबाधा झाली होती. आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना औषधे , गणवेश,पुस्तके वहया इत्यादी राज्य सरकारकडून दिले जात नाही तर केन्द्र सरकारच्या सर्व शिक्षा अभियानातून यासाठी पैसे येतात. विद्यार्थ्यांना ब्लॅकेट, लोकरीचे कपडे आणि बूट द्यावयास पाहिजे परंतु विद्यार्थ्यांना ते दिले जात नाहीत. एका तरी विद्यार्थ्याला लोकरीचे कपडे ब्लॅकेट वा बूट दिलेले आहे असे मला आपण दाखवून द्यावे. फाटलेले कपडे घालून आश्रमशाळेतील हे विद्यार्थी दिवस कंठत असतात. फाटलेल्या बिछान्यावर त्यांना झोपावे लागते. त्याची साईजसुध्दा आता कमी करण्यात आलेली आहे या विद्यार्थ्यांना जी ट्रंक देण्यात आलेली आहे त्याचा पत्रा निकृष्ट असल्यामुळे त्यावर बसल्यानंतर तो पत्रा खाली जातो.या आश्रमशाळा म्हणजे कोंडवाडाच आहे.या आश्रमशाळासाठी जमिनी नाहीत त्यामुळे इमारती बांधता येत नाहीत. अनेक ठिकाणी भाडयाच्या इमारती घेतल्या जातात व आश्रमशाळा चालविल्या जातात. अनेक आश्रमशाळाच्या इमारतीवर कौले नाहीत,त्यामुळे तेथून पाणी गळते, काही इमारतीच्या खिडक्यांना तावदाने नसल्यामुळे तेथून पाऊस येतो त्यामुळे विद्यार्थी कुडकुडत पेटीवर बसतात आणि कशी तरी रात्र काढतात. रात्रीच्या वेळी एखादा साप जर इमारतीमध्ये आला व तो जर विद्यार्थ्यांना चावला तर सर्पदंश होऊन विद्यार्थ्याचा मृत्यू होतो.

तालिका सभापती : सभागृहाची वेळ 4.00 वाजेपर्यंत होती.या प्रस्तावावरील चर्चा संपेपर्यंत सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे.

डॉ.नीलम गो-हे : माझा हरकतीचा मुद्दा आहे. वेळे अभावी आम्हाला बोलता येणार नाही. परंतु समाजामध्ये, विदर्भामध्ये आणि माध्यमामध्ये अशी चर्चा होईल की विदर्भाच्या प्रश्नावर बोलण्यासाठी लोकप्रतिनिधी उदासीन आहेत. पंरतु तसे नाही. वेळ नसल्यामुळे आम्ही बोलत नाही अन्यथा या प्रस्तावावर बोलण्याची आमची देखील इच्छा आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई् जगताप :गट नेत्यांची बैठक बोलाविण्यात आली होती व त्यामध्ये जे ठरले होते त्यानुसार तालिका सभापतींनी सांगितले आहे हे सन्माननीय सदस्यांनी लक्षात घ्यावे.

डॉ.दीपक सावंत :राज्यातील शाळांची परिस्थिती अत्यंत वाईट आहे. विदर्भामध्ये एक शिक्षकी शाळा किती आहेत याचा आकडा सांगण्यात यावा. शिक्षकांचे पगार दिले जात नाहीत त्यांचे पगार रखडले जातात,अनेक शाळांमध्ये पुरेसे शिक्षक नाहीत.मेळघाटमध्ये सायन्स कॉलेज असून त्याठिकाणी शिक्षक नाहीत. त्याचबरोबर या कॉलेजमध्ये प्रयोगशाळा देखील नाही... अडथळा ..या प्रस्तावावर मला पुष्कळ बोलावयाचे आहे. आमच्या पक्षाच्या वतीने फक्त मी एकच सदस्य बोलणार आहे त्यामुळे मला या प्रस्तावावर बोलू द्यावे. किती ठिकाणी प्रकल्प अधिकारी नाहीत आणि किती कालावधीपासून नाहीत, याची मी आपल्याला माहिती देतो.पांढरकवडा येथे आयएएस प्रकल्प अधिकारी आलाच नाही.भामरागड आणि गडचिरोली येथे 1 वर्ष 5 महिने 6 दिवस,अहिरी येथे 2 महिने 15 दिवस,धारणीमध्ये 8 महिने 16 दिवस प्रकल्प अधिकारी नव्हते. संपूर्ण विदर्भामध्ये मुलांसाठी वसतीगृहे नाहीत, मुलींच्या वसतीगृहाची परिस्थिती तर अत्यंत दयनीय आहे. सॅनिटरी नॅपकीन्सच्या खरेदीमध्ये मोठया प्रमाणावर घोटाळा झाला असून त्यासंदर्भात या सभागृहात सांगावयाला देखील मला लाज वाटत आहे. सॅनिटरी नॅपकीन्सच्या खरेदीमध्ये घोटाळा करणे ही बाब राज्य सरकारला लाच्छंनास्पद आहे.महिलांसाठी व बालकांसाठी धोरण राबविण्यात येत आहे परंतु त्या संदर्भातील सत्य स्थिती काय आहे हे एकदा बाहेर येणे आवश्यक आहे.

सभापती महोदय,आणखी एक भ्रष्टाचाराचे मी उदाहरण देणार आहे.अमरावती जिल्हयातील चिखलदरा तालुक्यातील आदिवासी विकास कार्यालयातर्फे रोपे वाटली गेली. आदिवासीच्या घरात किचन गार्डन करणे ही संकल्पना किती चांगली आहे.

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत...

सभापती महोदय,किचन गार्डन बनविण्यासाठी 7 कोटी रुपये दिले, परंतु किचन गार्डन कोठेही झाले नाही. या मैत्री संस्थेची ज्यावेळी चौकशी सुरु झाली त्यावेळी या संस्थेचे लोक आदिवासी लोकांकडून लिहून घेत आहे की, तुमच्या किचन गार्डनसाठी आम्ही तुम्हाला रोपटी दिली. अशाप्रकारे ही मैत्री संस्था सर्वत्र फिरत आहे आणि आदिवासींकडून खोटे दाखले घेत आहे. तुम्ही आदिवासींकरिता असलेला पैसा सुध्दा खात आहात. आदर्शमध्ये तर घोटाळा केलात आणि आता आपले प्रकल्प अधिकारी सुध्दा या गरिबांचा पैसा खात आहेत. सभापती महोदय, खोटरे नावाच्या एका अधिकाऱ्याकडे दोन अधिकाऱ्यांचा चार्ज आहे. त्याठिकाणी वन खात्याचा अधिकारी आज प्रकल्प अधिकारी म्हणून काम करीत आहे. या अधिकाऱ्याने दि.27.4.2010 आणि दि.5.6.2010 रोजी 1800 सामुदायिक विवाह लावले आणि 54 लाख रुपयांचा अपहार केला. त्या अधिकाऱ्यावर कारवाई झाली तर या विदर्भाच्या प्रश्नावरील चर्चेला अर्थ आहे.

सभापती महोदय, मी शेवटचा मुद्दा मांडून माझे भाषण संपवितो. आज विदर्भातील आत्महत्त्याग्रस्त शेतकऱ्यांच्या पाल्यांना शैक्षणिक निधी देतो. त्यामध्ये पॅकेज अंतर्गत येणाऱ्या शेतकऱ्यांच्या पाल्यांना इयत्ता 10 वी, 12 वीच्या परीक्षा शुल्काचा परतावा देणे, तसेच प्रत्येक विद्यार्थ्याला वह्या-पुस्तके इत्यादी किरकोळ खर्चासाठी 500 रुपये वार्षिक अनुदान देणे ही योजना आपण इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी लागू केली आहे. परंतु आज राज्य शासनाने या योजनेसाठी अनुदान दिले नाही. तुम्ही घोषणा करता तर मग अनुदान कां देत नाही? शेतकरी आत्महत्त्या करीत आहेत, त्यांच्या पाल्यांच्या शिक्षणाचा खर्च तुम्ही उचलित आहात, त्याबाबतची घोषणा फक्त हवेतच विरते. सभापती महोदय, मला अतिशय विमनस्क मनस्थितीत या विदर्भामधील अधिवेशन आज शेवटच्या दिवशी संपतांना सांगावयाचे आहे की, जर तुम्हाला खरोखरच या विदर्भातील जनतेला न्याय मिळाला पाहिजे असे वाटत असेल तर येणाऱ्या आगामी अर्थसंकल्पामध्ये याकरिता भरीव तरतूद करा आणि या आदिवासींकरिता असलेल्या योजनांवर करण्यात येणाऱ्या खर्चावर नियंत्रण ठेवण्याकरिता एक मॉनिटरींग समिती नेमा. याकरिता आपण आय.ए.एस. अधिकाऱ्यांची समिती नेमू नका. मी याठिकाणी आदिवासींच्या मांडलेल्या व्यथा जर आपणास जवळून पहावयाच्या असतील तर आपण माझ्याबरोबर विदर्भातील मेळघाटच्या आदिवासी भागामध्ये चला. त्याठिकाणी मी आपल्याला "याचि देही, याची डोळा" दाखवितो. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

जय हिंद, जय महाराष्ट्र.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी नियम 260 अन्वये मांडलेल्या ठरावावर माझे विचार व्यक्त करण्याकरिता मी उभी आहे.

सभापती महोदय, माझे याठिकाणी असे मत बनले आहे की, हे सरकार खरेच गंभीर आहे काय? आम्ही या सभागृहामध्ये पोटतिडिकीने विषय मांडीत असतो त्यावर तरी आपण गंभीर असता काय? मघाशी माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत हे पोटतिडिकीने आपले म्हणणे मांडीत होते. त्यावेळी समोरच्या बाजूला मंत्रिमहोदय आपापसात बोलून हसत होते. अशाप्रकारे जर या विदर्भाचे हसे करावयाचे असेल तर आम्ही या प्रस्तावावर कशासाठी बोलायचे? आम्ही या सभागृहामध्ये वर्षानुवर्षे बोलत रहायचे, परंतु तुम्ही आम्हाला काहीही द्यावयाचे नाही. श्रीमंताच्या दारात गेले तर गरिबाला दान मिळत नाही तर मान कोठून मिळणार आहे? म्हणून या सभागृहामध्ये आम्ही जे बोलतो ते आपण कमीत कमी ऐकून घ्यावे. एकदा तरी आपण संवेदनशील होऊन या विदर्भाकडे नजर द्यावी एवढेच माझे म्हणणे आहे. सभापती महोदय, "विदर्भाच्या दारी पोरं विकासापायी झुरे, पश्चिम महाराष्ट्राची पोरं झुल्यावरी झुले, श्रीमंताच्या दारी हत्ती मात्र डुले, विदर्भाचा भाऊ माझा फासावरी झुले" एवढया तरी संवेदना तुम्हाला नसतील तर आम्ही याठिकाणी बोलण्याऐवजी बाहेर बोललेले जास्त चांगले होईल. आपण अनुशेषावर बोलत असतांना हे सरकार माननीय राज्यपालांनी दिलेले आदेश तरी पाळीत आहे काय? माननीय राज्यपालांनी दिनांक 6 मार्च 2008 रोजी सिंचन क्षेत्राकरिता जे निदेश निर्गमित केले, त्यामधील परिच्छेद 7.8 प्रमाणे महाराष्ट्र राज्याकरिता गोदावरी खोऱ्यामध्ये उपलब्ध असलेल्या एकूण पाण्यापैकी जवळपास 203 टीएमसी पाणी अडविण्याचे अद्यापही नियोजन झाले नाही. माननीय राज्यपालांनी विदर्भाकरिता आदेश देऊन सुध्दा जर सरकार काम करीत नसेल तर...

(अपूर्ण - यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस....

हे सरकार निर्ढावलेले आहे. गेंडयाचे कातडे पांघरलेले आहे असे म्हटले तर त्यात वावगे होणार नाही. सभापती महोदय, वैनगंगा - प्राणहिता 380 अब्ज घनफुट पाणी. पैनगंगा - 104 अब्ज घनफुट पाणी. वर्धा 148 अब्ज घनफुट पाणी, इंदावती 41 अब्ज घनफुट पाणी, निम्न गोदावरी 1 अब्ज घनफुट पाणी, खडकपूर्णा 10 अब्ज घनफुट पाणी अशी एकूण 677 अब्ज घनफुट पाणी इतकी विदर्भातील सिचंन क्षमता आहे पण त्याच्यावर एकही प्रकल्प अद्याप उभा झालेला नाही. विदर्भाचा पैसा पळवला, विदर्भाच्या योजना पळवल्या, विदर्भाच्या कच्या मालावर इतर ठिकाणी मोठे उद्योग उभे राहिले. आता मात्र या विदर्भाच्या पाण्यावर पश्चिम महाराष्ट्राचा डोळा आहे. शासनाचा डोळा आहे, असे म्हटले तर काही वावगे होणार नाही. विदर्भात असलेले पाणी नेण्याची तयारी दर्शविली आहे.त्याच्याकरिताच 210 चा अध्यादेश काढला आहे. त्यातून खऱ्या अर्थाने विदर्भाला लुटण्याचे काम करण्यात येणार आहे.

सभापती महोदय, नदीजोड प्रकल्पाच्या नावाखाली विदर्भातील पाण्यावर मोठया प्रमाणात दरोडा टाकण्यात येत आहे असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. वैनगंगा नदीचे पाणी मांजरा खोऱ्यात टाकून ते पाणी मराठवाडयात नेण्याचा शासनाने प्रयत्न केला. नॅशनल वॉटर डेव्हलपमेंट एजन्सीने त्याला विरोध केला आणि ते फिजिबल नाही असे सांगितले परंतु पुन्हा कोणाच्या तरी आशीर्वादाने तो प्रकल्प झाला पाहिजे म्हणून पुन्हा नॅशनल वॉटर डेव्हलपमेंट बोर्डाकडे ते प्रकरण पाठविण्यात आले आहे आणि वैनगंगेचे पाणी मांजरा खोऱ्याच्या मार्गाने नेण्याचे एक षडयंत्र, एक कारस्थान या ठिकाणी उभे करण्यात आलेले आहे.

सभापती महोदय, नदीच्या लिंक जोडण्यात आलेल्या आहेत. कन्हान-वर्धा लिंक. मांजरा खोऱ्यासाठी 14500 कोटी रुपयांचा हा प्रकल्प तयार करण्यात आलेला आहे. आम्ही छोटीशी योजना मागितली तर तो प्रकल्प येऊ शकत नाही. त्याकरता शासन पैसे देऊ शकत नाही. गोसीखुर्द हा नॅशनल प्रॉजेक्ट म्हणून घोषित केला पण त्या प्रॉजेक्टचे आलेले पैसे विदर्भाला डायरेक्ट न देता तीन-तीन महिने वापरण्यात येतात. गोसीखुर्द प्रकल्पाचे 1680 कोटी रुपये केंद्र शासनाकडून यावयाचे होते त्यापैकी फकत 720 कोटी रुपये देण्यात आले. अद्याप दुसरा हप्ता देण्यात आला नाही. त्याचबरोबर राज्य शासनाचेही पूर्ण पैसे देण्यात आलेले नाहीत. गोसीखुर्द हा

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस....

नॅशनल प्रकल्प आहे त्यामुळे आम्ही मोठया प्रमाणात विदर्भाचे भले करतो आहोत अशा प्रकारे पाठ थोपटून घेण्यात येते, हे काही योग्य नाही. कन्हान-वर्धा लिंक प्रकल्प. वैनगंगा-पूर्णा लिंक प्रकल्प, इंद्रावती-वर्धा, पैनगंगा-पूर्ण लिंक प्रकल्प घेण्यात येत आहेत. अशा पध्दतीने उपसासिंचन विदर्भासाठी कमीत कमी 80 मीटर ठेवून जास्तीत जास्त 4,13,650 हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणण्याचा शासनाचा उपक्रम आहे. यामाध्यमातून विदर्भातील पाणी पळविण्याच्या मार्गावर शासन आहे. म्हणजे विदर्भासाठी प्रकल्प नाहीत. उद्योग नाहीत.

सभापती महोदय, या चर्चेला काय उत्तर देण्यात येणार आहे हे मला माहीत आहे. उत्तरामध्ये असे सांगितले जाणार आहे की, आम्ही उद्योग देतो ते उद्योग सांभाळायची तुमची लायकी नाही. आम्ही विद्युत प्रकल्प दिले पण तुम्ही ते होऊ देत नाही. अशा पध्दतीने उत्तर दिले जाईल याची मला जाणीव आहे. परंतु विद्युत प्रकल्प हे खऱ्या अर्थाने रोजगार निर्मिती करणारे प्रकल्प नव्हेत. हे खऱ्या अर्थाने इतर क्षेत्रामध्ये विद्युत पाहिजे आहे म्हणून इन्फ्रास्ट्रक्चर म्हणून या प्रकल्पाची निर्मिती होत आहे. हा उद्योग नाही. या विद्युत प्रकल्पामुळे विदर्भातील फक्त 250 ते 300 मुलांना मजूर म्हणून काम मिळणार आहे. येथे निर्माण झालेली वीज बाहेर जाणार आहे आणि मोठे प्रकल्प कोठे उभे रहाणार आहेत याचा आपणच विचार करावा आणि मग आम्हाला सांगावे. मोठे प्रकल्प दुसरीकडे उभे रहणार आहेत. त्याच्या करिता विदर्भातून विद्युत जाणार, पाणी जाणार तेथे प्रकल्प होणार व तेथील लाखो मुलांना रोजगार मिळणार आणि आमची मुले मात्र लंगोटी नेसून झाडावर चढून बोरे तोडणार.

यानंतर श्री. बरवड.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभाताई फडणवीस ....

अशा पध्दतीचा अन्याय आपण मागच्या दाराने आरंभिलेला आहे हे विसरता कामा नये.

आम्हाला सांगण्यात आले की, या ठिकाणी भंडारा, गोंदिया जिल्ह्याचा अनुशेष माजी मालगुजारी तलावाने कमी केला. हे माजी मालगुजारी तलाव तुम्ही बांधलेले नाहीत. हे माजी मालगुजारी तलाव मोठ्या प्रमाणावर बांधले गेले त्याला 450 वर्षे झालेली आहेत. त्या तलावांमध्ये आता मोठ्या प्रमाणावर माती जमा झालेली आहे. त्यामुळे या तलावापासून होणारे सिंचन कमी झालेले आहे. मागच्या पानावर असेल ते पुढच्या पानावर लिहावयाचे आणि त्या पानावरुन परत पुढच्या पानावर लिहावयाचे असे सरकारचे धोरण आहे. वस्तुस्थितीकडे कोणीही लक्ष देत नाही. माजी मालगुजारी तलावांवर आमचे सिंचन कधीच होऊ शकत नाही. या माजी मालगुजारी तलावांची अशी स्थिती आहे की, या ठिकाणी 6836 माजी मालगुजारी तलाव पूर्व विदर्भात आहेत असे सांगितले जाते. त्यापैकी 20 हेक्टर ओलीत होणारे 4292 तलाव आहेत. त्यातील अर्ध्यापेक्षा जास्त तलाव लोकांनी अतिक्रमण करुन त्याची शेती करुन घेतलेली आहे.त्या ठिकाणी कोणी येऊन पाहात नाही. कोणी विचार करत नाही. फक्त कागदोपत्री एवढे तलाव आहेत आणि एवढे सिंचन होते असे दाखविले जाते. प्रत्यक्षात तेवढे सिंचन होत नाही. त्या ठिकाणी 21 ते 50 हेक्टरपर्यंत सिंचन होणारे 917 तलाव आहेत आणि 51 ते 100 हेक्टर सिंचन होणारे 322 तलाव आहेत. 100 हेक्टरच्या वर सिंचन होणारे तलाव 134 आहेत. सगळी बेरीज केली तरी जास्तीत जास्त 1 हजार हेक्टरच्या वर हे सिंचन जात नाही. तरीसुध्दा सिंचनाच्या अनुशेषामध्ये आम्ही नाही. त्या ठिकाणी आमचा सिंचनाचा अनुशेष भरला गेला आहे असे सांगितले जाते. त्या ठिकाणचा अनुशेष पूर्ण केला असे उत्तर आम्हाला मिळणार आहे. ज्यावेळी 1994 मध्ये अनुशेष काढला त्यावेळी रुपयाची किंमत किती होती ती किंमत आज आहे काय याचा विचार करावा. वाढलेली महागाई, रुपयाचे झालेले अवमूल्यन या सगळ्या गोष्टींचा विचार केला तर तुमच्या प्रकल्पांच्या किंमती जर वाढू शकतात तर अनुशेषाची किंमत वाढू शकत नाही काय ? अनुशेष वाढू शकत नाही काय ? या ठिकाणी खऱ्या अर्थाने द्यावयाचे असेल तर इमानदारीने द्या, मनापासून द्या. खऱ्या अर्थाने प्रेम करावयाचे असेल तर हृदयापासून करा. वरवरचे प्रेम आम्हाला नको. पुतनामावशीचे प्रेम करुन तुम्ही आम्हाला आजपर्यंत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/

श्रीमती शोभा फडणवीस ....

बुडवित आलेला आहात. भविष्यात बुडविण्याचा विचार आपण मनात ठेऊ नका.

सभापती महोदय, कृषी पंप आणि कृषीपंपासाठीचा वीज वापर याबाबतीत काय परिस्थिती आहे ? यांनी आम्हाला कोठे कोठे लुटले नाही ? अमरावती विभागात पिकाखालील क्षेत्र 17.37 टक्के आहे आणि वीज वापर 8.94 टक्के आहे. नागपूर विभागामध्ये पिकाखालील क्षेत्र 10.90 टक्के आहे आणि वीज वापर 3.90 टक्के आहे. 11 जिल्ह्याचा हा हिशेब आहे. दुसरीकडे एकट्या सोलापूर जिल्ह्यामध्ये 12.74 टक्के वीज वापरली जाते. 11 जिल्ह्याएवढी वीज एकटा सोलापूर जिल्हा वापरत आहे. तरी सुध्दा आम्हाला वन फेज लावा, टू फेज लावा, भारनियमन करा, वीज वाचवा असे सांगण्यात येते. हे कोणासाठी ? या ठिकाणी या सगळ्या गोष्टी कोणासाठी आहेत ? आम्हाला मारुन तुम्हाला जिवंत राहावयाचे आहे काय ? आम्हाला संपवून तुम्हाला मोठे व्हावयाचे आहे काय ? असे असेल तर ते कदापीही शक्य होणार नाही. पुणे विभागामध्ये पिकाखालील क्षेत्र 20.28 टक्के आहे आणि वीज वापरत 29.20 टक्के आहे. नाशिक विभागात पिकाखालील क्षेत्र 20.25 टक्के आहे आणि वीज वापर 32.93 टक्के आहे. ही वीज कोठे जाते ? भारनियमन कोणासाठी आहे ? तुमच्याकरिता भार नियमन नाही. आमच्याकरिता भारनियमन आहे. म्हणून आम्ही 12 टक्के, 3 टक्के, 4 टक्के वीज वापरणारे आहोत. आम्हाला व्हाईस नाही. कारण सगळी शक्ती मग विद्युत असेल, पाणी असेल, फायनान्स असेल हे सर्व पश्चिम महाराष्ट्रामध्ये गोळा झालेले आहे. विदर्भाच्या वाट्याला मात्र अन्न व नागरीपुरवठा. घे बापू धान आणि विक तिकडे बाजूले. अशा पध्दतीचा अन्याय जर आमच्यावर होत असेल तर खऱ्या अर्थाने आम्हाला न्याय मिळणे आज तरी कठीण वाटत आहे. राज्यात एकूण 3 लाख 91 हजार 987 कृषी पंप आहेत. हा कृषी पंपाच्या विद्युतीकरणाचा अनुशेष असून त्यापैकी विदर्भातील जो अनुशेष आहे....

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, माझा पॉइन्ट ऑफ इन्फॉर्मेशन आहे. आमचे विदर्भातील आदरणीय नेते श्री. अनिल देशमुख या ठिकाणी बसलेले आहेत. त्यांच्याकडे बघून सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी सांगितले की, विदर्भाला अन्न व नागरीपुरवठा विभागाचे मंत्रीपद दिलेले आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

श्री.राम पंडागळे....

सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस आपल्याला आठवण करुन देतो की, युतीच्या काळामध्ये अन्न व नागरी पुरवठा विभाग आपल्याकडेच होता. त्यामुळे या विभागाला कमी लेखू नये.

श्रीमती शोभा फडणवीस : ठीक आहे, परंतु पाटबंधारे विभाग विदर्भाकडे होता, सार्वजनिक बांधकाम विभाग विदर्भाकडे होता. हे विसरता कामा नये. ज्या गोष्टींपासून आम्हाला न्याय मिळणार आहे, ते सगळे विभाग तिकडे आहेत. फक्त धान्याचा विभाग विदर्भाकडे दिला आहे. माननीय मंत्री श्री.अनिल देशमुख हे तुमचे नेते असले तरी त्यांनी माझ्याबरोबर काम केलेले आहे. मी मंत्री असताना तेही माझ्याबरोबर मंत्री होते. त्यामुळे मी फक्त विदर्भावर होणा-या अन्यायाबद्दल बोलत आहे. मी दुस-या कोणत्याही विषयाबाबत बोलत नाही. राज्यात एकूण 3 लाख 91 हजार 397 कृषी पंप आहेत. विद्युतीकरणाचा 3 लाख 91 हजार 987 कृषी पंपाचा अनुशेष आहे. त्यापैकी विदर्भातील 2 लाख 42 हजार 715 कृषी पंप अजूनही वीज जोडणीची वाट पहात आहेत. म्हणजे कृषी पंपाचा 61.92 टक्के अनुशेष आहे. एका कृषी पंपाला 1 लाख 7 हजार रुपये खर्च गृहीत धरला तर विदर्भातील कृषी पंपासाठी 2597 कोटी रुपयांची आर्थिक तरतूद करणे आवश्यक आहे. इतका निधी शासन 2 वर्षामध्ये देणार आहे काय ? शासनाने हा निधी 2024-25 मध्ये देण्याचे नियोजन केलेले आहे. तो पर्यंत आमची लाकडे मसणात जातील. याठिकाणी अनुशेषाबाबत बोलण्यासाठी आम्ही शिल्लक राहणार नाही. विदर्भातील सिंचनाचा अनुशेष 2010 पर्यंत भरुन काढावयाचा होता. या कालावधीपर्यंत हा अनुशेष का भरुन काढला नाही ? विदर्भाला का न्याय देऊ शकला नाही ? 3 लाख 91 हजार 987 कृषी पंपाचा अनुशेष आहे, त्यापैकी 2 लाख 42 हजार कृषी पंपाचा अनुशेष विदर्भाचा राहिलेला आहे. विदर्भावर शासन किती अन्याय करीत आहे हे यावरुन सिध्द होते. त्यामुळे सन 2025-26 पर्यंत अनुशेष भरुन काढण्याचा हिशोब शासनाने करु नये. तेवढया कालावधीपर्यंत मंत्री महोदय आपण कोठे असणार, आम्ही कोठे असू हे कोणालाही सांगता येत नाही. तरी आपल्या काळात म्हणजे 2010-11 या वर्षात विदर्भातील सिंचनाचा अनुशेष भरुन काढण्यात यावा अशी मी मागणी करते.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

श्रीमती शोभा फडणवीस.....

सभापती महोदय, विदर्भामध्ये रस्त्याचा अनुशेष देखील मोठया प्रमाणावर आहे. 1981-2001 या कार्यक्रमांतर्गत विदर्भात राष्ट्रीय महामार्गाची 103.31 टक्के कामे झाली, उर्वरित महाराष्ट्रात 154.15 टक्के, राज्य मार्गाची विदर्भात 98.42 टक्के तर उर्वरित महाराष्ट्रात 94.96 टक्के, मुख्य जिल्हा रस्त्याची विदर्भात 98.32 टक्के व उर्वरित महाराष्ट्रात 103.22 टक्के, इतर जिल्हा रस्त्यांची आम्हाला अत्यंत गरज आहे. विदर्भात 80.33 टक्के व उर्वरित महाराष्ट्रात 94.1 टक्के रस्ते झालेले आहेत. ग्रामीण रस्त्यांअभावी आदिवासी लोक आजारामुळे मरतात, औषधे नसल्यामुळे मरतात, दवाखान्यामध्ये जाता येत नाही म्हणून मरतात, शहरात गेल्यानंतर मागणी करुनही काही मिळत नाही म्हणून मरतात, अशी ग्रामीण भागाची रस्त्यांची परिस्थिती असताना येथे फक्त 57.89 टक्के रस्ते झाले आहेत व उर्वरित महाराष्ट्रात 89.32 टक्के झालेले आहेत. इतका मोठा अनुशेष या रस्त्यांचा आहे. विदर्भातील 16,842 कि.मी.रस्त्यांची कामे होणे आवश्यक आहे. त्यासाठी 5052 कोटी 75 लाखाची आवश्यकता आहे. हा सर्व 1981-2001 चा हिशोब आहे.

सभापती महोदय, 2000 ते 2009 या कालावधीतील साध्य व उद्दिष्टय यामध्ये विदर्भात 52,642 कि.मी. म्हणजे 64.96 टक्के रस्त्यांचा अनुशेष आहे. या कालावधीत केवळ 6,737 कि.मी.इतक्या रस्त्याचे काम झालेले आहे आणि बाकीची कामे होणे बाकी आहे.

यानंतर श्री.शिगम

अशुधारित प्रत / शुद्धीसाठी नाही

विदर्भामध्ये केवळ 28.41 टक्के रस्ते झालेले आहेत. बाकीचा अनुशेष तसाच राहिलेला आहे. हा अनुशेष केव्हा पूर्ण करणार आहात ? विदर्भामध्ये 23321 कि.मी.च्या पुलासहीतच्या रस्त्यासाठी 30 लाख रु. प्रति कि.मी प्रमाणे 696.30 कोटी रुपये अजून खर्च करावयास पाहिजेत. अन्य गोष्टींचा अनुशेष धरला तर एकूण 12 हजार कोटी रु. विदभार्चा अनुशेष भरुन काढण्यासाठी द्यावे लागणार आहे. दादा बोले आणि दल हाले. या उक्तीप्रमाणे माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार काही बोलले तर आमचे काही तरी भले होईल. विदर्भामध्ये रस्तेजोडणीचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर करण्याची गरज आहे. राज्यपालांच्या रस्त्याच्या अद्यावत अनुशेषाबाबत 14.4.2010 ला मंडळाने शासनाकडे अहवाल पाठविलेला आहे. त्यांचा अहवाल राज्यपालांच्या सचिवांनी सार्वजनिक बांधकाम विभागालाही दिलेला आहे आणि त्यातील ही आकडेवारी आहे. म्हणून या अनुशेषावर आपण खर्च करणार आहात काय ? असल्यास तो केव्हा करणार आहात ? किती वर्षात करणार आहात ? आजही आदिवासी रस्ता नाही म्हणून मरतोय, आजही पाणी नाही म्हणून मरतोय, आजही डॉक्टर व औषधे नाहीत म्हणून मरतोय. हे चित्र महाराष्ट्राच्या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये दिसत आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या सुवर्ण महोत्सवाचे वर्ष हे आमच्यासाठी डोळयात अश्रू आणणारे आणि तुमच्यासाठी आनंदाने साजरे करणारे असेल तर या विदर्भाला कुणीच वाचवू शकणार नाही. मला माहीत आहे की उद्योगधंद्याच्या बाबतीत महाराष्ट्र सर्वांच्या मागे आहे. सगळे असे म्हणतात की महाराष्ट्रात उद्योग आले पाहिजे. पण उद्योग केव्हा येणार आहेत ? येथे जमीन आहे, येथे मजूर आहेत, येथे पाणी आहे, येथे वीज आहे. वीज निर्माण करण्यासाठी आपण केवळ विदर्भाचा आणि कोकणाचा वापर करणार असाल, पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी विदर्भ आणि कोकणाचा वापर करणार असाल आणि उद्योग मात्र दुसरीकडे नेणार असाल तर विदर्भाचा अनुशेष कधीच भरुन निघणार नाही.

सभापती महोदय, महाराष्ट्राच्या बँकांचा पैसा आम्ही जमा करतो. एकूण जमा केलेल्या पैशाच्या 40 टक्के पैसा आम्हाला कर्जापोटी मिळायला पाहिजे. असे असताना हा 40 टक्के पैसा ना शेतक-याला मिळत ना, दारिद्रय रेषेखालील माणसाला मिळत, ज्या बचत गटाचा तुम्ही पुरस्कार करता त्या बचत गटांना देखील तो पैसा मिळत नाही. आम्ही जमा केलेला 60 टक्के पैसा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

कुठे जातो ? हा पैसा मोठमोठ्या कारखान्यांना जातो. मग बुडतो कोण ? इथल्या बँका बुडल्या की मग उप मुख्यमंत्री महोदय म्हणतात की विदर्भातील लोकांना बँका सांभाळता येत नाहीत. तुम्ही जेव्हा आम्हाला सांभाळाल, जेव्हा आम्हाला सांभाळण्याचे तुमचे विचार तयार होतील तेव्हाच ख-या अर्थाने आमच्या बँका सांभाळल्या जातील, आम्ही सांभाळले जाऊ, आमचा विदर्भ सांभाळला जाईल आणि आम्ही मोठे होऊ एवढे लक्षात ठेवावे, एवढे बोलूने मी माझे भाषण संपविते.

..नंतर हिंदी भाषण..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद जमा (महाराष्ट्र विधानसभा द्वारा निर्वाचित) : सभापति महोदय, विदर्भ के अनुशेष के प्रस्ताव पर मैं बहुत संक्षेप में अपने विचार आपके सामने पेश करुँगा. विदर्भ का सिंचन बॅकलॉग, फिजिकल बॅकलॉग, आर्थिक बॅकलॉग, दांडेकर समिति का बॅकलॉग और कई विशेषज्ञों द्वारा दी गई जानकारी सुनते सुनते हम लोगों को बुढ़ापा आ गया है. इसलिए मैं केवल 2-3 बुनियादी बातें कहना चाहता हूँ.

सभापति महोदय, माननीय उपमुख्यमंत्री के पास वित्त विभाग भी है. इरीगेशन प्रोजक्ट के बारे में थोड़ा विचार करके पेटर्न बदलना पड़ेगा. विदर्भ विकास महामंडल बनाने के बाद तथा राज्यपाल महोदय के निदेशों के बाद भी हमारे विदर्भवासियों में असंतोष है और सरकार के प्रति शंका की दृष्टि से देखा जाता है. मैं किसी के ऊपर आरोप नहीं लगाना चाहता हूँ और पुराने इतिहास में नहीं जाना चाहता हूँ. मेरा अपना विचार यह है कि हमारे पास सीमित रिसोर्स हैं. हम चाहे कुछ भी कह लें, लेकिन विदर्भ का बॅकलॉग जादू की छड़ी से बदलने वाला नहीं है. हमें प्लानिंग का पेटर्न बदलना पड़ेगा. चाहे लार्ज स्केल प्रोजक्ट हों, चाहे मीडियम स्केल प्रोजक्ट हों, चाहे स्मॉल स्केल प्रोजक्ट हों, हमने इरीगेशन के प्रोजक्ट तो शुरु कर दिए, लेकिन हम उन्हें फंड नहीं दे पाते हैं. मेरे विचार से यह एक क्रिमिनल वेस्ट है. हम 300-400 करोड़ रुपए का प्रोजक्ट प्लान करते हैं और एक्जीक्यूट होते होते वह हजारों करोड़ रुपए तक चला जाता है. यह देश का पैसा है, हमारी जनता का पैसा है. इसके बारे में कहीं न कहीं कानून बनाकर पाबंदी लगाई जानी चाहिए. 20-25 साल तक प्रोजक्ट डिले होता है. 1983-84 में गोसीखुर्द प्रकल्प का बजट 350-400 करोड़ रुपए का था, आज उसकी कीमत 7,700 करोड़ रुपए हो गई है. वहां के प्रकल्पग्रस्तों की समस्याओं के बारे में माननीय तटकरे जी के साथ नागपुर में मीटिंग तो हुई, लेकिन उसमें कोई निर्णय नहीं हुआ. मुझे ऐसा लगता है कि इस बारे में मुंबई में होने वाली कॅबिनेट की बैठक में निर्णय लिया जाएगा.

सभापति महोदय, मैं तो अपने दोस्तों से मजाक में कहता हूँ कि हमारे माननीय मुख्यमंत्री जी और उप मुख्यमंत्री जी की महाराष्ट्र के लिए आखिरी जोड़ी है. मुझे विश्वास है कि ये लोग अच्छा काम करेंगे. हमें इस जोड़ी से बहुत उम्मीद है. इस समय हमारी क्रेडिटिबिलिटी बहुत खराब है, इसलिए इसको सुधारने की जिम्मेदारी आप दोनों के ऊपर है. आपको बॅकलॉग के बारे में हमारे मन की शंकाएं दूर करनी चाहिए. आप विदर्भ के लोगों के लिए आखिरी उम्मीद हैं.

. . . 3H 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . श्री. सय्यद जमा

माननीय सदस्या श्रीमती फडणवीस ने यहां पर विदर्भ में सड़क, उद्योग, इरीगेशन और पावर पंप के बॅकलॉग के बारे में बताया. हमारे यहां तो मिनरल्स का भी बॅकलॉग है. हम केवल कोयला निकालते हैं. विदर्भ में ऐसे मिनरल्स भी हैं, जिनका एक्सप्लॉयटेशन नहीं होता है, उसके लिए कोई उद्योग नहीं है. हमारे यहां पर फोरेस्ट बेस्ड कोई उद्योग नहीं है, हमारे यहां एग्रो बेस्ड कोई उद्योग नहीं है. इन सारी बातों के लिए हम किसी पर आरोप नहीं लगाना चाहते हैं, लेकिन जो आंकड़े महाराष्ट्र वाटर रिसोर्स रेगूलेटरी अथॉरिटी की तरफ से आए हैं, यह महाराष्ट्र शासन की अथॉरिटी है और उसके आधार पर सिंचन में बॅकलॉग है तथा बाकी क्षेत्रों में भी बॅकलॉग है. इसको दूर करने के बारे में मैं आपको 2-3 सुझाव देना चाहता हूँ. अगर हम 10 बड़े बड़े इरीगेशन के प्रोजक्ट को थोड़ा-थोड़ा पैसा देकर जिंदा रखने और उन्हें डिले करने की बजाय वहां के जन-प्रतिनिधियों के साथ बैठकर सहमति बनाए और सभी प्रोजक्ट का मूल्यांकन करें कि किस प्रोजक्ट का कितना काम बचा है और उसके लिए कितना पैसा और लगेगा और उसके बाद आप अगले बजट में इस प्रकार से प्रावधान कीजिए कि कुछ प्रोजक्ट को ज्यादा पैसा देकर पूरा कीजिए और कुछ प्रोजक्ट को अगर पीछे ले सकते हैं तो उनको बाद में पूरा कीजिए. वहां के जन-प्रतिनिधियों और विशेषज्ञों के साथ बैठकर प्लानिंग और फायनेन्स डिपार्टमेंट के लोग इस तरह का कार्यक्रम बनाएं कि जो प्रोजक्ट पूरा होने के नजदीक हैं, उनको पहले पूरा किया जाए.

सभापति महोदय, मैं माननीय उप मुख्यमंत्री को बताना चाहता हूँ कि हमारे विदर्भ में किसानों की आत्महत्या, कुपोषण की समस्या और बुनकरों की समस्या प्रमुख रुप से हैं. गरीब बुनकरों के साथ बहुत अन्याय हो रहा है. एन.सी.पी.सी. के अन्तर्गत केन्द्र शासन की जो योजनाएं आती हैं, उसमें भी हमारा हिस्सा बहुत कम है, ज्यादा हिस्सा दूसरी तरफ चला जाता है. हमारे बुनकरों को चाहे मकान देने की बात हो, बी.पी.एल. की सुविधाएं देने की बात हो या बीमार होने पर जीवनदायी योजना में इलाज कराने की बात हो, गरीबों से जुड़ी हुई समस्याओं के बारे में विदर्भ के लोगों में बहुत नाराजगी है. यद्यपि हमारी सरकार ने काम किया है, इसीलिए तीसरी बार चुनकर भी आए हैं. लेकिन मुझे लगता है कि तीसरी बार जो मौका मिला है, उसमें अभी हमारे पास समय है, अच्छी टीम बन गई है, एक अच्छी केबिनेट बनी है, इसलिए मुझे उम्मीद है कि बचे हुए सालों में सरकार अच्छा काम करेगी.

. . . 3H3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . . श्री. सय्यद जमा

सभापति महोदय, बॅकलॉग के आंकड़े गलत नहीं बोलेंगे, इसके बारे में हमारी शंकाएं दूर होनी चाहिए. अगले साल के बजट में अगर हम कुछ प्रोजक्ट को ज्यादा फंड देकर जल्दी पूरा कर सकें तो इसके बारे में हमें ध्यान देना चाहिए. प्रोजक्ट की लागत न बढ़े इसके लिए विशेष कानून लाना चाहिए. हम उतने ही प्रोजक्ट मंजूर करें, जितने हम निश्चिम समय में बजट देकर पूरा कर सकते हैं. इतना कहकर मैं अपना भाषण पूर्ण करता हूँ.

. . . . . .

भाषण पूर्ण, नंतर 3H4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे : सन्माननीय सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर, सर्वश्री दिवाकर रावते, विनोद तावडे, रामदास कदम संजय केळकर, डॉ.दीपक सावंत, श्रीमती शोभा फडणवीस, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री पाशा पटेल, किरण पावसकर, चंद्रकांत पाटील, परशुराम उपरकर, रामनाथ मोते, गोपीकिसन बाजोरिया, धनंजय मुंडे यांनी म.वि.प.नियम 260 अन्वये.....

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, आम्ही विदर्भाचे प्रतिनिधीत्व करतो. त्यामुळे मला या प्रस्तावावर माझे विचार मांडावयाचे आहेत. विदर्भाच्या प्रस्तावावर आम्हाला बोलण्याची संधी मिळणार नसेल तर मी निषेध व्यक्त करुन निघून जातो.

(माननीय सदस्य श्री.केशवराव मानकर यांनी बहिर्गमन केले)

नंतर 3आय.1...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे (जलसंपदा मंत्री) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी नियम 260 अन्वये विदर्भाच्या सिंचनाचा अनुशेष तसेच इतर विषयांच्या संदर्भात अतिशय महत्वपूर्ण चर्चा उपस्थित केलेली आहे. त्या चर्चेत माननीय विरोधी पक्षनेते, माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत, माननीय श्री. सय्यद जमा, माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी या प्रश्नावर आपले मनोगत व्यक्त केले.

ॲड. उषा दराडे : महोदय, इतक्या महत्वाच्या विषयावर सभागृहात चर्चा सुरु केली परंतु त्याचे उत्तर ऐकायला विरोधी पक्षातील कोणीच सदस्य उपस्थित नाहीत, ही खेदाची गोष्ट आहे.

उप सभापती : माननीय सदस्यांना बोलाविण्यात आलेले आहे, ते येतीलच.

श्री. सुनील तटकरे: महोदय, महाराष्ट्र राज्याची निर्मिती होत असताना ज्या 105 हुतात्म्यांच्या बलिदानातून हे राज्य साकार झाले आहे, स्व. यशवंतराव चव्हाण यांनी या राज्याचा मंगल कलश आणलेला असताना, सन 1952 च्या कराराची अमलबजावणी करीत असताना अशा प्रकारे गेल्या 50 वर्षांचे सिंहावलोकन करीत असताना पुन्हा विदर्भातील जनतेच्या वेगवेगळ्या प्रश्नांच्या संदर्भात असलेला अनुशेष या सर्व विषयांबाबत माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. विशेषत: राज्याच्या 50 व्या वर्षात पदार्पण करीत असताना या राज्याने सर्वच क्षेत्रात अतिशय नेत्रदीपक अशी प्रगती केली आहे. स्व. चव्हाण साहेब या राज्याचे नेतृत्त करीत होते. त्यानंतर स्व. दादासाहेब कन्नमवार, स्व. वसंतराव नाईक यांचेही नेतृत्व या राज्याला लाभलेले आहे. स्व. नाईक साहेबांनी महाराष्ट्राची कृषी औद्योगिक रचना उभी करीत असताना महाराष्ट्राची सर्वंकष उभारणी करण्याच्या दृष्टीने काही विचार सुध्दा राज्यासमोर ठेवले. स्व. वसंतदादा पाटील व त्यानंतर आदरणीय शरदराव पवार साहेबांनी देखील एक अजोड अशी कामगिरी या राज्यासमोर ठेवली आहे. आपण या सर्व कालखंडाचे सिंहावलोकन करीत असताना गेल्या अनेक वर्षांपासून आपण आग्रहपूर्वक विदर्भाच्या प्रश्नावर चर्चा करीत आलो आहोत. दर हिवाळी अधिवेशनात वेगवेगळ्या विषयावर चर्चा सभागृहात होत असते. त्यात कधी मागासलेपणावर तर कधी सिंचनावर तसेच कधी इतर महत्वाच्या विषयांची चर्चा होत असते. त्याप्रमाणे आज सुध्दा माननीय विरोधी पक्षनेत्यांनी विदर्भातील सिंचनाच्या बॅकलॉगबाबत सांगितले. ही गोष्ट खरी आहे की, अशा प्रकारे अनुशेषाची भावना निर्माण झाल्यानंतर सन 1984 च्या काळात

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे .....

स्व. वसंतदादा पाटील यांनी दांडेकर समितीची नियुक्ती केली होती. त्या समितीच्या माध्यमातून राज्याचा अनुशेष किती आहे हे काढण्याचे महत्वपूर्ण काम झाले. त्यानंतर सन 1994 च्या काळात सुध्दा हाच प्रयत्न झाला. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस या विदर्भाच्या पाण्यावर पश्चिम महाराष्ट्र सुधारतो असे काही तरी बोलल्या. मला माहीत नाही की, त्यांनी असे वक्तव्य का करावे ? माननीय राज्यपालांनी वैधानिक विकास मंडळाची निर्मिती करुन विदर्भातील सिंचनाचा अनुशेष दूर करण्याची भूमिका शासनाने घेतली. अशी वैधानिक मंडळे निर्माण करीत असताना वेगवेगळे मतप्रवाह निर्माण झाले होते. त्यात काही असेही म्हणत होते की, विधिमंडळाचे अधिकार आता संपुष्टात येतील की काय, विकास कामांवर बंधने येतील की काय असे वेगवेगळे विचारप्रवाह सुरु झाले होते. परंतु मधल्या काळात माननीय पवार साहेबांनी उदात्त दृष्टीकोन समोर ठेवला आणि विदर्भाचा सिंचनाचा अनुशेष कालबध्द पध्दतीने भरुन काढावयाचा असेल तर वैधानिक विकास मंडळांची निर्मिती केली पाहिजे अशी भूमिका घेतली. हे करीत असताना हा बॅकलॉग दूर व्हावा म्हणून ठराविक निधी त्यासाठी उपलब्ध करुन दिला पाहिजे, अशी महत्वपूर्ण भूमिका सुध्दा स्वीकारली गेली. नंतरच्या काळात ज्यावेळी असे काम करण्याचे प्रयत्न केले .....

यानंतर श्री. जुन्नरे ....

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी नोंद

श्री. सुनील तटकरे .....

सभापती महोदय, या ठिकाणी मी राजकीय भाषण आणि आकडेवारी देऊन सभागृहाचा वेळ घेणार नाही. परंतु गेल्या 5-10 वर्षामध्ये सिंचनाचा अनुशेष दूर करण्याचा जाणीव पूर्वक प्रयत्न केला गेला आहे एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो. या शासनाने मा.राज्यपाल महोदयांनी दिलेल्या निर्देशाचे अनुपालन केलेले आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी असे विचार व्यक्त केले की, विदर्भाच्या प्रकल्पाचा निधी पश्चिम महाराष्ट्रात वळवला गेला आहे. पश्चिम महाराष्ट्रात व विदर्भामध्ये विद्युत पंप किती आहे याची आकडेवारी देण्यात आलेली आहे. पश्चिम महाराष्ट्रात कदाचित विद्युत पंप जास्त असतील परंतु सहकार चळवळीच्या माध्यमातून येथील शेतक-यांनी पुढाकार घेतला व त्या माध्यमातून त्या ठिकाणी शेतीची आधुनिक क्रांती, धवल क्रांती केलेली आहे. एका भागात झालेल्या विकासाबद्दल असुया किंवा वेगळी भावना मांडण्यापेक्षा मागासलेल्या भागाला बरोबर घेऊन प्रगती करण्याचा प्रयत्न सामुदायिकपणे केला तर या मागासलेल्या भागाचे प्रश्न आपल्याला मोठया प्रमाणात सोडवता येऊ शकतील. माननीय अजित दादा हे माझे नेते आहेत म्हणून मला त्यांची स्तुती करावयाची नाही, ते राज्याचे उपमुख्यमंत्री झाले म्हणून मला त्यांची स्तुती तर अजिबात करावयाची नाही. आमच्या सारख्या कार्यकर्त्यांची भावना काय होती ती त्यांच्या उप मुख्यमंत्री पदाच्या निमित्ताने जगजाहीर झालेली आहे. त्यांनी गेल्या पाच वर्षापासून विदर्भाच्या सिंचनाचा अनुशेष दूर करण्याच्या दृष्टीकोनातून जाणीवपूर्वक पावले उचचलेली आहेत. विदर्भातील वेगवेगळे प्रकल्प हाती घेतले गेले.

या ठिकाणी गोसीखुर्द प्रकल्पाच्या बाबतीत विचार मांडले गेले आहेत. सन 1983 साली तत्कालीन पंतप्रधान कै.राजीव गांधी यांच्या शुभहस्ते गोसीखुर्द प्रकल्पाचे भूमीपूजन करण्यात आले होते. त्यावेळच्या प्रकल्पाच्या किंमतीत आणि आताच्या किमतीत फार मोठी वाढ झालेली आहे हे आपल्याला नाकारुन चालणार नाही. गोसीखुर्द प्रकल्पाची किंमत सुरुवातीला 400 कोटी रुपये होती परंतु आता या प्रकल्पाची किंमत 7.5 हजार कोटी रुपये झालेली आहे. या प्रकल्पामुळे जवळपास 2.60 लक्ष हेक्टर क्षेत्राचे सिंचन होणार आहे. गोसीखुर्द प्रकल्पामुळे चंद्रपूर आणि भंडारा जिल्हयाचे क्षेत्र सिंचनाखाली आलेले आहे. हा महत्व कांक्षी प्रकल्प पूर्ण करण्याचे काम

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे .....

शासनाने हाती घेतले. या प्रकल्पाला राष्ट्रीय प्रकल्प म्हणून मान्यता मिळालेली आहे. गोसीखुर्द प्रकल्पाला राज्यातील पहिला राष्ट्रीय प्रकल्प म्हणून केंद्रशासनाने मान्यता दिलेली आहे. या प्रकल्पासाठी माननीय पवार साहेबांनी, माननीय श्री. प्रफुल्ल पटेल, माननीय श्री.विलासराव देशमुख, माननीय श्री. सुशीलकुमार शिंदे, माननीय श्री. मुकुल वासनीक या सर्वांनी प्रयत्न केल्यामुळेच हा प्रकल्प राष्ट्रीय प्रकल्प होऊ शकला हे आपल्यला विसरुन चालणार नाही. या सर्वांच्या प्रयत्नामुळे गोसीखुर्द प्रकल्प केंद्रशासनाने राष्ट्रीय प्रकल्प म्हणून जाहीर केलेला आहे. गोसीखुर्द हा राष्ट्रीय प्रकल्प झाल्यामुळे केंद्रशासनाचे मोठया प्रमाणात अनुदान उपलब्ध झाले आहे. माननीय श्री. अजित दादांचे मला विशेष ऋण या निमित्ताने करावयाचे आहे. गोसीखुर्द हा राष्ट्रीय प्रकल्प जाहीर झाल्यानंतर प्रकल्पाअंतर्गत दिला जाणारा निधी हा माननीय राज्यपाल महोदयांच्या निदेशाच्या आत येऊ शकला असता परंतु आपण मोठे मन दाखवले. जे धोरण माननीय श्री.शरद पवार साहेबांनी वैधानिक विकास महामडळ स्थापन करतांना दाखवले होते तेच धोरण आपण जलसंपदा खात्याचे मंत्री असतांना दाखवले आणि राज्यपालांच्या निर्देशाच्या बाहेर हा राष्ट्रीय प्रकल्प ठेवला गेला. या प्रकल्पाच्या माध्यमातून मिळणारा निधी हा माननीय राज्यपाल महोदयांच्या निकषानुसार, जलसंपदा विभागाला मिळणारा पूर्ण निधी जो आपण उर्वरित महाराष्ट्राला वाटत असतो त्यातील काही निधी गोसीखुर्द प्रकल्पाला देण्याचे महत्वपूर्ण योगदान माननीय उपमुख्यमंत्र्यांनी केलेले आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले आहे की, अमरावती विभागामध्ये अनुशेष आहे. अमरावतीमधील अनुशेषाची जाणीव माननीय अजित दादानांही होती. हा अनुशेष दूर करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले गेले आहेत. या विभागासाठी एक प्रादेशिक, दोन मंडळ, चार विभागीय, 14 उपविभागीय कार्यालयाची निर्मिती करण्यामध्ये पुढाकार घेतला गेला. पाणी उपलब्ध प्रमाणपत्र देण्याचे अधिकार मुख्य अभियंता विशेष प्रकल्प, अमरावती यांना प्रदान केले गेले, प्रशासकीय अधिकार महामंडळाला देण्यात आले, खारपट पट्टयातील लघुपाटबंधारे योजनांचे मापदंड तीनपटीने वाढविले गेले. याचा फायदा विदर्भातील खारपट पट्टयातील प्रकल्पांना होऊ शकला. लघुपाटबंधारे योजना सफल होण्याच्या दृष्टीने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे .....

आस्थापनाचा खर्च 25 टक्क्यावरुन 10 टक्के इतका कमी करण्यात आला, प्रकल्पाची कामे शीघ्र गतीने पूर्ण व्हावीत म्हणून भूसंपादनाची प्रक्रिया थेट खरेदी पध्दतीने सुरु करण्यात आली. आजही आपण भूसंपादनाची प्रक्रिया त्या कायद्याखालीच करीत असतो व त्यासाठी लागणारा कालावधी आपण लक्षात घेतला तर प्रत्यक्ष प्रकल्प सुरु झाल्यानंतर भूसंपादनासाठी जवळपास 5-10 वर्षाचा कालावधी जाऊ शकतो.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे.....

भूसंपादनाची प्रक्रिया थेट खरेदी पध्दतीने केल्यामुळे विदर्भात प्रकल्प सुरु करण्याच्या दृष्टीने चालना देऊ शकलो. 2002 पासून 3178 कोटी रुपयांच्या 1 लाख 47 हजार हेक्टर सिंचन क्षमतेच्या 126 सिंचन प्रकल्पांना मान्यता देण्यात आली. त्यापैकी 94 प्रकल्पांच्या कामास सुरुवात झालेली आहे.

गेल्या पाच वर्षात जे निधीचे वाटप करण्यात आले त्याची माहिती सभागृहाला आणि विदर्भातील जनतेला देतो. सन 2003-04 या वर्षात जलसंपदा विभागाला 1604 कोटी रुपये मिळाले. त्यापैकी विदर्भ विकास सिंचन महामंडळाला 554.64 कोटी रुपये देण्यात आले. मराठवाडा सिंचन महामंडळाला 330 कोटी रुपये देण्यात आले. उर्वरित महाराष्ट्र सिंचन महामंडळ ज्यामध्ये महाराष्ट्र कृष्णा खोरे महामंडळ, मी ज्या विभागाचे नेतृत्व करतो ते कोकण सिंचन महामंडळ व तापी खोरे महामंडळ आहे या महामंडळासाठी 709 कोटी रुपये देण्यात आले. सन 2004-05 मध्ये विदर्भासाठी 1213 कोटी रुपये, मराठवाड्यासाठी 937 कोटी रुपये तर उर्वरित महाराष्ट्रासाठी 1487 कोटी रुपये देण्यात आले. सन 2005-06 मध्ये विदर्भासाठी 1096 कोटी रुपये, मराठवाड्यासाठी 814 कोटी रुपये, उर्वरित महाराष्ट्रासाठी 1616 कोटी रुपये देण्यात आले. सन 2006-07 मध्ये विदर्भासाठी 1474 कोटी रुपये, मराठवाड्यासाठी 918 कोटी रुपये, उर्वरित महाराष्ट्रासाठी 1174 कोटी रुपये देण्यात आले. सन 2007-08 मध्ये विदर्भाच्या निधीमध्ये वाढ झाली. विदर्भाला एकूण 2351 कोटी रुपये, मराठवाड्यासाठी 1237 कोटी रुपये, उर्वरित महाराष्ट्रासाठी 1672 कोटी रुपये देण्यात आले. सन 2008-09 मध्ये विदर्भासाठी 3048 कोटी रुपये, मराठवाड्यासाठी 1282 कोटी रुपये, उर्वरित महाराष्ट्रासाठी 2171 कोटी रुपये देण्यात आले. सन 2009-10 मध्ये विदर्भासाठी 3168 कोटी रुपये, मराठवाड्यासाठी 1244 कोटी रुपये तर उर्वरित महाराष्ट्रासाठी 2875 कोटी रुपये देण्यात आले. सन 2010-2011 मध्ये मी वित्त मंत्री म्हणून अर्थसंकल्प मांडला, त्यावेळी विदर्भासाठी 4292 कोटी रुपये, मराठवाड्यासाठी 1129 कोटी रुपये तर उर्वरित महाराष्ट्रासाठी 2492 कोटी रुपये देण्यात आले. आपण मागील काही वर्षाचा विचार केला तर सन 2002 पासून 2009 पर्यंत विदर्भासाठी 12916 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे.....

करुन दिला. मराठवाड्यासाठी 6764 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला. उर्वरित महाराष्ट्रासाठी ज्यामध्ये तीन सिंचन महामंडळाचा समावेश आहे त्यासाठी 11707 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला. याचा अर्थ विदर्भातील बॅकलॉग भरुन काढण्याच्या दृष्टीने जलसंपदा विभागाने जाणीवपूर्वक पावले टाकली आहेत. राज्य सरकारने त्या बाबत सकारात्मक भूमिका घेतली.

सभापती महोदय, विदर्भात गोसीखुर्द प्रकल्प आहे तसाच हुमन प्रकल्प आहे. हुमन प्रकल्पाची एन.पी.रक्कम भरण्यासाठी 170 कोटी रुपयांची तरतूद या हिवाळी अधिवेशनात केलेली आहे. गोसीखुर्दसारखा राष्ट्रीय प्रकल्प सुरु आहे. प्रकल्पग्रस्तांचे काही प्रश्न आहेत. प्रकल्पग्रस्तांच्या विस्थापनासाठी राज्य सरकारने निधी उपलब्ध करुन दिला. सरकारने गेल्या वर्षी हिवाळी अधिवेशनात गोसीखुर्द प्रकल्पासाठी 152 कोटी रुपयांचे अतिरिक्त पॅकेज दिले. परंतु आजही गोसीखुर्द प्रकल्पग्रस्तांचे काही प्रश्न आहेत. काल मी या संदर्भात लोकप्रतिनिधींशी चर्चा केली.या चर्चेच्यावेळी विधानसभा आणि विधानपरिषदेतील सदस्य उपस्थित होते तसेच प्रकल्पग्रस्तांचे प्रतिनिधी देखील होते. जवळपास आम्ही दोन-अडीच तास चर्चा केली. गोसीखुर्द हा राष्ट्रीय प्रकल्प आहे. एक महत्वाकांक्षी प्रकल्प आहे. या प्रकल्पामुळे महाराष्ट्राच्या उत्पादन क्षेत्रामध्ये भरीव वाढ होणार आहे.

यानंतर श्री.गायकवाड..

अशुधारित प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे ..

या प्रकल्पाच्या कामामध्ये शेतक-यांचे असलेले योगदान लक्षात घेता प्रकल्पग्रस्तांच्या भावनांचा आदर राखण्यासाठी राज्य सरकार काही ठोस पावले उचलणार आहेत ही ग्वाही मी या चर्चेच्या निमित्ताने देऊ इच्छितो.एकाच वेळी अनेक प्रकल्प सुरु करण्यात आलेले आहेत व त्या प्रकल्पाची किंमत देखील मोठया प्रमाणावर आहे.साहजिकच त्यासाठी लागणारा निधी एकाच वेळी न दिल्यामुळे त्या प्रकल्पाची किंमत दर वर्षी वाढत जाते त्यामुळे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी लागणारा कालावधीसुध्दा कदाचित वाढू शकतो. त्यामुळे आपल्याला एक वर्गीकरण करावे लागेल. 80 टक्के काम जर एखाद्या प्रकल्पाचे पूर्ण झाले असेल तर त्या प्रकल्पासाठी 20 टक्के निधी उपलब्ध करुन दिला तर ते प्रकल्प लवकर पूर्ण होऊ शकतील . काही प्रकल्पाचे काम 50 ते 75 टक्के पूर्ण झाले असेल तर ते सुध्दा नजरेसमोर ठेवावे लागतील , त्या प्रकल्पाचे काम पूर्ण करण्यासाठी तीन चार वर्षाचे नियोजन करावे लागेल व त्यासाठी जर निधी उपलब्ध करुन दिला तर विदर्भात सिंचनाचे लाभक्षेत्र निर्माण होऊ शकते. अशाच प्रकारे लघू पाटबंधारे प्रकल्पाचेसुध्दा वर्गीकरण करुन त्यासाठी लागणारा निधी उपलब्ध करुन देता आला तर विशिष्ट कालावधीमध्ये या प्रकल्पाचीसुध्दा उभारणी करता येऊ शकेल.मघाशी सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी असाही उल्लेख केला होता की ,विदर्भाच्या पाण्यावर पश्चिम महाराष्ट्राचा डोळा आहे त्याचबरोबर त्यांनी असेही सांगितले की, विदर्भातील पाणी मराठवाडयातील मांजरा प्रकल्पाकडे वळविण्यात येणार आहे.एकदा आपण पश्चिम महाराष्ट्राचा उल्लेख केला आणि दुस-र्‍या वेळेस मराठवाडयाचा उल्लेख केला होता.मांजरा प्रकल्प कोणत्या विभागामध्ये आहे हे आपल्याला सुध्दा माहीत आहे.त्यामुळे मी त्या संदर्भात आपल्याला चॅलेंज करु शकत नाही.या ठिकाणी जे काही पाणी उपलब्ध आहे ते पाणी मागासलेल्या भागामध्ये म्हणजेच परभणी, हिंगोली,बीड,लातूर, उस्मानाबाद नेऊन त्या भागातील सिंचनाचे लाभक्षेत्र वाढविण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न सरकारच्या माध्यमातून होत असेल व त्याचा वेगळा अन्वयार्थ काढून राजकीय लाभ उठविण्याचा जर प्रयत्न केला जात असेल तर ते योग्य नाही. संपूर्ण राज्य डोळयासमोर ठेवून शासनाला प्रकल्पाची उभारणी करावयाची असते.अखंड महाराष्ट्राची निर्मिती करण्याच्या दृष्टीकोनातून दिले गेलेले हे योगदान आहे.राज्याला 50 वर्षे पूर्ण होत असतांना पुढील 50 वर्षाच्या भविष्याचा वेध आपल्याला घ्यावयाचा

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे

आहे.या सर्व गोष्टी लक्षात घेऊन ज्यावेळी आपल्याला काम करावयाचे असते त्यावेळेस सर्वच विभागाकडे लक्ष देण्याची जबाबदारी सामुदायिकरित्या तुमच्याकडे आणि आमच्याकडे येत असते.विदर्भातील मागास भागाला न्याय देण्याचा प्रयत्न राज्य शासनाचा आहे. मिहान प्रकल्प हे त्यातील एक पुढचे पाऊल आहे.या भागात सुरु झालेले विविध सिंचन प्रकल्प हे सुध्दा त्यातीलच एक पाऊल आहे. प्रकल्प ग्रस्तांच्या जमिनीचेसुध्दा काही प्रश्न असू शकतात.सरकार त्याबाबतीत सकारात्मक भूमिका घेत आहे.माननीय मुख्यमंत्री श्री पृथ्वीराज चव्हाण आणि माननीय उप मुख्यमंत्री श्री अजित दादा पवार यांच्या नेतृत्वाखाली सरकार जेव्हा प्रस्थापित झाले होते तेव्हा लोकांच्या अपेक्षा सुध्दा वाढलेल्या आहेत. मी आपल्याला नम्रपणे सांगू इच्छितो की, आता कामाला सुरुवात झालेली आहे. हा काही शेवट नाही. मघाशी या ठिकाणी असाही उल्लेख करण्यात आला की "सरकार गेंडयाच्या कातडीचे आहे". त्यांचा उद्वेग मी समजू शकतो.या सरकारला लोकांनी तिस-यांदा निवडून दिले आहे आणि आपल्याला मात्र लोकांनी एकदाच संधी दिली होती. परंतु तुम्ही कारभार करण्यास योग्य नाही हे राज्यातील जनतेने लोकशाहीच्या माध्यमातून सिध्द करुन दिले आणि आम्हाला मात्र तिस-यांदा निवडून दिले म्हणजेच आम्ही कारभार करण्यास योग्य आहोत ही भूमिका लोकांनी स्वीकारली आहे. 1999 साली आम्हाला मिळालेले पाठबळ,2004 साली आम्हाला मिळालेले पाठबळ आणि 2009 साली मिळालेले पाठबळ जर आपण पाहिले तर हे पाठबळ वाढलेले आहे असे दिसून येईल. याचा अर्थ आमच्या कामावर लोकांचा ठाम विश्वास आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेली घटना आणि लोकशाहीची चौकट इत्यादी बाबी आपण नेहमीच निरनिराळया व्यासपीठावर मांडण्याचा प्रयत्न करीत असतो.

डॉ.नीलम गोऱ्हे : लक्ष्मीदर्शनामुळे सत्ता मिळाली.

श्री.सुनील तटकरे : 1995 साली तुम्हाला जी सत्ता मिळाली होती ती यामुळेच मिळाली होती हे आपण कबूल करीत आहात काय ? कल्याण डोंबिवली महानगरपालिकेमध्ये जी सत्ता मिळाली ती सुध्दा याच पध्दतीने मिळाली होती काय ? अशा प्रकारे आपण म्हणू नका कारण आपण सर्वजण लोकशाही मानतो. ज्यावेळी आपण सर्वोच्च सभागृहात बसतो त्यावेळी .लोकशाहीमध्ये लोकांचा कौल मानण्याची जबाबदारी सामुदायिकरित्या आपणा सर्वावर आहे.सन्माननीय सदस्य श्री .जमा यांनी सांगितल्याप्रमाणे राज्यातील जनता सरकारकडे वेगळया

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे

अपेक्षेने पहात आहे.येत्या चार वर्षात पायाभूत सुविधामध्ये भरीव वाढ करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले जातील. उद्योगशील राज्य म्हणून प्रयत्न केले जात आहेत. आपण उद्योगाच्या बाबतीत मागे पडत चाललो आहोत असे सांगण्यात आले आहे पंरतु वस्तुस्थिती तशी नाही. गेल्या 50 वर्षाच्या काळात उद्योगाच्या क्षेत्रात या राज्याने नेत्रदीपक प्रगती केली आहे. जैतापूरचा प्रकल्प आणि नवीन मुंबई येथील आंतरराष्ट्रीय विमान तळाचा प्रकल्प राज्यात येऊ घातले आहेत.

नंतर श्रीसरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे...

एस.ई. झेड. ची पॉलिसी स्वीकारीत असतांना, व देशाच्या पातळीवर असलेली पॉलिसी स्वीकारीत असतांना राज्यामध्ये विशाल प्रकल्पाच्या माध्यमातून उद्योगाचे जाळे निर्माण होण्याची भूमिका राज्य सरकारने स्वीकारली आहे.

सभापती महोदय, राज्याच्या सर्व भागामध्ये सुध्दा औद्योगिकीकरण व्हावे म्हणून एमआयडीसीची निर्मिती केली गेली. नगरांचा विकास योग्य पध्दतीने व्हावा म्हणून सिडकोची निर्मिती केली. या राज्याला सुध्दा एक कर्तव्यदक्ष नेतृत्व मिळाले व त्या माध्यमातून सर्वंकष विकास करण्याचा निश्चितपणे प्रयत्न झाला. आपण ज्या भावना मांडल्या त्याची आम्हाला निश्चतपणे जाणीव आहे. आम्हाला नेहमी वाटते की, आपण तिकडच्या बाजूने सतत बोलत रहावे. तुम्ही ज्या चांगल्या विधायक सूचना केल्या असतील त्या आम्ही स्वीकृत कराव्यात लोकांच्या मनातील असलेल्या अपेक्षांची पूर्तता करण्याच्या दृष्टीने पावले उचलावीत. म्हणूनच मालगुजारी तलावांच्या प्रशासकीय कामांना मान्यता देण्यासाठी सुध्दा माननीय वित्त मंत्री श्री. अजितदादा पवार साहेबांकडे वित्त व नियोजन विभाग आल्यानंतर आम्ही त्यांच्याकडे प्रस्ताव पाठविला व त्याला सुध्दा विशेष मान्यता मिळविली. शासनाकडे 3 कोटीपर्यंतचे अधिकार असून, कार्यकारी संचालकांना 1 कोटी रुपयांपर्यंत अधिकार दिले आहेत. आपण सांगितलेली वस्तुस्थिती आम्ही नाकारीत नाही. 300 ते 400 वर्षापूर्वी बांधण्यात आलेल्या या तलावांचे सिंचन लाभक्षेत्र आज दहा टक्क्याच्या आसपास राहिले आहे. ते वाढविण्याच्या दृष्टीने आम्ही प्रयत्न करीत आहोत. शेवटी सर्वंकष प्रयत्न करीत असतांना राज्याच्या वेगवेगळया भागांना समान न्याय कसा मिळू शकेल याबाबत हे राज्य सरकार निश्चितपणे प्रयत्न करीत आहे.

याठिकाणी माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत साहेबांनी आरोग्य विषयक आपली भूमिका मांडली. माननीय विरोधी पक्षनेते श्री. फुंडकर साहेब व माननीय सदस्य श्रीमती शोभाताई फडणवीस आपण याठिकाणी विधायक सूचना केल्या आहेत. आपण गडचिरोली जिल्हयामध्ये आज अनेक पदे रिक्त असल्याचे सांगितले. हे प्रश्न आपण वेगवेगळया आयुधांचा वापर करुन या सभागृहामध्ये मांडीत आलो आहोत. आदिवासींचे प्रश्न, नक्षलग्रस्त भागातील लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी सरकारने ठोस पावले उचलावीत अशी आपण वेगवेगळया चर्चेच्या माध्यमातून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे...

मागणी करीत आला आहात. त्या निमित्ताने हे सरकार प्रयत्न देखील करीत आहे. आज आरोग्य विभागामध्ये काही रिक्त पदे आहेत. वित्त विभागाने ज्यावेळी वर्ग 3 आणि वर्ग 4 च्या भरतीवर बंदी आणली त्यामध्ये आरोग्य विभागाच्या पदांच्या भरतीसाठी आपण सवलत दिली आणि शेवटी आरोग्य विभागामध्ये सुध्दा पदे रिक्त राहणार नाहीत याची जबाबदारी त्या निमित्ताने हे राज्य सरकार घेत आहे. आपण या ठिकाणी मांडलेल्या भावनांची नोंद या विभागाचा मंत्री या नात्याने मी घेतली आहे. सुदैवाने या राज्याचे माननीय उप मुख्यमंत्री सुध्दा या चर्चेच्या निमित्ताने सभागृहात उपस्थित राहिले. तसेच, मंत्रिमंडळातील सर्व माननीय मंत्रिगण सुध्दा उपस्थित राहिले. विदर्भातील वेगवेगळया भागातील जनतेच्या दृष्टीकोनातून सर्वंकष समन्यायी पध्दतीचा विकास व्हावा, अशाप्रकारची अपेक्षा आपण व्यक्त केली आहे. ती पूर्ण करण्याचा प्रयत्न निश्चितपणे केला जाईल. . सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. जमा साहेबांना मी माझे भाषण संपत असतांना एवढेच सांगतो की, आता एक नवीन सुरुवात झाली आहे. नवीन पायाभूत प्रकल्प राज्यामध्ये येण्याच्या दृष्टीने सुध्दा पावले उचलली जात आहेत आणि म्हणूनच जैतापूर प्रकल्पाचे याठिकाणी समर्थन करीत असतांना तो प्रकल्प राष्ट्राच्या दृष्टीने आणि राज्याच्या दृष्टीने किती हिताचा आहे, हे समजावून सांगण्याचा प्रयत्न या निमित्ताने केला जात आहे. भविष्य काळात देखील अशा प्रकारचे प्रकल्प या राज्यामध्ये यावेत याकरिता या राज्याची 50 वर्षे पूर्ण करीत असतांना महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाची पावले टाकीत भविष्याचा वेध घेण्याचे काम आपण सर्वजण करीत आहोत. राजकारणामध्ये एक नवीन पिढी उभी करण्याचे काम सर्व पक्षांच्या नेतृत्वाच्या माध्यमातून होत आहे. त्यावेळी एक आशादायक चित्र लोकांसमोर उभे रहात असतांना त्याला कामाची जोड देण्याचा प्रयत्न निश्चितपणे केला जाईल. एवढेच आज या चर्चेच्या निमित्ताने सांगतो. आपल्या सूचनांचा आदर केला जाईल. गोसीखूर्द आणि जिगाव या प्रकल्पांच्या बाबतीत आपण ज्या काही सूचना केल्या आहेत, त्याची चौकशी यापूर्वीच्या कालखंडामध्ये केली गेली आहे. त्याबाबतीत सुध्दा कठोर कारवाई केली जाईल. शेवटी प्रकल्पाची किंमत व प्रकल्पासाठी देण्यात येणारा निधी हा त्या प्रकल्पासाठीच वापरला जाईल. त्यामधून अधिकाधिक सिंचनाचे लाभक्षेत्र कसे निर्माण होईल याचा प्रयत्न यापुढील कालावधीमध्ये अधिक दक्षतेने केला जाईल. एवढेच या चर्चेच्या निमित्ताने सांगतो

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे...

आणि सर्व माननीय सदस्यांचे आभार मानीत असतांना पुढील कालावधीत सुध्दा अशाच प्रकारच्या विधायक सूचना करुन सरकारच्या माध्यमातून लोक कल्याणकारी कामे करण्यासाठी आपण सर्वांनी हातात हात घालून कामे करु या. असे कळकळीचे आवाहन करुन माझे भाषण संपवितो. धन्यवाद. जय हिंद, जय महाराष्ट्र.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय जलसंपदा मंत्र्यांनी या ठरावाला उत्तर देत असतांना अतिशय चांगले भाषण केले आहे. त्यांनी हे भाषण जाहीर सभेमध्ये केले असते तर लोकांनी खूप टाळया वाजविल्या असत्या. त्यामुळे आपण केलेल्या भाषणाबद्दल विदर्भातील जनतेच्या वतीने आपणास धन्यवाद देतो. मी याठिकाणी काही स्पेसिफिक मुद्दे उपस्थित केले होते. आपण अमरावती विभागामध्ये काय काम केले ते सांगितले. परंतु पैशांची आकडेमोड मात्र चांगली करुन दाखविली. त्याचबरोबर अमरावती आणि नागपूर विभागामध्ये आज भौतिक विकासाचा अनुशेष किती आहे हे जर आपण सांगितले असते तर बरे झाले असते. परंतु ते सांगणे आपण जाणीवपूर्वक टाळले आहे. खरे म्हणजे विदर्भाचे पाणी सोफिया वापरणार आहे. परंतु त्या सोफियाची वीज कुठे जाणार आहे? हे आपण स्पष्ट केले पाहिजे.

(यानंतर श्रीमती थोरात)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ D/ KGS/ KTG/ MMP/ प्रथम श्री. सरफरे..... 17:00

श्री.पांडुरंग फुंडकर...

कारण असे की, विदर्भामध्ये 4 हजार मेगावॅट वीज तयार होत असताना विदर्भाच्या वाटयाला फक्त 1400 मेगावॅट वीज येते. या सोफिया प्रॉजेक्टमधून निर्माण होणाऱ्या विजेसाठी विदर्भातील पाणी वापरले जाणार आहे आणि वीज मात्र दुसरीकडेच जाणार आहे. सभापती महोदय, या ठिकाणी आकडेमोड करत असताना आम्ही उद्योगाचा अनुशेष सांगितला होता. माननीय मंत्रिमहोदयांनी विदर्भाच्या बाबतीत फार चांगले स्वप्न रंगविले. ही नवी सुरुवात आहे. पण 50 वर्षे काय केले? 50 वर्षे विदर्भातील जनतेची बरबादी झाली. आता नव्याने चांगली सुरुवात करण्यात येत आहे. आम्हाला पुढचे स्वप्न दाखविण्यात येत आहे. पण गेली 50 वर्षे विदर्भातील जनतेची फसवणूक झालेली आहे. आरोग्याच्या बाबतीत माननीय मंत्रिमहोदय या ठिकाणी बोलले नाहीत. मेळघाटाच्या बाबतीत याठिकाणी जे प्रश्न उपस्थित करण्यात आले होते त्यासंबंधीचा उल्लेख त्यांनी आपल्या भाषणात केला नाही. शिक्षणाच्या बाबतीत उल्लेख केला नाही. विदर्भाला किती मेडिकल कॉलेजेसची आवश्यकता होती त्यापैकी विदर्भात किती मेडिकल कॉलेजेस झाले याचा उल्लेख करण्यात आला नाही. बेरोजगाराच्या बाबतीत उल्लेख करण्यात आला नाही. सभापती महोदय, "नेमेची येतो मग पावसाळा" या पध्दतीने दर अधिवेशनामध्ये आम्ही माननीय मंत्रिमहोदयांची अशीच भाषणे ऐकतो आणि अशीच विदर्भाच्या तोंडाला पाने पुसली जातात. माननीय मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी जे वक्तव्य केलेले आहे त्याची आम्हाला वर्षभर वाट पहावी लागणार आहे. मग पुढच्या अधिवेशनात या ठिकाणी असेच भाषण करण्यात येणार आहे. माननीय मंत्रिमहोदयांच्या उत्तराच्या भाषणामुळे विदर्भातील जनतेचे समाधान झालेले नाही. माननीय मंत्रिमहोदयांच्या भाषणाने मी समाधानी नाही. बॅकलॉग कसा भरुन काढणार याबाबतीत पैशाची आकडेमोड करुन विदर्भातील जनतेच्या तोंडाला पाने पुसण्याचे शासनाने ठरविले असेल तर ते आम्हाला मान्य नाही. म्हणून आम्ही या ठिकाणी निषेध करतो आणि सभात्याग करतो.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांच्या भाषणातून आम्हाला एकाही प्रश्नाचे उत्तर मिळालेले नाही म्हणून आम्ही सभात्याग करीत आहोत.

(विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य सभात्याग करतात)

उप सभापती : सभागृहाने या प्रस्तावावर विचार केला आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ D/ KGS/ KTG/ MMP/

पृ.शी./मु.शी.: श्री. नं.द. वडनेरे, सेवानिवृत्त प्रधान सचिव,
जलसंपदा विभाग यांच्या एक सदस्यीय समितीचा
गोसीखुर्द प्रकल्पाबाबतचा अहवाल.

श्री. सुनील तटकरे (जलसंपदा मंत्री (कृष्णा खोरे-पाटबंधारे महामंडळ वगळून)) : सभापती महोदय, सन 2010 च्या पावसाळी अधिवेशनात पुरवणी मागण्यांवर चर्चा करताना तत्कालीन माननीय मंत्री (जलसंपदा) यांनी सभागृहात श्री. वडनेरे यांच्या एक सदस्यीय समितीचा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल असे आश्वासित केले होते. त्या अनुषंगाने गोसीखुर्द प्रकल्पाबाबत श्री. वडनेरे, सेवानिवृत्त प्रधान सचिव यांच्या एक सदस्यीय समितीने सादर केलेला अहवाल (अभिप्राय व शिफारशी) व त्यावर शासनाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल (Action Taken Report) आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : गोसीखुर्द प्रकल्पाबाबत श्री. वडनेरे, सेवानिवृत्त प्रधान सचिव यांच्या एक सदस्यीय समितीने सादर केलेला अहवाल (शिफारशी व अभिप्राय) व त्यावर शासनाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल (Action Taken Report) सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

यानंतर श्री. बरवड.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : सत्रकाळातील कामकाजाचा आढावा

उप सभापती : हिवाळी अधिवेशनाचा आजचा शेवटचा दिवस आहे आणि आजचे दिवसाचे कामकाज सुध्दा आता संपले आहे. मी या सत्रकाळातील कामकाजाचा आढावा आता सदनासमोर ठेवतो.

एकूण बैठकीची संख्या - 12

एकूण कामकाज - 85 तास

मंत्री उपस्थित नसल्यामुळे वाया गेलेला वेळ - 40 मिनिटे

अन्य कारणांमुळे वाया गेलेला वेळ - 2 तास 20 मिनिटे

प्रत्यक्षात झालेले कामकाज - 82 तास

रोजचे सरासरी कामकाज 6 तास 50 मिनिटे

(विधान परिषद नियमानुसार बैठकीची वेळ 5 तास आहे. म्हणजेच आपण एकूण 17 दिवसांचे काम केले आहे.)

<u>तारांकित प्रश्न</u>

एकूण आलेले तारांकित प्रश्न - 3663

कार्यवाहीसाठी घेतलेले तारांकित प्रश्न - 2820

स्वीकृत प्रश्न 1217

सभागृहात तोंडी उत्तरीत झालेले तारांकित प्रश्न 62

<u>नियम 93 सूचना --</u>

एकूण प्राप्त झालेल्या सूचना -237

स्वीकृत सूचनांची संख्या 136

चर्चा झालेला सूचना 53

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ KGS/

उप सभापती .....

लक्षवेधी सूचना -

प्राप्त झालेल्या सूचना -1199

मान्य झालेल्या सूचना 290

चर्चा झालेल्या सूचना - 41

विशेष उल्लेख

विशेष उल्लेखाच्या 82 सूचना मांडण्यात आल्या.

नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा -

प्राप्त झाल्या 4, मान्य झाल्या 4 , चर्चा झाली 3

शासकीय विधेयके संमत- 15 (परिषद 4 - सभा 11)

नियम 260 अन्वये 4 प्रस्तावावर चर्चा झाली.

अशासकीय ठरावावर चर्चा झाली - 2

अशासकीय विधेयक चर्चा झाली - 1

शासकीय ठरावावर चर्चा झाली - 1

अर्धा तास चर्चा - प्राप्त झाल्या 108 , मान्य झाल्या 65

अंतिम आठवडा प्रस्ताव चर्चा झाली - 1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: पुढील अधिवेशनासंबंधी घोषणा.

उप सभापती : मी खालील घोषणा करतो :-

राज्यपालांना अशी शिफारस करण्याचे ठरले आहे की, "महाराष्ट्र विधानपरिषदेचे पुढील अधिवेशन सोमवार, दिनांक, 14 मार्च, 2011 रोजी विधान भवन, मुंबई येथे घेण्यात यावे."

पृ.शी./मु.शी.: सत्र-समाप्तीसंबंधी घोषणा.

उप सभापती : सभागृहाचे कामकाज आता संपले आहे. राज्यपालांकडून पुढीलप्रमाणे संदेश आला आहे :-

" मी, के. शंकरनारायण, महाराष्ट्राचे राज्यपाल, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 174 खंड (2), उपखंड (क) व्दारे मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, याव्दारे गुरुवार, दिनांक 16 डिसेंबर, 2010 रोजी होणाऱ्या सभागृहाच्या बैठकीच्या समाप्तीबरोबरच महाराष्ट्र विधानपरिषदेचे अधिवेशन संस्थगित करीत आहे."

आता राष्ट्रगीत गाईले जाईल व त्यानंतर सत्र संस्थगित होईल, असे मी घोषित करतो.

(यानंतर राष्ट्रगीत झाले)

(सायंकाळी 5 वाजून 7 मिनिटांनी सत्र संस्थगित झाले)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही